पायाभूत भाषा साक्षरता

# शिक्षक मार्गदर्शिका

(प्रथम भाषा मराठी)

NIPUN BHARAT



'STARS' प्रकल्पांतर्गत

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## पायाभूत भाषा साक्षरता : शिक्षक मार्गदर्शिका (प्रथम भाषा मराठी)

- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. रणजितसिंह देओल (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **मार्गदर्शन** : **मा. सूरज मांढरे (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा. कैलास पगारे (भा.प्र.से.)**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **मा. रमाकांत काठमोरे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. कमलादेवी आवटे**
  उपसंचालक, भाषा व समन्वय विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी सहसंपादक** : **डॉ. राजेश बनकर**
  विभाग प्रमुख, मराठी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन सहाय्य** : **मनिषा ताठे**
  अधिव्याख्याता, मराठी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ. निता जाधव**
  अधिव्याख्याता, मराठी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **मनीषा राजपूत**
  विषय सहायक, मराठी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **चंदन कुलकर्णी**
  विषय सहायक, मराठी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रथम आवृत्ती** : मार्च २०२३
- **अर्थसाहाय्य** : ‘STARS’ प्रकल्पांतर्गत, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

NIPUN BHARAT

पायाभूत भाषा साक्षरता

# शिक्षक मार्गदर्शिका

(प्रथम भाषा मराठी)



'STARS' प्रकल्पांतर्गत

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

NIPUN BHARAT

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# निपुण प्रतिज्ञा

आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्वजण महाराष्ट्रातील प्रत्येक बालकास पायाभूत शिक्षण कौशल्ये आत्मसात करण्यास उपयुक्त शैक्षणिक वातावरण निर्मिती करण्यास कटिबद्ध आहोत.

आपण सारे मिळून, आपल्या मुलांसाठी निखळ, आनंददायी समृद्ध अनुभवाच्या संधी देणारी, अभिव्यक्तीचं आकाश खुलं करणारी, मुक्तछंद जोपासणारी, नेतृत्वाच्या संधी देणारी आणि आत्मसन्मान जपणारी शाळा निर्माण करूया.. आपण सारे मिळून अशी शाळा आणि घर बनवूया.. जिथे बालके अर्थपूर्ण वाचन, हेतुपूरक लेखन व गणिती व्यवहार प्रत्यक्ष जीवनात उतरवतील आणि आयुष्यभर विद्यार्थी राहतील...

अशाप्रकारे, महाराष्ट्रातील प्रत्येक बालकास आरोग्यदायी आणि आनंददायी शिक्षण देऊन 'निपुण बालक' घडविण्याची आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | घटक / उपघटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | **निपुण भारत अभियान : ओळख व पार्श्वभूमी** | १ |
| | १.१ निपुण भारत अभियान | ३ |
| | १.२ निपुण भारत अभियान : ध्येय | ४ |
| | १.३ पायाभूत भाषा साक्षरता : समाविष्ट घटक | ५ |
| २. | **पायाभूत भाषा साक्षरता : संकल्पना व अध्ययन अनुभव** | ८ |
| | २.१ भाषा अध्ययन : एक दैनंदिन प्रक्रिया | ८ |
| | २.२ भाषा संपादन | ८ |
| | २.३ पायाभूत भाषा साक्षरता विकास दृष्टिकोन | ९ |
| | २.४ अध्ययन-अध्यापन भाषा विकासातील संतुलित दृष्टिकोन | ९ |
| | २.५ पायाभूत भाषा साक्षरता : ओळख, गरज व अध्ययन ओळख | १० |
| | २.६ पायाभूत भाषा साक्षरता : समाविष्ट घटक | १० |
| ३. | **वर्गातील बहुभाषिकता** | ३१ |
| | ३.१ बहुभाषिक परिस्थितीत अध्ययन-अध्यापनातील भूमिका | ३२ |
| | ३.२ शाळेतील सुरुवातीची दोन वर्षे आणि बहुभाषिकता | ३३ |
| | ३.३ सीमा भाग आणि मोठी शहरे यांमधील बहुभाषिकता | ३३ |
| | ३.४ अध्यापन साहित्य म्हणून विविध साधनांचा वापर | ३५ |

| अ. क्र. | घटक / उपघटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४. | **पायाभूत भाषा साक्षरता : शिक्षक भूमिका** | ३८ |
| | ४.१ विकासात्मक ध्येये | ३८ |
| | ४.२ अध्ययन निष्पत्ती आणि अध्ययन क्षमता | ४० |
| | ४.३ अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका | ४० |
| | ४.४ पाठ नियोजन | ४४ |
| | ४.५ शैक्षणिक साहित्याचा वापर व व्यवस्थापन | ४५ |
| | ४.६ पायाभूत भाषा साक्षरतेसंदर्भात दैनंदिन उपक्रमांच्या आयोजनात शिक्षकाची भूमिका | ४७ |
| | ४.७ समावेशित शिक्षण | ४९ |
| ५. | **पायाभूत भाषा साक्षरता आणि मूल्यांकन** | ५२ |
| | ५.१ मूल्यांकनाची दोन प्रमुख क्षेत्रे | ५२ |
| | ५.२ पायाभूत भाषा साक्षरता आणि मूल्यांकन | ५३ |
| | ५.३ विद्यार्थी मूल्यांकनासंदर्भात काही महत्त्वाच्या बाबी | ५३ |
| **परिशिष्ट 'अ'** – विकासात्मक ध्येय २ – अध्ययन निष्पत्ती | | ५७ |
| **परिशिष्ट 'ब' (१)** – पायाभूत भाषा साक्षरता : अध्ययन-अध्यापन कृती आराखडा | | ६१ |
| **परिशिष्ट 'ब' (२)** – पायाभूत भाषा साक्षरता : अध्ययन-अध्यापनाचे साप्ताहिक नियोजन (नमुना) | | ८२ |
| **परिशिष्ट 'क'** – नमुना पाठ नियोजन | | ८३ |
| **परिशिष्ट 'ड'** – निपुण भारत अभियान – पायाभूत भाषा साक्षरता लक्ष्य | | ९८ |

# १. निपुण भारत अभियान : ओळख व पार्श्वभूमी

आजची बालके ही आपल्या राष्ट्राची भावी संपत्ती आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण देशाच्या विकासाचा पाया आहे. हा पाया भक्कम असेल, तर देशाची प्रगती योग्य पद्धतीने साध्य करता येईल, हे ओळखूनच अनेक पाश्चात्य व पौर्वात्य विचारवंतांनी प्राथमिक शिक्षणास अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे. आतापर्यंत अनेक शैक्षणिक धोरणे, अभ्यासक्रम आराखडे, विविध समित्या यांद्वारे मुलांचे शिक्षण अधिकाधिक गुणवत्तापूर्ण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. स्वातंत्र्योत्तर काळात विविध शैक्षणिक धोरणांमध्ये, मुख्यत: शालेय शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर आणि शिक्षणातील समानतेवर भर दिला गेला आहे. या विविध शैक्षणिक धोरणांद्वारे औपचारिक शिक्षण पद्धतीस अधिकाधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

देशाचे दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये आखण्यात आले. त्या धोरणाची योग्य अंमलबजावणी करण्यासाठीचा कृती कार्यक्रम १९९२ मध्ये देण्यात आला. या पूर्वी जाहीर केलेल्या १९६८ च्या धोरणाच्या अंमलबजावणीत अपूर्ण राहिलेल्या बाबी या धोरणाद्वारे पूर्ण करण्याचा पुरेपूर प्रयत्न करण्यात आला. १९८६ च्या धोरणानंतरचे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी उचललेले मोठे पाऊल म्हणजे मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ हे होते. या अधिनियमाद्वारे वय वर्षे ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाची हमी देण्यात आली. आतापर्यंत शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे लक्ष्य साध्य करण्याकरिता, भारताने २५० दशलक्ष विद्यार्थी आणि ९.४ दशलक्ष शिक्षकांचा समावेश असलेली जगातील सर्वांत मोठी शालेय व्यवस्था निर्माण करून, त्याद्वारे प्राथमिक स्तरापर्यंत शिक्षणाच्या उपलब्धतेचे सार्वत्रिकीकरण गाठण्यासाठी पुरेशी प्रगतीही केलेली आहे.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या प्रयत्नामुळे, राज्यभरातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांसाठी शाळांच्या मूलभूत सुविधा उपलब्ध झाल्या आणि त्यामुळे समाजातील सर्व स्तरांतील मुले शाळेत येण्याचा मार्ग सुकर झाला आहे. शासनामार्फत मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेष, मोफत वाहतूक सुविधा, पायाभूत भौतिक सुविधा आणि विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. या विविध प्रयत्नांचा परिपाक म्हणून शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणास चालना मिळाली आहे.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासोबतच केंद्रीय शालेय शिक्षण मंत्रालयाने अध्ययनाची गुणवत्ता सुधारण्यासाठीही सातत्याने धोरण आणि कार्यक्रम या दोन्ही स्तरांवर अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. शालेय शिक्षणाच्या पायाभूत वर्षांमध्ये गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी, केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत दिनांक २७ ऑगस्ट, २०१४ रोजी प्रारंभिक वाचन आणि आकलनासह लेखन, यांवर लक्ष केंद्रित करणारा 'पढ़े भारत, बढ़े भारत' हा सर्व शिक्षा मोहिमेचा देशव्यापी कार्यक्रम सुरू करण्यात आला होता.

राज्यामार्फतही गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि भाषा विकसनाकरिता विशेषत्वाने विविध प्रशिक्षण कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात आले आहेत. राज्याद्वारे मूलभूत वाचन क्षमता प्रशिक्षण कार्यक्रम, स्तराधारित अध्ययन कार्यक्रम, प्रारंभिक भाषा विकास कार्यक्रम, समजपूर्वक वाचन अभियान यांसारखे विविध कार्यक्रम राबविण्यात

आले. महाराष्ट्र शासनाने शिक्षकांच्या संबोध दृढीकरणाकरिता, शासकीय व अनुदानित शाळांकरिता मराठी भाषा अध्ययन समृद्धी साहित्य संच ही (शैक्षणिक साहित्य पेटी) उपलब्ध करून दिला आहे. या साहित्य पेटीतील साहित्याचा वापर मुलांच्या वाचन, लेखनासाठी कसा करावा याविषयीचे प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमांतून मराठी भाषा शिक्षणाच्या विकसनावर भर देण्यात आला. या विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमता विकसनावर झालेला दिसून येतो, त्यामुळे मुलांची आकलनासह वाचनाची क्षमता विकसित झाली. असे असले, तरी देखील शालेय शिक्षणाच्या विविध टप्प्यांवर बालकांच्या निम्न अध्ययन स्तराबाबत आज राष्ट्रीय पातळीवर एक तीव्र चिंता आढळून येते.

काही सर्वेक्षण अहवालांपैकी नुकताच जाहीर झालेला राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS 2021) हा अहवाल इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतेबाबत खालील निरीक्षणे नोंदवितो.

**क्षमतेबाबत विद्यार्थ्यांच्या शेकडेवारीचे प्रमाण :**

| सर्व साधारणपेक्षा कमी (Below Basic) | मूलभूत (Basic) | प्रवीण (Proficient) | प्रगत (Advanced) |
|---|---|---|---|
| २२ टक्के | ३३ टक्के | ३० टक्के | १४ टक्के |
| या स्तरावरील विद्यार्थी सुरुवातीच्या टप्प्यावर असतात. ज्या विद्यार्थ्यांनी आवश्यक कौशल्ये प्राप्त केलेली नाहीत, त्यांना अध्ययनाच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शनाची व प्रोत्साहनाची गरज असते. | या स्तरावरील विद्यार्थी ज्ञान व कौशल्ये साधारण स्तरावर प्राप्त करू शकतात. साध्या सूचनांचे पालन करू शकतात. साध्या तर्कांचा वापर करतात व विविध टप्प्यांवर स्वतःची सोप्या भाषेत माहिती सांगतात. अध्ययनासाठी त्यांना पुरेशा मार्गदर्शनाची आवश्यकता असते. | या स्तरातील विद्यार्थ्यांनी बहुतेक सर्व कौशल्ये आत्मसात केलेली आहेत. तर्क, विश्लेषण वापरून समस्या सोडवितात. माहितीचा अर्थ लावतात. वरच्या स्तरावर जाण्यासाठी प्रयत्न करतात. | या स्तरावरील विद्यार्थी विविध कौशल्यांवर अपवादात्मक प्रभुत्व मिळवितात. ते स्वतंत्र उच्च विश्लेषणात्मक विचार करणारे असतात. एखादी समस्या सोडविण्यासाठी एकात्मिक संकल्पना व सर्वोच्च सर्जनशीलता वापरतात. |

उपरोक्त तक्त्यात नमूद आकडेवारीनुसार राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणात (NAS 2021) विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार सर्वसाधारणपेक्षा कमी व मूलभूत स्तरावरील विद्यार्थ्यांची संख्या अधिक दिसून येते; म्हणजेच अपेक्षित क्षमता प्राप्त न केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या तुलनेने अपेक्षित क्षमता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कमी असलेली दिसून येते. यावरून भाषा शिक्षणाबाबत अधिक कार्य करण्याची गरज प्रकर्षाने अधोरेखित होते.

कोविड महामारीच्या गेल्या एक–दोन वर्षांत मोठ्या कालावधीसाठी शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची हेळसांड झाली. विद्यार्थी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञानात मागे पडले आहेत. प्राथमिक स्तरावर इयत्ता तिसरीपर्यंत विद्यार्थ्यांनी वाचायला शिकणे आणि मूलभूत कौशल्ये आत्मसात करणे अपेक्षित

आहे. इयत्ता तिसरीनंतर बालकांनी शिकण्यासाठी वाचणे अपेक्षित आहे. असे न झाल्यास त्या बिंदूपासून अध्ययनाचे अंतर वाढत जाते, कारण नंतरच्या इयत्तांमध्ये भाषेच्या पाठ्यपुस्तकामधील मजकूर, भाषिक संबोध अधिक जटिल आणि अमूर्त होत जातात. जी भाषा मुले बोलत नाहीत किंवा त्यांस आकलन होत नाही, अशा भाषेत शिकण्याची मुलांना सक्ती केली जाते या प्रकारामुळे मुलांचे नुकसानच अधिक होते. अपरिचित भाषेतून शिकताना मुलांना दुहेरी अडचणींचा सामना करावा लागतो, कारण त्यांना नवीन भाषा शिकण्याचा प्रयत्न करावा लागतो आणि त्याचवेळी पाठ्यपुस्तकातील कठीण संकल्पना अपरिचित भाषेतून शिकाव्या लागतात. अशाप्रकारे इयत्ता तिसरी हा पायाभूत भाषा साक्षरतेकरिता महत्त्वाचा बिंदू ठरतो आणि इथेच या मुलांनी पायाभूत भाषा साक्षरतेची कौशल्ये साध्य केली नाहीत, तर अध्ययनात ती निरंतर मागे पडतात.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा–२००५ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० हे अधोरेखित करतात की, सध्या प्राथमिक स्तरावरील अंदाजे पाच कोटीहून अधिक विद्यार्थ्यांनी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्त केलेले नाही. या संकटाला त्वरित तोंड देणे आवश्यक आहे; जेणेकरून शाळांमध्ये पायाभूत शिक्षण पूर्ण केले जाऊ शकेल आणि त्याद्वारे सर्व विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण घेण्याची संधी प्राप्त होऊ शकेल. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP-2020) मध्ये मुलांच्या शिकण्यासाठी एक तातडीची आणि आवश्यक पूर्वअट म्हणून पायाभूत भाषा साक्षरता व संख्याज्ञान यांवर विशेष भर देण्यात आला आहे, याचे कारण म्हणजे तोच मुलांच्या शिक्षणाचा मुख्य पाया असून भविष्यातील शिक्षणासाठी ती अनिवार्य अशी बाब आहे.

सद्य:स्थितीत पायाभूत भाषा साक्षरतेच्या विकसनाकरिता तसेच प्रत्येक इयत्तेत विद्यार्थी अपेक्षित अध्ययन निष्पत्ती प्राप्त करू शकतील याची खात्री करण्याकरिता तातडीची आणि लक्ष्याधारित अशी विस्तारित योजना आखण्याची गरज अधोरेखित झालेली होती. सदर गरजेच्या पूर्ततेसाठी आणि देशात शैक्षणिक चळवळ निर्माण व्हावी याकरिता 'निपुण भारत अभियान'ची सुरुवात करण्यात आली आहे.

## १.१ निपुण भारत अभियान

विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसनाकरिता 'निपुण भारत (National Initiative for Proficiency in reading with Understanding and Numeracy) हे राष्ट्रीय अभियान दि. ५ जुलै, २०२१ रोजी सुरू करण्यात आले आहे.

'आत्मनिर्भर भारत' मोहिमेअंतर्गत या अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. सन २०२६–२७ पर्यंत इयत्ता तिसरीच्या अखेरीस, देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला पायाभूत भाषा साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्त होईल याची हमी देण्यासाठी हे अभियान सुरू केले आहे. सदर अभियानांतर्गत एक अभिनव अभ्यासक्रम आराखडा, स्पष्टपणे संकल्पित केलेल्या व मापनयोग्य अध्ययन निष्पत्ती, शिक्षक सक्षमीकरण, मूल्यांकन तंत्रे इ. बाबी शास्त्रशुद्ध पद्धतीने विकसित केल्या आहेत व त्या शिक्षकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

निपुण भारत अभियान यशस्वी करण्यासाठी भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने प्राधान्य दिलेले आहे. इयत्ता तिसरीच्या अखेरीस प्रत्येक विद्यार्थ्यासाठी पायाभूत भाषा साक्षरता आणि संख्याज्ञानात प्रावीण्य मिळविण्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, राज्य व केंद्रशासित प्रदेशांमधून प्राधान्याने कृती कार्यक्रम

राबविला जात आहे. अभियानाची उद्दिष्टे सर्व सरकारी, सरकारी अनुदानित आणि खाजगी शाळांनी साध्य करणे आवश्यक आहे. निपुण भारत अभियानाची सार्वत्रिक उद्दिष्टे सन २०२६–२७ पर्यंत पूर्ण केली जातील अशी अपेक्षा करण्यात आली आहे.

## १.२ निपुण भारत अभियान : ध्येय

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मध्ये मुलांच्या एकात्मिक विकासावर भर दिला गेला आहे. शारीरिक आणि मानसिक विकास, सामाजिक व भावनिक विकास, साक्षरता आणि संख्याज्ञान विकास, संबोधात्मक विकास, आध्यात्मिक आणि नैतिक विकास, कला आणि सौंदर्य यांचा विकास यांसारखी विकासाची वेगवेगळी क्षेत्रे आहेत, जी परस्परसंबंधित व परस्परावलंबी आहेत. निपुण भारत अभियानात या विकासाची तीन प्रमुख ध्येये सांगितली गेली आहेत.


१) विकासात्मक ध्येय १ : बालके उत्तम आरोग्य आणि स्वास्थ्य राखतात. (HW)

२) विकासात्मक ध्येय २ : बालके प्रभावी संवादक बनतात. (EC)

३) विकासात्मक ध्येय ३ : बालके सक्रिय अध्ययनार्थी बनतात आणि लगतच्या वातावरणाशी जोडली जातात. (IL)

वरील विकासात्मक ध्येयांनुसार विद्यार्थ्यांमध्ये विकसित करावयाच्या प्रमुख क्षमता व अध्ययन निष्पत्ती निपुण भारत अभियानात निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

### ओघतक्ता



एकूणच ३ ते ९ वर्षे वयोगटामधील मुलांच्या अध्ययन गरजांचा विचार या अभियानात केला गेला आहे. हे अभियान ३ ते ९ वर्षे वयोगटातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून टिकवून ठेवणे, शिक्षकांच्या क्षमतांचे सबलीकरण, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार अध्ययन–अध्यापन साहित्य व स्रोतांची निर्मिती आणि अध्ययन निष्पत्ती प्राप्त होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा पाठपुरावा तसेच विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य, या विविध क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणार आहे. २०२६–२७ पर्यंत प्राथमिक वर्गांमध्ये पायाभूत साक्षरतेचे सार्वत्रिक संपादन सुनिश्चित करण्यासाठी, सर्व बाबींमध्ये सक्षम वातावरण निर्माण करणे हे अभियानाचे लक्ष्य आहे; जेणेकरून प्रत्येक मुलाला इयत्ता तिसरीच्या शेवटी किमान वाचन, लेखन आणि संख्याज्ञानातील अपेक्षित क्षमता प्राप्त होतील.

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मध्ये सांगितल्याप्रमाणे पायाभूत शिक्षण, विद्यार्थ्यांच्या सर्जनशील क्षमतेवर भर देऊन, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करणारे असेल. शिक्षण हे समग्र, एकात्मिक, सर्वसमावेशक, आनंददायी आणि आकर्षक असेल. सर्व मुलांना समान आणि सर्वसमावेशक अशा वर्गवातावरणात प्रवेश मिळेल, जे त्यांच्या वेगवेगळ्या पार्श्वभूमी, बहुभाषिक गरजा आणि विविध शैक्षणिक क्षमतांची काळजी घेईल आणि त्यांना शिकण्याच्या प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी करून घेईल. प्राथमिक वर्गात मूलभूत वाचन, लेखन आणि संख्याज्ञान कौशल्य प्राप्त करणे या बाबी विद्यार्थ्यांसाठी सातत्यपूर्ण आणि आजीवन शिक्षणासाठी एक मजबूत पाया तयार करतील.

## १.३ पायाभूत भाषा साक्षरता : समाविष्ट घटक

मूलतः निपुण भारत अभियान पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानावर प्रामुख्याने कार्य करणार आहे हे आपण पाहिले. निपुण भारत अभियानास अपेक्षित असलेल्या पायाभूत भाषा साक्षरता विकसनासाठी पुढील नऊ घटकांवर काम होणे निश्चित केले आहे.

- **मौखिक भाषा विकास :**
  वाचन, लेखन कौशल्याच्या विकासासाठी मौखिक भाषा विकास महत्त्वाचा आहे. यामध्ये लक्षपूर्वक ऐकणे, समजून घेणे, मौखिक शब्दसंग्रह व संवादाचा समावेश होतो.
- **भाषेच्या लेखी रूपाची जाणीव :**
  मुलांच्या साक्षरतेचा विकास करण्याकरिता मुलांना लेखी मजकुराची जाणीव वाचनाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर आकलन होण्याकरिता महत्त्वाचे असते.
- **भाषेतील ध्वनींची जाण :**
  यामध्ये भाषेत विविध शब्दांचा अर्थपूर्ण वापर होत असताना, अक्षरातील ध्वनीची जाणीव, त्यातील शब्दांची जाणीव, यमकाची जाणीव, या क्षमता अंतर्भूत आहेत.
- **विसांकेतिकरण (Decoding) :**
  या संकल्पनेत चिन्ह आणि त्याचे उच्चार यामधील सहसंबंध लक्षात घेऊन, शब्द, मजकुराचा अर्थ समजून घेणे समाविष्ट आहे.

- **आकलनयुक्त वाचन :**
  यामध्ये मजकूर समजावून घेणे, मजकुरातून अपेक्षित अर्थ काढणे आणि त्याबद्दल चिकित्सकपणे विचार करणे समाविष्ट आहे.
- **ओघवते वाचन (अस्खलितपणा) :**
  ओघवते वाचन ही प्रक्रिया अचूक वाचन, आकलन व अभिव्यक्ती या क्षमतांशी निगडित आहे; ज्यामध्ये वाचनात मुलांनी मजकुराचा अर्थ लावत वाचणे अभिप्रेत आहे.
- **शब्दसंग्रह :**
  या संकल्पनेत शब्द आणि शब्दांचा योग्य अर्थ यांबाबतची जाण विकसित होणे अपेक्षित आहे. यामध्ये मुलांना केवळ शब्दच नव्हे तर त्या शब्दांचा आवश्यक असलेला संदर्भ लक्षात येणे गरजेचे आहे. तसेच या घटकात तोंडी शब्दसंग्रह, वाचन/लेखन शब्दसंग्रह आणि शब्द निर्मिती, विश्लेषणाची क्षमता समाविष्ट आहे.
- **लेखन :**
  या क्षेत्रात अक्षर लेखन क्षमता आणि अभिव्यक्त होण्यासाठी अक्षर लेखन आणि शब्द लेखन या बाबी अंतर्भूत होतात. लिहायला शिकणे ही एक विकासात्मक प्रक्रिया आहे.

**वाचन संस्कृती/वाचनाकडे कल :**

या संकल्पनेत मुलांमध्ये वाचनाची आवड विकसित होणे अपेक्षित आहे. यामध्ये मुलांनी विविध प्रकारची पुस्तके, इतर वाचन सामग्री, या बाबी स्वतःहून वाचणे अभिप्रेत आहे.

उपरोक्त मुद्द्यांच्या आधारे आपण पायाभूत भाषा साक्षरतेची संकल्पना संक्षिप्त स्वरूपात लक्षात घेतली. पुढील प्रकरणात पायाभूत भाषा साक्षरतेची संकल्पना व समाविष्ट घटक अधिक विस्तृतपणे समजावून घेऊया.

❑❑❑



**वाचणारी मुले अनेकदा चांगले अध्ययनार्थी बनतात आणि त्यामुळे ती शाळा आणि जीवनाच्या इतर क्षेत्रांत यश मिळवितात.**

**टीप :** शिक्षक मार्गदर्शिकेचे वाचन करत असताना महत्त्वाच्या आशयाच्या मुद्द्यांची नोंद सारांशरूपात शिक्षकांनी या ठिकाणी करावी.

## शिक्षक नोंदी

# २. पायाभूत भाषा साक्षरता : संकल्पना व अध्ययन अनुभव

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० नुसार भारत सरकारने 'निपुण भारत' या अभियानाची सुरुवात करून मुलांच्या पायाभूत भाषा साक्षरतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचललेले आहे. निपुण भारत अभियानांतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता तिसरी पर्यंतच्या टप्प्यावर, सन २०२६ ते २७ पर्यंत पायाभूत भाषिक व गणितीय कौशल्ये प्राप्त करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. या उद्दिष्टांनुसार वय वर्षे तीन ते नऊ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना पायाभूत भाषा साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त होण्यासाठी शाळेतील वर्गावर्गांत याबाबत नियोजनबद्ध कार्यक्रम होणे अपेक्षित आहे.

## २.१ भाषा अध्ययन : एक दैनंदिन प्रक्रिया

मुलांच्या भाषा विकासास सहजपणे सुरुवात होते. भाषा अवगत करणे ही एक दैनंदिन प्रक्रिया असते. मुले दैनंदिन जीवनात त्यांच्या नकळतही भाषेचे अध्ययन करत असतात. ते दैनंदिन जीवनातील संवादात एकाच वेळी विविध भाषांचा वापर करत असतात. आपल्यापेक्षा मोठ्यांना, वडीलधाऱ्यांना, शिक्षकांना बोलताना कोणते संबोधन वापरायचे हे देखील त्यांना माहीत असते. मुले घरातील किंवा आकाशवाणीवरील संभाषण ऐकत असतात, दूरदर्शन वरील कार्यक्रम ऐकत व पाहत असतात. या विविध कार्यक्रमांतून त्यांना भाषेचा परिचय होत असतो. अशा वेळेस या सर्व बाबी नकळत त्यांच्या भाषेच्या विकासाचा एक स्रोतही होऊन जातात.

विविध स्रोतांच्या माध्यमातून मुले स्वतःची भाषा तयार करतात आणि ती भाषा बऱ्याच वेळेस संवादासाठी ते वापरत असतात. मुलांच्या आजूबाजूच्या परिसरात, घरामध्ये भरपूर लिखित साहित्य उपलब्ध असते. उदाहरणार्थ : घरावरील नावाची पाटी, दिनदर्शिका, भांड्यांवर कोरलेले कुटुंब प्रमुखाचे नाव यांसारख्या बाबींचा सुद्धा वापर ते करत असतात. या सर्व बाबींमुळेच शाळेत येण्यापूर्वीच मुलांची वाचन आणि लेखनाची एक समज विकसित झालेली असते. मुलांचे हे पूर्वज्ञान असून त्यांच्या भाषा साक्षरतेचे कौशल्य विकसित करण्यासाठीचा एक पाया मानला जाऊ शकतो.

## २.२ भाषा संपादन

मुलांचा भाषा संपादनाचा प्रवास हा गर्भातून सुरू झालेला असतो आणि त्याच्या संपूर्ण जीवनभर तो चालू असतो. पाच वर्षांपर्यंत मुले त्यांच्या मातृभाषेतील ध्वनीविषयी जागरूक असतात. वयाच्या पुढील टप्प्यावर व्याकरण तसेच भाषेतील संप्रेषण क्षमता ही त्यांनी आत्मसात केलेली असते. या वयाच्या मुलांचा शब्दसंग्रह देखील मोठ्या प्रमाणात असतो त्यामुळे मुले जेव्हा बोलायला शिकतात, तेव्हा ती योग्य पद्धतीने बोलताना दिसतात. मुले जेव्हा नवीन भाषा अवगत करत असतात, तेव्हा सामाजिक संप्रेषणासाठी आणि जीवनानुभवातील आनंद घेण्यासाठी आवश्यक असलेली भाषा अवगत करण्यासाठी मुलांना तशा प्रकारच्या वेगवेगळ्या संधी प्रदान करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

उच्चारांची झालेली जाणीव आणि आत्मसात केलेले शब्दसंग्रह कौशल्य यांचे झालेले विकसन हेच भविष्यातील भाषा सक्षमतेचे मुख्य घटक ठरतात, म्हणूनच मुलांच्या यापूर्वीच्या ज्ञानाचा उपयोग करून त्यांना वेगवेगळे अध्ययन अनुभव देऊन, त्यांच्या भाषा साक्षरतेचा प्रवास किंबहुना भाषा संवर्धनाचा हा प्रवास पुढेपर्यंत नेणे गरजेचे आहे.

## २.३ पायाभूत भाषा साक्षरता विकास दृष्टिकोन

पायाभूत भाषा साक्षरता सक्षम कशी केली जावी याबाबत अलीकडे विविध संशोधने झाली आहेत. मुलांनी फक्त वाचणे किंवा मुलांना लिहिते करणे, हे साक्षरता शिक्षणाचे एकमेव उद्‌दिष्ट नसून, मुलांना भाषेच्या विविध कौशल्यांचा योग्य वापर करण्यास सक्षम करणे हे महत्त्वाचे आणि केंद्रभूत असे उद्‌दिष्ट मानले गेले आहे. भाषा विकासाची सर्व क्षेत्रे परस्परावलंबी व परस्परपूरक आहेत. भाषा कौशल्याचा विकास हा समग्रतेने होतो. आधी वाचायचे, की आधी लिहायचे अशाप्रकारचे प्रश्न हे भाषेच्या विकासामध्ये नसतात. मुले वाचन आणि लेखन ही भाषिक कौशल्ये एकाच वेळी आत्मसात करू शकतात. पाचवीच्या वर्गातील शिक्षकांच्या अनेक सर्वेक्षणावरून असे दिसून आले आहे, की श्रवण, संभाषण, वाचन, लेखन आणि निरीक्षण, चिकित्सक विचार यांसारखी कौशल्ये मुलांमध्ये एकाच वेळी विकसित होत असतात; त्यामुळे भाषेचा विकास होत असताना एकाच पद्‌धतीने होणे अपेक्षित न धरता, हा विकास समग्रतेने व्हावा याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

## २.४ अध्ययन–अध्यापन भाषा विकासातील संतुलित दृष्टिकोन :

निपुण भारत अभियानात भाषा विकासाकरिता संतुलित दृष्टिकोन अशी संकल्पना मांडण्यात आलेली आहे. अलीकडील काळात मुलांना साक्षर करण्यासाठी विविध दृष्टिकोन एकत्र आणण्याचा प्रयत्न करून, सर्वसमावेशक असा दृष्टिकोन विकसित करण्यात आला आहे. याला अध्ययन–अध्यापन भाषा विकासातील संतुलित दृष्टिकोन असे म्हटले गेले आहे

संतुलित दृष्टिकोनामध्ये भाषेचा विकास हा सर्वांगीण पद्‌धतीने झाल्यास, मुलाचे शिक्षण सर्वोत्तम पद्‌धतीने होते या बाबीवर लक्ष केंद्रित केलेले आहे. आजही अनेकदा भाषेचा विकास हा श्रवण, वाचन, भाषण, संभाषण या क्रमाने म्हणजेच पारंपरिक पद्‌धतीने होतो असे मानले जाते, पण भाषेचा विकास हा समग्रतेने होतो. साक्षर होण्यासाठी फक्त वाचन आणि फक्त लेखन या कौशल्यांपेक्षा अधिक व्यापक भाषा कौशल्ये आवश्यक आहेत.

उदा. मुले एकमेकांसोबत संवाद साधत असतात, त्या वेळेस ती एकमेकांचे ऐकत असतात. अशा वेळी मुलांचे श्रवण कौशल्य विकसित होत असते. श्रवणासोबतच मौखिक भाषा क्षेत्राचा विकासही होत असतो. मुले संभाषण करीत असताना त्याच्याही नकळत आरोह अवरोहयुक्त बोलतात. आवाजात चढ–उतार याची दखल घेत बोलतात, त्याचप्रमाणे विरामचिन्हांची दखल घेत, संवाद साधत असतात म्हणजेच पर्यायाने मुलांच्या ओघवते वाचन या वाचन क्षेत्राचाही विकास साधला जातो. एकूणच भाषेचा विकास हा एकरेषीय पद्‌धतीने न होता तो समग्रतेने होत असतो हा भाषेचा संतुलित दृष्टिकोन आहे.

साक्षरतेचा संतुलित दृष्टिकोन यामध्ये शिक्षकांनी काय शिकवायचे, कसे शिकवायचे व ते कशाच्या मदतीने शिकवायचे या बाबींचा समतोल राखणे अपेक्षित आहे. या दृष्टिकोनानुसार प्रत्येक मूल भाषा विकसनाकरिता असलेल्या बहुविध दृष्टिकोनामधील महत्त्वाच्या तत्त्वांचा उपयोग करून आनंददायी आणि तणावमुक्त पद्धतीने शिकणे अपेक्षित आहे.

## २.५ पायाभूत भाषा साक्षरता : ओळख, गरज व अध्ययन अनुभव

- **पायाभूत भाषा साक्षरता संकल्पना :** पायाभूत साक्षरतेमध्ये कोणत्याही भाषेत मौखिक पद्धतीने अभिव्यक्त होता येणे, समजपूर्वक व ओघवत्या स्वरूपात वाचन करता येणे, मजकूर योग्य पद्धतीत लिहिता येणे या संदर्भात आवश्यक मूलभूत कौशल्यांचा समावेश होतो.
- **पायाभूत भाषा साक्षरता कौशल्याची गरज :** पायाभूत भाषा साक्षरता ही केवळ मूलभूत शिक्षणासाठीच नव्हे, तर इयत्तानिहाय व विषयनिहाय परिणामकारक अध्ययन निष्पत्ती प्राप्त करण्यासाठी देखील महत्त्वाची असून ती शिक्षणाचा पाया भक्कम करते. पायाभूत साक्षरता म्हणजे नुसते आकलन कौशल्य नाही, तर सामाजिक, भाषिक आणि मानसिकदृष्ट्या एक गुंतागुंतीची आणि वेगाने घडणारी प्रक्रिया आहे. पायाभूत साक्षरता मुलांना त्यांचे अनुभव तोंडी व लेखी अभिव्यक्तीसाठी, आकलनयुक्त वाचन करण्यासाठीही पूरक ठरते. पायाभूत साक्षरतेच्या योग्य विकसनातून मुलांमध्ये संवाद कौशल्य आणि योग्य सामाजिकता विकसित होते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० च्या मते मुलांच्या मेंदूच्या समग्र विकासातील ८५ टक्क्यांपेक्षा अधिक विकास पहिल्या सहा वर्षांत होतो, त्यामुळे मुलांच्या मेंदूच्या निरोगी विकासाला व वाढीला चालना देणे गरजेचे आहे. शिकण्याच्या प्रारंभिक स्तरावर आकलनयुक्त वाचन, लेखन आणि मूलभूत गणितीय क्रिया करण्याचे कौशल्य संपादित केले, तर इयत्ता तिसरीनंतर असलेल्या अभ्यासक्रमातील अपेक्षित निष्पत्ती प्राप्त करण्यास मूल समर्थ होईल.

## २.६ पायाभूत भाषा साक्षरता समाविष्ट घटक

मुले शाळेत प्रवेश करतात, तेव्हा ती मूलतः थोडी फार भाषा शिकून आलेली असतात, त्याचप्रमाणे त्यांच्या परिसरातील व त्यांच्या भावविश्वाशी निगडित मुद्रित लिखित साहित्याबाबतची त्यांची जाण विकसित झालेली दिसून येते. मुलांच्या प्राथमिक स्वरूपातल्या लेखनाची देखील आपल्याला सुरुवात झालेली दिसून येते; म्हणूनच मूलतः असलेली पायाभूत भाषा साक्षरतेची कल्पना अधिकाधिक दृढ करणे गरजेचे ठरते.

निपुण भारत अभियानांतर्गत भाषा विकासाच्या पुढील टप्प्यावर, पायाभूत भाषा साक्षरतेचा मुख्य उद्देश मुलांचा प्रभावी संवादक म्हणून विकास करणे हा आहे आणि या टप्प्यावर खालील घटकांचा पायाभूत भाषा साक्षरतेच्या संकल्पनेमध्ये भाषा विकास करण्याच्या दृष्टीने समावेश करण्यात आला आहे. यातील प्रत्येक घटकाचा विकास विद्यार्थ्यांमध्ये होणे आवश्यक आहे.




## मौखिक भाषा विकास



वाचन व लेखन कौशल्याच्या विकासासाठी मौखिक भाषा विकास महत्त्वाचा आहे. आपल्या दैनंदिन जीवनात आपण भाषेचा जास्तीत जास्त वापर ऐकणे व बोलणे यासाठी करतो. वेगवेगळ्या प्रसंगी, वेगवेगळ्या वेळी, निरनिराळ्या उद्‌देशाने आपण बोलत असतो. आपले म्हणणे नेमक्या शब्दांत, मुद्‌देसूदपणे व परिणामकारकरीत्या मांडता येणे हा भाषा विकासातील महत्त्वाचा भाग आहे. शाळेत येण्याआधी मुलांचे भाषा शिक्षण नैसर्गिक पद्धतीने सुरू असते. मुले त्यांच्या घरातील मौखिक भाषेचा उत्कृष्ट संग्रह घेऊन आलेली असतात. तथापि, काही मुलांच्या घरच्या आणि शाळेच्या भाषा वेगवेगळ्या असतात. त्या मुलांना शाळेत आल्यानंतर नवीन भाषा आत्मसात करणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे मातृभाषेतून शिकणाऱ्या मुलांना देखील भाषेची योग्य समज व योग्य वापर याकरिता शिक्षकांनी मुलांचा मौखिक भाषा विकास करण्याकरिता विविध अध्ययन–अनुभव देणे महत्त्वाचे ठरते.

मौखिक भाषा विकास क्षेत्रात श्रवण व संभाषण या दोन मुख्य घटकांचा समावेश होतो. या घटकाचा विकास होत असताना खालील क्षमता संवर्धित होतात.




अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या परंतु साध्या-साध्या अध्ययन अनुभवांतून मौखिक भाषा विकासास चालना देता येते. याच्या काही प्रातिनिधिक कृतींची उदाहरणे खालीलप्रमाणे :

- **गप्पागोष्टी :** मुलांच्या मौखिक भाषा विकासाकरिता गप्पागोष्टी हा उपक्रम फायदेशीर ठरतो. शिक्षकांनी मुलांसोबत गप्पागोष्टीस प्रारंभ करावा. मुलांसोबत केलेल्या औपचारिक व अनौपचारिक गप्पागोष्टींमधून मुलांना पाहिलेले, अनुभवलेले प्रसंग, घटना इत्यादींवर विचार करण्याची सवय होईल. स्वतःचे विचार, निरीक्षणे योग्य शब्दात मांडण्याचा प्रयत्न होईल व त्यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढेल.
- **कृतियुक्त गाणी म्हणणे :** शिक्षकांनी मुलांच्या परिसरातील कृतियुक्त गाणी तालासुरात व अभिनयासह म्हणून घ्यावी, यामुळे मुलांना भाषेच्या तालबद्धतेचा आनंददायी अनुभव मिळेल. भाषेतील ध्वनींची जाण विकसित होण्यास मदत होईल व मौखिक भाषाविकासात मदत होईल.
- **अपूर्ण गोष्ट पूर्ण करणे :** या उपक्रमात मुलांना सुरुवातीला दोन-तीन वाक्यांत एखादी छोटी घटना सांगून पुढील गोष्ट पूर्ण करण्यास सांगावे. यामुळे मुले अंदाज करतील, स्वतःचे पूर्वानुभव आठवून त्याआधारे आपली गोष्ट जुळवून सांगण्याचा प्रयत्न करतील. घटनाक्रमाचाही विचार करतील.
- **चित्रमालिकेवरून गोष्ट तयार करणे :** अध्ययन समृद्धी साहित्य संच पेटीत चित्रमालिका दिलेल्या आहेत. अशा चित्रमालिका शिक्षक स्वतःही तयार करू शकतात. चित्रमालिकेवरून मुलांना गोष्ट तयार करून सांगण्याची संधी द्यावी, यामुळे पाहिलेले प्रसंग व घटना यांची क्रमबद्ध मांडणी करण्याची आणि स्वतःच्या भाषेत सांगण्याची संधी त्यांना मिळेल.

- **भाषिक खेळ :** मुलांना खेळ आवडतात याचे कारण खेळांमध्ये मेंदूला आव्हान असते. या खेळांतून मुलांचे शिकणे आपसूकच घडत असते. वन मिनिट शो, शब्द भेंड्या, दिलेल्या शब्दावरून वाक्य सांगणे, थीमच्या संदर्भातील शब्द लिहिणे असे अनेक खेळ आहेत. अशा विविध खेळांमुळे मुलांना दिलेल्या विषयावर योग्य शब्दांची निवड करून बोलण्याची सवय लागेल. विचारांना चालना मिळेल. अंदाज बांधता येईल. वेगवेगळ्या शक्यतांचा विचार करून आपले म्हणणे मांडणे शक्य होईल.
- **चित्रवाचन, चित्रवर्णन, चित्रगप्पा :** मुलांना चित्रे खूप आवडतात. चित्रांवरून मुले पटकन बोलती होतात, मात्र त्यासाठी सुरुवातीला मुलांच्या भावविश्वातील, परिसरातील परिचित विषयांवरील चित्रांची निवड करायला हवी. या चित्रांच्या मदतीने मुलांना स्वतःचे अनुभव, निरीक्षणे सांगण्यास प्रवृत्त करता येते. या कृती वैयक्तिक व सामूहिकरीत्या गटात घेता येतील. या कृतींमुळे निरीक्षण करणे व ते पूर्वानुभवांशी जोडणे, कल्पना करणे यांसाठीच्या अनेक संधी वर्गात निर्माण करता येतील.
- **अनुभव कथन :** मुले घडलेल्या घटना, प्रसंग शाळेत आवडीने सांगतात. हे सांगण्यासाठी आपण वर्गात आवर्जून संधी निर्माण करायला हव्यात. मुले आपल्या बोलण्यामध्ये प्रश्न विचारणे, संवाद साधणे, आपल्या भावना आणि विचार व्यक्त करणे, माहिती मिळविणे, माहिती सांगणे, अनुभव किंवा गोष्टी सांगणे इत्यादी हेतूंनी भाषेचा वापर करताना दिसतात. हेतुतः मुलांना विविध उद्दिष्टांसाठी भाषेचा परिणामकारक वापर करता येण्यासाठी प्रयत्न करणे हे आपले उद्दिष्ट असायला हवे. मुले बोलण्यातूनच शिकत असतात. शिकलेल्या गोष्टी बोलण्यातून दृढ होतात म्हणूनही 'बोलणे' हे शिक्षणाचे महत्त्वाचे साधन आहे हे लक्षात घ्यावे व मुलांना बोलण्याची संधी द्यावी.

## भाषेच्या लेखी रूपाची जाणीव


मुलांच्या पायाभूत भाषा साक्षरतेच्या विकासामध्ये, त्यांना भाषेच्या लेखी रूपाची जाणीव होणे खूप महत्त्वाचे आहे. मुले शाळेत येण्यापूर्वीच परिसरात ऐकण्याचे आणि बोलण्याचे उपयोग कसे होतात हे ऐकत असतात, त्यामुळे मुलांना मौखिक भाषेचा वापर चांगल्या प्रकारे करता येतो. मुलांच्या आजूबाजूला, परिसरात अनेक प्रकारचा लिखित मजकूर, लेखी साहित्य उपलब्ध असते. त्यामुळे त्यांना संबंधित बाबींचा उपयोग जाणीवपूर्वक लक्षात आणून दिल्यास मुलांच्या लेखी मजकुराची जाण विकसित होण्यास मदत होते. आपण जे बोलतो तेच लिहिता येते, लिहिलेले वाचता येते, कोणीतरी आपल्यासाठी ते लिहून ठेवत असते. लिहिलेल्या मजकुराचा आपल्याला दैनंदिन जीवनात उपयोग होतो याची जाणीव होते. लिखित मजकुराच्या अर्थपूर्ण उपयोगाचा हा अनुभव साक्षरतेच्या पहिल्या टप्प्यावर मुलांना मिळायला हवा. लेखी मजकुराच्या जाणीवेमध्ये लेखनाची, वाचण्याची दिशा समजणे, विरामचिन्हांचा उपयोग समजणे, पुस्तक हाताळणे, लेखनाचे विविध उपयोग समजणे इत्यादींचा समावेश होतो.

मुलांच्या अवतीभोवती भाषेचे जे विश्व असते, तेच मुलांना भाषेचे धडे देण्यात एक महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. मुले वाचायला शिकणार ते वाचूनच. यासाठी मुलांच्या आजूबाजूला भरपूर लिखित मजकूर असायला हवा. हा लिहिलेला मजकूर मुलांना आवडेल अशा भाषेत, उत्सुकतेने समजून घ्यावासा वाटेल, असा असायला हवा. त्या मजकुराची मुलांशी आंतरक्रिया व्हायला हवी.

मुलांना भाषेच्या लेखी रूपाची जाणीव होण्यासाठी, तसेच त्यांच्या अर्थपूर्ण वाचन विकासासाठी आवश्यक मजकूर समृद्ध वातावरण खालीलप्रमाणे तयार करता येईल.

- **चित्रे आणि चित्रांची नावे :** भाषेच्या महत्त्वाच्या टप्प्यावर चित्रांची नावे, चित्रांतील व्यक्तींचे बोलणे असे काम सुरू होते. मुलांना कार्टून्स, व्यंगचित्रे अशा स्वरूपातील चित्रे आवडतात. मुले सोबत लिहिलेले शब्द वाचण्याचा प्रयत्न करतात. कधी–कधी इतरांना ते प्रश्नही विचारतात. अशा तऱ्हेने प्रयत्न करणे, प्रश्न विचारणे आणि अर्थ समजून घेणे या सगळ्या टप्प्यांतून मुले आनंददायी वाचनाच्या विश्वात प्रवेश करतात.
- **सूचना :** सूचना लिहिताना छोट्या वाक्यापासून सुरुवात करता येईल. शब्दांचा व मुलांच्या दृष्टीचा आवाका हळूहळू वाढवत नेता येईल. उदा. कचरा कचरापेटीत टाका., चपला रांगेत ठेवा, हळू आवाजात बोला. अशा सूचना योग्य ठिकाणी शाळेत लिहून ठेवता येतील. सुरुवातीला मुलांना त्या सूचना त्या त्या ठिकाणी वाचून दाखवाव्यात, पुढे जाऊन ते स्वतःहून वाचण्याचा प्रयत्न करतील.
- **वर्गातील वस्तूंवर व वस्तूंच्या जवळ त्या वस्तूंच्या नावाच्या पाट्या :** वर्गातील वस्तूंवर, वस्तूंच्या जवळ, वस्तूंच्या नावाच्या पाट्या उदा. दारे, खिडकी याप्रमाणे वाचन कोपरा, पुस्तक पेटी, कचरा पेटी, विज्ञान पेटी अशा वेगवेगळ्या पाट्या मुलांच्या नजरेस येतील अशा लावून ठेवता येतील. अधूनमधून सहजपणे, 'इथे या वस्तूचे नाव लिहिले आहे' असे म्हणत मुलांचे त्याकडे लक्ष वेधावे.
- **मुलांनी सांगितलेले मुलांसाठी लिहिणे :** मुलांनी सांगितलेले मुलांसाठी लिहिणे ही कृती महत्त्वाची आहे. आपण नेहमी आपल्याला जे योग्य वाटते, ते मुलांना लिहायला सांगतो; पण वेगवेगळ्या कृतींमध्ये मुलांनी सांगितलेले फळ्यावर, कार्डशीटवर किंवा वर्गात यासाठी खास राखून ठेवलेल्या जागेवर लिहिता येईल. त्यामुळे पुढे काही दिवस ते मुलांना ओळखण्यासाठी व वाचनासाठी उपलब्ध राहील उदा. घटनाक्रमासाठी एखादी पाककृती करण्यासाठी चिरणे, मिसळणे, ढवळणे, कुटणे, किसणे अशी वेगवेगळी क्रियापदे तसेच वस्तूंची नावे मुले सांगतात. ती लिहिली की मुलांच्या नजरेसमोर राहतात. 'हे मी सांगितलेले आहे' असे मित्रांना दाखवत राहतात, त्याकडे पाहत राहतात. मी सांगितलेले लिहिले जाण्याचा आणि ते वाचण्याचा अनुभव हा मुलांना आनंद देऊन जातो. यामुळे मुलांसाठी लेखी मजकुराचे जग खुले होते. लेखी मजकुराशी जवळीक वाढते. आपल्याही वर्गात अशाप्रकारे लिहून दाखवायच्या संधी येतात. त्याचा पुरेपूर उपयोग करून घेऊन, शिक्षक वर्गातील वातावरण मजकूर समृद्ध बनवू शकतात.

उपस्थिती पत्रक : शिक्षक मुलांची हजेरी उपस्थिती पत्रकातून भरत असतात. असाच हजेरी तक्ता वर्गात लावला, तर मुले स्वतःची हजेरी स्वतःच नोंदवतील.




**गाणे :** मुलांबरोबर वर्गात घेण्यात येणारी गाणी वर्गात मोठ्या अक्षरात लिहून ठेवा व बोट ठेवत म्हणण्यास प्रवृत्त करा.

**शुभेच्छा संदेश :** वर्गातील मुलामुलींच्या वाढदिवसासाठीचे संदेश, मुलांसाठी विशेष शाबासकी, फळ्यावर लिहून ठेवा.

**दिनदर्शिका :** याच्या साहाय्याने मुलांना वार, दिनांक, महिना व वर्ष पाहण्याची सवय लावता येईल. दिनदर्शिकेतून काल, आज व उद्या कोणता वार असेल असे प्रश्न विचारा. अशा प्रश्नोत्तरांतून लेखी मजकुराच्या उपयुक्ततेबरोबरच काळाचे भान विकसित करण्यास मदत होईल.

**वाचन कोपरा :** रंगीबेरंगी पुस्तके, सजलेली पुस्तके मुलांसाठी तयार केलेल्या पुस्तिका या वर्गाच्या एखाद्या कोपऱ्यात लटकवून ठेवाव्यात. ही पुस्तके मुलांच्या सहज हाताला येतील अशा उंचीवर टांगून ठेवलेली असावीत, त्यामुळे मुलांना हवे तेव्हा ती पुस्तके घेता येतील व हाताळता येतील. यामुळे मुलांमध्ये पुस्तके पाहण्याची, हाताळण्याची आवड निर्माण होईल. अशा वेळी त्यांना सहज उपलब्ध होतील अशी पुस्तके त्यांच्या अवतीभोवती असतील, तर वाचनाच्या आवडीस आणखी प्रोत्साहन मिळेल.




**सहभागी वाचन :** मुलांना लिपी परिचय करून देणे हा सहभागी वाचनाचा मूळ हेतू आहे. सहभागी वाचनात मुलांचा सहभाग घेत घेत वाचन केले जाते. अगदी लहान वयात मुलांना भाषेची जाण यावी, यासाठी सहभागी वाचन मुलांसोबत करायला हवे. जे बोलतो, ते लिखित स्वरूपात जपून ठेवता येते व पुन्हा वाचता येते याचा अनुभव मुलांना मिळणे गरजेचे आहे. साक्षर वातावरणातून न येणाऱ्या मुलांसाठी तो अनुभव खूप महत्त्वाचा असतो. छापील मजकूर वाचताना डावीकडून उजवीकडे वाचला जातो. एक ओळ संपल्यावर खालची ओळ वाचली जाते; म्हणजे वाचनाची दिशा ही डावीकडून उजवीकडे व वरून खाली अशी असते, लेखी भाषेत सुटी- सुटी वाक्ये असतात; ती विरामचिन्हाने दाखवली जातात. शब्द सुटे असतात, दोन

शब्दांमध्ये अंतर असते, वाचताना आरोह–अवरोह वापरले जातात ही सर्व लिखित भाषेची वैशिष्ट्ये मुलांना लक्षात यावीत या उद्देशांसाठी सहभागी वाचन केले जाते.

लिखित भाषेबद्दलची ही जाण निर्माण होण्याच्या दृष्टीने, सहभागी वाचन करण्यासाठी वापरले जाणारे साहित्यही त्याला साजेसे असावे लागते. त्यासाठी तुलनेने लहान, पण एकसंध असा मजकूर असावा लागतो. शब्दांचा आकार हा मोठा असावा लागतो. सहभागी वाचनासाठी साधारणतः मोठी चित्रे असलेली गोष्टींची पुस्तके वापरणे अधिक सोईस्कर ठरते. त्यासाठी पुस्तकांचा आकार मोठा असावा. साधारणतः पुस्तकाच्या एका पानाचा ७५ टक्के भाग हा चित्रांनी व्यापलेला असावा व २५ टक्के भागात मजकूर असावा. मजकुरात शब्दांची पुनरावृत्ती असावी. वाचन करताना शब्दांवर बोट ठेवत, मुलांच्या दिशेला, मजकूर दिसेल अशा पद्धतीने शिक्षकांनी पुस्तक धरावे व मुलांचा सहभाग घेत वाचन करावे. मुलांसोबत सहभागी वाचन करताना, शिक्षकांनी त्याचे आधी नियोजन केलेले असणे खूप महत्त्वाचे ठरते. सहभागी वाचन करताना, एकच गोष्टीचे पुस्तक छोटी छोटी उद्दिष्टे ठेवून चार–पाच दिवस वापरता येते.

## सहभागी वाचन कसे घ्यावे?

एका पुस्तकाचे सहभागी वाचन किमान ४ ते ५ दिवस करणे अपेक्षित असून, प्रत्येक दिवसाचा सहभागी वाचनाचा उद्देश वेगळा असतो. मुले वाचती होईपर्यंत सहभागी वाचनाची दिवसनिहाय उद्दिष्टे कोणती असावीत व त्यासाठी वर्गात काय घडावे याचा उदाहरणादाखल नमुना पुढे दिला आहे.

**दिवस पहिला :**

**उद्दिष्टे :**

१) आनंद मिळणे, २) मुखपष्ठावरून गोष्टीचा अंदाज करता येणे, ३) पुस्तकातील चित्रावरून गोष्टीचा अंदाज करता येणे.

शिक्षकांनी मुलांना गोष्टीच्या पुस्तकाचे मुखपृष्ठ दाखवावे, त्यावरील चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे, 'मी तुम्हांला या पुस्तकातून एक गोष्ट वाचून दाखविणार आहे, पण त्या आधी तुम्ही हे चित्र पहा. चित्रात काय काय दिसत आहे ते सांगा.' या चित्रावरून गोष्टीचे नाव काय असेल? असा प्रश्न विचारून अंदाज करायला लावावा. गोष्ट कोणाची असेल असे तुम्हांला वाटते? असा प्रश्न विचारून मुलांना व्यक्त होऊ द्यावे. नंतर पुस्तकाचे एक एक पान उलटत, आतील पृष्ठांवरील चित्रे एका नंतर एक दाखवावीत. चित्रांवरून मुलांना गोष्टीचा अंदाज करता येतो का, ते पहावे. उदा. हे कोण आहे? इथे काय घडत आहे? एखाद्या पानावरचे पिलाचे चित्र दाखवून, हे पिलू काय म्हणाले असेल? असे काही प्रश्न मुलांना विचारावे.

पुढच्या पानावरील चित्रात मुलांना गोष्ट पुढे गेलेली दिसते. या पुस्तकातील चित्रे एकच गोष्ट पुढे पुढे सांगत आहेत, हे नकळतपणे मुलांच्या लक्षात आणून द्यावे. एकेक पान उलटत पुढे काय घडले असेल याचा अंदाज करायला सांगावे. मुलांनी सांगितलेले अंदाज फळ्यावर लिहावेत.

संपूर्ण पुस्तक दाखवून झाले, की मग त्या पुस्तकाचे मुखपृष्ठ दाखवून मुलांना सांगावे.

'आता मी या पुस्तकात लिहिलेली गोष्ट तुम्हांला वाचून दाखविणार आहे. गोष्टीचे नाव आहे........' नंतर पुस्तकाचे एक एक पान उलटत पूर्ण गोष्ट वाचून दाखवावी. वाचताना वाक्यातील शब्दांखाली बोट/पट्टी/

पेन्सिल ठेवत वाचावे. (सुरुवातीची ४–५ पुस्तके) आवाजात योग्य ते चढ–उतार करावेत. योग्य जागी विराम घ्यावा. यामुळे मुले शब्द, आवाज यांतील संगती शिकतील. नंतर मुलांना गोष्टीचे चित्र काढण्यास सांगावे.

**दिवस दुसरा :**

**उद्दिष्टे :**

१) आनंद मिळणे, २) लेखक, चित्रकार यांची माहिती घेणे, ३) पुढील मजकुराचा अंदाज करता येणे.

दुसऱ्या दिवशी मुलांनी काढलेल्या चित्रांवर गप्पा माराव्यात. मग म्हणावे, 'काल आपण जी गोष्ट वाचली ती मी आज परत वाचून दाखविणार आहे. गोष्टीचे नाव आहे ..........' थेट वाचनाला सुरुवात करून स्वराघातासह चार – पाच पाने वाचून झाल्यावर पुढील प्रत्येक पृष्ठावर आता पुढे काय लिहिले असेल? असा प्रश्न विचारून मजकुराचा अंदाज करायला लावावा. आवश्यकता वाटल्यास एक गोष्ट सलग पुन्हा वाचून दाखवावी.

गोष्ट वाचून झाल्यावर मुलांना लेखक, चित्रकार यांच्याविषयी माहिती द्यावी. त्यासाठी, ''आपण ज्या गोष्टी वाचतो, त्या आपल्यासाठी ज्या कोणी लिहून ठेवलेल्या असतील, त्यांना लेखक म्हणतात. या गोष्टीच्या लेखकाचे नाव इथे लिहिले आहे. (बोटाने दाखवावे) लेखकाचे नाव ........................ हे आहे. त्याचप्रमाणे चित्रकाराचीही ओळख करून द्यावी. लेखक, चित्रकाराविषयी अधिक माहिती दिली असल्यास ती वाचून दाखवावी. विद्यार्थ्यांना हीच गोष्ट मित्रांना वा घरी सांगण्यास सांगावे.

**दिवस तिसरा :**

**उद्दिष्टे :**

१) पूर्णविराम व स्वल्पविराम चिन्हांची ओळख होणे व त्यांचे कार्य समजणे.

२) अवतरण चिन्हाची ओळख होणे व त्याचे कार्य समजणे. (आवाजात बदल केला, तर त्याचा अर्थ लागतो हे समजणे.)

तिसऱ्या दिवशीही गोष्ट पूर्ण वाचून दाखवायची. ''आता वाचताना मी कोठे थोडा वेळ थांबतो, कोठे जास्त वेळ थांबतो, माझा आवाज कोठे बदलतो आहे यावर लक्ष ठेवा,'' असे सांगून गोष्ट सांगण्यास सुरुवात करावी. दोन–तीन पाने वाचून झाल्यावर हे टिंब दिले आहे. हे इथे का दिले असेल, तसेच स्वल्पविरामाजवळही कसे थोडे थांबले जाते हे लक्षात आणून दयावे. तसेच अवतरण चिन्हाचा परिचय करून देताना, एखाद्या पात्राने बोललेले वाक्य कोणते असावे, ते पुस्तकात कोठे लिहिले आहे याचा अंदाज करायला लावावा. त्या वाक्याच्या सुरुवातीला व शेवटी आलेल्या चिन्हाकडे लक्ष वेधावे. एखाद्याच्या तोंडचे वाक्य असे वाचावे, याकडे लक्ष वेधावे. अशी चिन्हे आणखी कोठे आली आहेत हे शोधायला लावावे. चिन्हाची ओळख करून देताना त्याच्या नावापेक्षा त्याच्या उपयोगाकडे अधिक लक्ष वेधावे.

आता विद्यार्थ्यांना गोष्ट वाचून दाखविताना कमी/अधिक थांबणे. (स्वल्पविराम, पूर्णविराम) पात्रानुसार आवाजात बदल करणे. (अवतरण चिन्ह) हे लक्षात आणून द्यावे.

**दिवस चौथा :**

**उद्‌दिष्टे :** १) मुखपृष्ठ, मलपृष्ठ यांची माहिती होणे. २) चित्रातील बारकावे लक्षात घेणे.

चौथ्या दिवशी मुलांना तेच पुस्तक परत दाखवून मुखपृष्ठ, मलपृष्ठ यांची ओळख करून द्यावी; त्यासाठी गोष्टीचे नाव काय? ते कोठे लिहिलेले दिसते? गोष्ट कोणी लिहिली आहे? त्यांचे नाव कोठे लिहिले आहे? चित्रकाराचे नाव काय आहे व ते कोठे लिहिले आहे? या सर्व बाबी विचारून या सर्व बाबी मुखपृष्ठावर असतात तसेच लेखक, चित्रकार यांच्याविषयी जास्तीची माहिती कुठे लिहिली आहे हे निदर्शनास आणून देऊन मलपृष्ठाची ओळख करून द्यावी. चित्रातील बारकावे शोधण्यासाठी..... येथे हा काय करतोय? त्याला काय दिसले, काय सापडले आहे? यांसारखे प्रश्न विचारावेत. गोष्टीच्या पुस्तकाप्रमाणे त्यांना स्वतःला चित्र काढायला, त्याला नाव द्यायला व स्वतःची गोष्टीची छोटी वही/पुस्तक तयार करण्यास प्रोत्साहन द्यावे.

**दिवस पाचवा :**

**उद्‌दिष्ट :** मुलांनी गोष्टीतील मुख्य घटनाक्रम सांगणे. (चित्रकार्डाच्या साहाय्याने)

गोष्टीच्या चार-पाच प्रमुख घटनाक्रमांची चित्रकार्डे स्वतः तयार करावीत. मुलांकडून ती चित्रकार्डे क्रमाने लावण्याचा खेळ खेळून घ्यावा. सुरुवातीला काय झाले, मग काय झाले, हे चित्र पाहून सांगण्यास सांगावे. नंतर चित्रकार्डाशिवाय सुरुवातीला काय झाले? त्यानंतर काय झाले? मग काय झाले? यांसारखे प्रश्न विचारून मुलांनी सांगितलेला घटनाक्रम फळ्यावर लिहावा आणि तो वाचून दाखवावा.

आपण काढलेल्या चित्रांखाली असाच मजकूर लिहिण्यास सांगावा. लिपी परिचय होण्यापूर्वी मुले त्यांच्या पद्धतीने गिरगिटतील. त्यांनी काय लिहिले आहे हे विचारून घ्यावे.

विद्यार्थिसंख्या जास्त असल्यास पुस्तकाच्या आकारानुसार, दहा ते वीस विद्यार्थ्यांचे गट करून सहभागी वाचन घ्यावे.

**सहभागी वाचनामुळे हे घडते :**

- पुस्तकातील मजकूर मुलांच्या भावविश्वाशी निगडित असतो, त्यामुळे मुले आपले अनुभव पुस्तकाशी जोडून पाहतात.
- मुलांना पुस्तकातील चित्रे आकर्षित करतात, त्या चित्रांवर मुले भरभरून बोलतात. अंदाज करतात. नकळतपणे चित्र वाचनात घडणाऱ्या सर्व गोष्टी यामध्ये घडतात.
- चित्रात गोष्ट असते आणि सोबत मजकुरातही तीच गोष्ट असते, हे समजल्यावर चित्र आणि मजकूर यांत सहसंबंध असतो याची जाणीव मुलांना होते.
- चित्रांमुळे मुलांना अर्थ लावायला मदत होते.
- काही चित्रांखालील मजकुरात चित्रांविषयी लिहिलेले असते, हे समजल्यावर वाचता न येताही पुढे चित्रांत काय लिहिले असेल याचा अंदाज करून मुले वाचू लागतात.
- मजकूर विरामचिन्हयुक्त असेल तर मुलांची विराम-चिन्हांविषयीची जाणीवही विकसित होत जाते.
- आकलनयुक्त वाचनाची पूर्वतयारी यामुळे उत्तम प्रकारे होते.

## भाषेतील ध्वनींची जाण

या क्षेत्रामध्ये भाषेतील विविध शब्दांचा अर्थपूर्ण वापर होत असताना, अक्षरातील ध्वनीची जाणीव, त्यातील शब्दांची जाणीव, यमकाची जाणीव या क्षमता अंतर्भूत आहेत.

यामध्ये मुलांना भाषेच्या ध्वनी संरचनेची (उच्चारांची) समज येणे अपेक्षित आहे. मौखिक भाषेतील शब्दांचे ध्वनी, ध्वनीचा भाषेच्या सांकेतिक प्रणालीशी असलेला सहसंबंध यांबाबत विचार करण्याची क्षमता या बाबी यात समाविष्ट आहेत. ध्वनी जागरूकतेचा विकास करताना वाक्य शब्दांनी बनतात. शब्द वेगवेगळ्या अक्षरांनी बनतात व अक्षरांमध्ये त्यांचे ध्वनी समाविष्ट असतात, या बाबी मुलांच्या लक्षात आणून देणे गरजेचे आहे.

सामान्यत: ध्वनी जागरूकतेत खालील टप्पे अंतर्भूत होतात.

समान ध्वनी असणारे शब्द समजणे.
उदा. येणे – जाणे

वाक्यात असणारे वेगवेगळे शब्द समजणे.
उदा. कमल पाणी आण.
कमला/पाणी/आण

शब्दामध्ये वेगवेगळी अक्षरे असतात हे समजणे.
उदा. क/म/ल/
पाणी/आणा

अक्षरांमधील ध्वनींची जाणीव असणे.
उदा. क अक्षरासाठी असणारा 'क' हा ध्वनि

मुलांमध्ये भाषेतील ध्वनीची जाण निर्माण करत असताना, शिक्षकांनी मौखिक स्वरूपातील कृती घेणे गरजेचे आहे. ध्वनीची जाण विकसित करताना मुलांना एखाद्या मजकुराचे, वाक्याचे वाचन तसेच लेखन करता येणे हे अपेक्षित नसून, त्यातील शब्दातील अक्षरांच्या ध्वनींची जाण येणे महत्त्वाचे आहे. भाषेतील ध्वनीची जाण विकसित करताना शिक्षकांनी मुलांच्या भावविश्वातील व त्यांना परिचित असणाऱ्या शब्दांचा वापर अधिकाधिक करावा.

**खाली काही नमुन्यादाखल दिलेल्या अध्ययन अनुभवांद्वारे आपल्याला मुलांमध्ये ध्वनीविषयक जागरूकता निर्माण करता येईल.**

- **वाक्यातील शब्द सुटे करणे :** एक वाक्य सांगून त्यातील एका शब्दासाठी पुढीलप्रमाणे एक टाळी वाजवणे अथवा एक उडी मारणे; असा वाक्यातील शब्द सुटे करण्याचा खेळ पुढील प्रकारे घ्यावा. माझे (टाळी), नाव (टाळी), रमेश (टाळी), आहे (टाळी)

  दोन तीन वेळा शिक्षकांनी सराव करून घ्यावा व नंतर सलग वाक्य मुलांना सांगून ते वाक्य सुटे सुटे करून सांगण्यास सांगावे.
- **शब्दातील आवाज सुटे करणे :** (शब्द जोडणे, शब्द तोडणे)

  वरील प्रमाणेच शब्दातील आवाज सुटे करण्याचा खेळ घ्यावा.

  जसे – टे (टाळी), ब (टाळी), ल (टाळी)

सुटा करून सांगितलेला शब्द जोडून सांगणे. जसे : क – पा – ट असे सांगितल्यावर कपाट असे एकत्रित करून सांगणे अपेक्षित आहे.

- **शब्दांच्या सुरुवातीचा व शेवटचा आवाज ओळखणे :** मुलांना प्रथमतः एक शब्द सांगावा व मुलांना शब्दाच्या सुरुवातीचा व शेवटचा ध्वनी/आवाज ओळखावयास सांगा. अशा प्रकारची कृती राबविता येईल.

## विसांकेतीकरण (Decoding)

मुलांचा भाषिक विकास होण्याकरिता विसांकेतीकरण (Decoding) ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. मुलाच्या वाचन संस्कृतीच्या विकसनातील एक महत्त्वाचा पायाभूत घटक म्हणजे विसांकेतीकरण होय.

विसांकेतीकरण (Decoding) म्हणजे ध्वनी व ध्वनिचिन्ह (अक्षर) यांच्यामधील सहसंबंधाविषयी असलेल्या ज्ञानाच्या आधारे, छापील किंवा लिहिलेल्या मजकुरातील शब्दांचा, वाक्यांचा अचूक उच्चार करणे होय. विसांकेतीकरण ही प्रक्रिया खालील उदाहरणाद्वारे अधिक स्पष्ट केलेली आहे.

उदा. अपरिचित भाषेतील देवनागरीमध्ये लिहिलेला मजकूर आपणास उच्चारता येईल, वाचता येणार नाही.

**उदा. एनक्कू एन पळ्ळी मिहवूम पिटीक्कुम**

वरील अपरिचित भाषेतील देवनागरीमध्ये लिहिलेला मजकूर आपणास उच्चारता आल्यामुळे या ठिकाणी विसांकेतीकरण (Decoding) प्रक्रिया होते.

हेच वाक्य संबंधित भाषेच्या लिपीमध्ये लिहिल्यास पुढीलप्रमाणे होते.

**எனக்கு என் பள்ளி மிகவும் பிடிக்கும்**

उपरोक्त वाक्यातील लिपी आपणास अपरिचित असल्याने या ठिकाणी विसांकेतीकरण **(Decoding)** प्रक्रिया होत नाही.

वाचन करताना वाचक अनेक स्तरांवर काम करत असतो. छापील मजकुराची जाण, विसांकेतीकरण (Decoding), पूर्वानुभव, आजूबाजूची परिस्थिती या सर्वांचा एकत्रित विचार करून वाचनाची प्रक्रिया घडते, म्हणजेच चिन्ह ओळखणे आणि त्याचा अर्थ लावण्याची प्रक्रिया मनात एकाच वेळी सुरू असते. वरील देवनागरी लिपीत लिहिलेले तमिळ भाषेतील वाक्य विसांकेतीकरण (Decoding) झाल्यामुळे उच्चारता आले. लिपी परिचय वाचता येण्यासाठी आवश्यक आहे, मात्र केवळ लिपी परिचय झाला म्हणजे वाचता आले असे नाही.


वरील वाक्य मराठीमध्ये असे होते : **मला माझी शाळा खूप आवडते.**

हे वाक्य आपणास उच्चारता येते आणि त्या वाक्याचा अर्थही समजतो, म्हणजेच यावेळी विसांकेतीकरण (Decoding) प्रक्रिया होते तसेच वाचनही घडते, म्हणूनच ज्या शब्दांचा अर्थ मुलांना ऐकून समजतो आणि जे

शब्द बोलताना वापरले जातात त्या शब्दांच्या साहाय्याने विसांकेतीकरण (Decoding) केले, तर मुले जलद गतीने वाचायला शिकतात असा सार्वत्रिक अनुभव आहे.

**विसांकेतीकरण करत असताना खालील प्रक्रिया घडत असतात :**

**विसांकेतीकरण (Decoding)**




उपरोक्त दोन्ही प्रक्रिया या परस्परावलंबी असून, या दोन्ही प्रक्रियांवर एकाच वेळी काम होणे गरजेचे आहे. या प्रक्रियांवर काम करताना खालील बाबींचा विचार केल्यास, ते अधिक फायदेशीर ठरेल. मुलांसोबत विसांकेतीकरण (Decoding) या बाबीवर काम करताना अक्षरचिन्हांच्या ध्वनींची ओळख, अक्षरांचा परिचय, एखादे अक्षर इतर अक्षरांशी जोडून तयार होणाऱ्या शब्दांचे वाचन, शब्द वाचनाचा सराव व मुलांना डिकोडिंग करता येतील अशा वाचन पाठांचे वाचन करण्याची संधी प्रदान करणे अशा बाबी लक्षात घेतल्यास ते अधिक उपयुक्त होईल.

## आकलनयुक्त वाचन

आकलनात्मक वाचनास समजपूर्वक वाचन असेही म्हणता येईल. यामध्ये मजकुरातील माहिती समजून घेणे, मजकुरातून अर्थ काढणे आणि त्याबद्दल चिकित्सकपणे विचार करणे या बाबी समाविष्ट आहेत. आकलनात्मक वाचनात मुले मजकूर समजून घेऊ शकतात. आकलनयुक्त वाचन संकल्पनेत विस्तार करणे, उदाहरण देणे, तर्क करणे, अनुमान काढणे, अंदाज लावणे, वाचलेल्या मजकुरातून सारांश काढणे यांसारख्या बाबी समाविष्ट होतात. वाचन ही अर्थ निर्माण करण्याची प्रक्रिया असून आकलनयुक्त वाचन हा वाचनाचा अविभाज्य भाग आहे. वाचनाच्या प्रक्रियेत अनेक बाबी समाविष्ट असतात.

जसे : वाचन करताना :

- वाचताना मुले पुढे कोणता शब्द येईल अथवा कोणते वाक्य येऊ शकते याबाबत अंदाज बांधू शकतात
- आकलनामध्ये मुले चित्र आणि आणि मजकुराचा आशय समजून घेण्याचा प्रयत्न करतात.
- स्व–सुधारणा : मुले बऱ्याचदा स्व–सुधारणाही करतात; म्हणजेच या बाबीमध्ये मुले एखादा मजकुर पुन्हा–पुन्हा वाचण्याचा प्रयत्न करतात. तसेच काही वेळेस स्वत:चे उच्चारही सुधारण्याचा प्रयत्न करतात. उदाहरणार्थ – समजा एखाद्या मुलाने 'मंटू बोकडी तलावाच्या काठी बसली होती' असे वाचले. या वाक्याचा अर्थ न लागल्याने परत मागे जाऊन हेच वाक्य 'मंटू बेडकी तलावाच्या काठी बसली होती.' असे वाचले तर बोकडीचे बेडकी करणे याला स्व–सुधारणा म्हणायचे.

- अर्थ तयार करणे : आकलनयुक्त वाचनाकरिता मुले मजकूर वाचत असताना, मजकुराचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतात.
- **अक्षरगटाच्या आधारे वाचन अनुभव – वाचन विकासासाठीचा महत्त्वाचा उपक्रम :**

  आकलनयुक्त वाचनाकरिता अक्षरगटाचा वापर करून मुलांना शिकविणे अधिक फायद्याचे ठरेल. चार ते पाच वेगवेगळी मुळाक्षरे आणि स्वरचिन्हे यांचा एक गट करायचा. या गटास 'अक्षरगट' असे म्हणता येईल. या अक्षरगटाचा मुलांना परिचय करून द्यावा. त्यावर आधारित विविध शब्द, अर्थपूर्ण वाक्ये मुलांकडून तयार करून घ्यावीत व त्या आधारे मुलांना छोटा मजकूर वाचावयास द्यावा. आता, उदाहरणादाखल खालील अक्षरगट पहा.

उदा. क, म, ल, आ

संबंधित गटातील अक्षरांपासून विविध शब्द तयार होतात हे मुलांना समजून द्यावे. उदा. कमल, मामा, लाल, मका व मुलांना असे शब्द तयार करण्याचा प्रयत्न करावयास सांगावे. पुढील प्रक्रियेत मुलांना या शब्दापासून अर्थपूर्ण मजकूर तयार करण्याचा प्रयत्न करावयास सांगावे व गरज भासल्यास त्यांना मदत करावी.

उदा. काका आला, मामा आला. लाला आला.

याच्या पुढील टप्प्यावर म्हणजेच मुलांचे वाचून झाल्यानंतर त्यांना समजले का हे जाणून घेण्यासाठी त्यावर आधारित काही प्रश्न विचारावेत. उदा. कोण कोण आले आहेत? किती जण आले आहेत? असे प्रश्न विचारता येतील. याशिवाय मुलांनी विचार करावा व स्वानुभवांची सांगड घालावी याकरिता ही सगळी मंडळी कशासाठी आली असतील? कार्यक्रम कोणता असू शकेल असे प्रश्नही विचारता येतील. जसजसे अक्षरगट शिकवून होतील तसतसे पुढे शब्द व वाक्य तयार करणे अधिक सुलभ होत जाते.

अक्षरगट निवडून शिकवण्यामुळे मुलांना चार–पाच मुळाक्षरे व एक, दोन स्वरचिन्हे समजून शिकता येतील. अक्षरगटापासून स्वतः तयार केलेले शब्द वाचता येतील, शब्दांपासून छोटी वाक्ये तयार करून वाचता येतील, तसेच मुलांना वाक्यापासून तयार झालेला अर्थपूर्ण मजकूर वाचण्याचा अनुभव मिळेल.

आकलनयुक्त वाचन विकसित होण्यासाठी सुरुवातीच्या टप्प्यावर सहभागी वाचनाची कृती उपयोगी पडते.

## ओघवते वाचन (अस्खलितपणा)



अनेकदा मुले शब्दातील सुटी सुटी अक्षरे कष्टपूर्वक वाचतात. त्यामुळे मजकुराचा अर्थ लावण्याच्या प्रक्रियेत अडथळा जाणवतो. वाक्याचा अर्थ समजण्यासाठी मुलांना त्या मजकुराचे विसांकेतीकरण जलदगतीने करता येणे आवश्यक आहे; म्हणूनच ओघवत्या वाचनाचा व आकलनाचा सहसंबंध आहे. ओघवत्या वाचनात वाचनाची गती ही बाब महत्त्वाची आहे. वाचन करताना मुलाने योग्य गतीने, आरोह–अवरोहयुक्त वाचन, शब्दातील चढ–उतारांसह वाचन, तसेच विरामचिन्हांची दखल घेत केलेले वाचन या बाबींचा समावेश होतो; म्हणून मुलांचे ओघवते वाचन घेत असताना या बाबी शिक्षकांनी लक्षात घ्याव्यात.

**मुलांच्या वाचनाला ओघवते करण्याकरिता खालीलप्रमाणे अध्ययन अनुभव देता येतील.**




- **प्रकट वाचन :** यामध्ये शिक्षकांनी पुस्तकातून मुलांच्या भावविश्वातील, मुलांना आवडेल अशी कथा निवडावी आणि मुलांना ती मोठ्या आवाजात वाचून दाखवावी. प्रकट वाचन करीत असताना शिक्षकांनी स्वरातील चढ-उतार, ध्वनी, वाचनाचा वेग, आवाजातील विविधता, योग्य त्या ठिकाणी आवश्यक असलेला विराम, प्रश्न, आवश्यक असलेल्या टिपण्या यांचा प्रभावी वापर करावा. मोठ्याने वाचन केल्यामुळे मुलांचे श्रवण कौशल्य विकसित होते व वाचनातील बारकावे लक्षात आल्याने, स्वतः वाचन करताना या बाबी मुलांच्या लक्षात येतात.
- **मार्गदर्शन वाचन :** मार्गदर्शित वाचनाच्या नियोजनात साधारणतः आधी दिलेला मजकूर मुलांनी वाचणे, त्यातील नवीन शब्द अधोरेखित करणे, वाचलेल्या मजकुरातून मुलांना काय समजले हे मुलांनी त्यांच्या शब्दांत सांगणे, त्यानंतर मुलांना अवघड वाटलेल्या शब्दांवर चर्चा करणे व अर्थ समजून घेणे, नंतर शिक्षकांनी मजकुराचे ओघवते वाचन करून दाखविणे आणि शेवटच्या टप्प्यावर पुन्हा मुलांनी त्यांच्या काय लक्षात आले, ते आपल्या शब्दांत सांगणे आणि अगदी शेवटी मुलांसोबत प्रश्नोत्तरांवर चर्चा असा क्रम असावा.
- **स्वतंत्र वाचन :** लिपी परिचयाला सुरुवात झाल्यानंतर अगदी काही दिवसांमध्ये ठरावीक अक्षरे आणि स्वरचिन्हांची ओळख झाली, की मुलांना आपण त्यापासून तयार होणारे शब्द व वाक्ये स्वतंत्रपणे वाचायला उपलब्ध करून द्यावीत; जसजसा मुलांना अक्षरे व स्वरचिन्हांचा परिचय होत जाईल, तसतसा त्या अक्षरगटांचा समावेश करत, भरपूर प्रमाणात नियंत्रित वाचनपाठ तयार करता येतात. प्रत्येक मुलाच्या वाचनस्तरानुसार हे स्तरित वाचनसाहित्य असायला हवे. यात शब्द कार्ड, वाक्य कार्ड व अगदी काही वाक्यांचा मिळून तयार होणारा मजकूर यांचा समावेश असायला हवा. हे स्तरित वाचनसाहित्य मुलांच्या संख्येनुसार वर्गात उपलब्ध करून द्यायला हवे. स्वतंत्र वाचन मुले जोडीने किंवा गटातही करू शकतात. अशा नियंत्रित मजकुरासोबतच मुलांना गोष्टींची पुस्तकेही स्वतंत्रपणे हाताळायला द्यावीत. दिवसभराच्या तसेच आठवड्याच्या एकूण नियोजनात, अशा स्वतंत्र वाचनासाठी वेळ राखून ठेवायला हवा. कधी कधी मुलांनी असे स्वतंत्रपणे वाचन केले, की शिक्षकांनी मुलांशी बोलून-काय वाचलेस ते मला सांग? अशाप्रकारे मुलांशी संवाद साधावा, म्हणजे मुले योग्य प्रकारे वाचन करीत आहेत का? हे शिक्षकांना स्पष्ट होईल किंवा कळेल व पुढील दिशा मिळेल.

## शब्दसंग्रह

या संकल्पनेत शब्द आणि शब्दांचा योग्य अर्थ या बाबतची जाण विकसित होणे अपेक्षित आहे. यामध्ये मुलांना केवळ शब्द नव्हे, तर त्या शब्दांचा आवश्यक असलेला संदर्भ लक्षात येणे गरजेचे आहे. मुलांना शब्दांचे संदर्भासह आकलन करता आल्यास, तो शब्द मुलांना लेखी किंवा मौखिक अभिव्यक्ती करताना योग्य त्या संदर्भासह वापरता येईल. मुलांचा शब्दसंग्रह वाढविण्याकरिता खालील अध्ययन अनुभव देता येतील :

- **शब्दभेंड्या :** सुरुवातीस मुलांना एक शब्द सांगा. त्यानंतर त्या शब्दाच्या शेवटी जे अक्षर आले आहे त्या अक्षरापासून नवीन शब्द तयार करण्यास सांगा. हा खेळ असाच पुढे चालू ठेवा. जसे : बदक → करवत → तवा → वाद इ. शब्दभेंड्यांसारख्या कृतीमुळे, पुढे जाऊन मुलांच्या वाचनासाठी आवश्यक असलेली अचूक उच्चारणाची क्षमता विकसित होईल. शब्दसंपत्ती वाढेल, तसेच नवीन काही शोधण्याची मुलांना सवय लागेल.
- **शब्दडोंगर :** शब्दडोंगर या सारख्या कृतीतून मुलांची शब्दसंपत्ती सहज वाढवता येईल. याकरिता मुलांना प्रथमतः एक शब्द द्यावा. नंतर मुलांना त्या मूळ शब्दात त्याच्याशी संबंधित आणखी एक शब्द वाढवण्यास सांगावा. पुढे जाऊन मुलांकडून मूळ शब्दामध्ये एक एक शब्द वाढवत नेऊन शब्दडोंगर तयार करून घ्यावा. उदा. आंबा.

**आंबा**
**हा आंबा**
**हा आंबा आहे.**
**हा आंबा मोठा आहे.**
**हा आंबा मोठा, पिवळसर आहे.**
**हा आंबा मोठा, पिवळसर, गोड आहे.**

शिक्षकांनी त्यांच्या स्तरावर मुलांचा शब्दसंग्रह वाढविण्याकडे विशेष लक्ष द्यावे.

## लेखन

लेखन म्हणजे मनातील विचार, भावना, कल्पना इ. लिपीच्या माध्यमातून कागदावर व्यक्त करणे होय. भाषेतील अक्षरे, शब्द यांचे लेखन व त्याद्वारे अभिव्यक्त होणे हे लेखन कौशल्यात समाविष्ट आहे. लेखन ही केवळ शब्दांना एकत्र जोडण्याची प्रक्रिया नसून माहिती, कल्पना यांची सुसंगतपणे एकत्रीकरण करण्याची प्रक्रिया आहे. लेखन मुलांना त्यांच्या विचारांना चालना देण्यास, आकार देण्यास, त्या स्पष्ट करण्यास आणि इतरांपर्यंत पोहोचविण्यास सक्षम बनवते.

**लेखन एक प्रक्रिया :**

आपल्या मनातील विचार लिहिता येतात, लिहायचे असतात याची जाणीव झाली, की मुले अक्षर ओळख होण्यापूर्वीच आपल्या मनातील विचार आडव्या रेषा, तिरप्या रेषा, गोल अशा वाटेल त्या आकारातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात आणि त्यांचा अर्थही ते सांगू शकतात. पुढे जाऊन मुले स्वतःचे नाव लिहिणे, चित्र काढणे, त्यांची नावे लिहिणे, ऐकलेली गोष्ट चित्र रूपात कागदावर रेखाटणे, त्यातील पात्रांना नावे देणे अशा कृतींमधून स्व–लिपीत लेखन करावयास शिकतात. याच्या पुढील टप्प्यावर मुले लेखन करताना व्याकरण, विरामचिन्हे आणि शुद्धलेखनाचे औपचारिक नियम पाळण्यास सुरुवात करतात. या टप्प्यावर मुलांच्या स्वनिर्मित अक्षरलेखनाची जागा योग्य अशी शब्दरचना घेते. लेखनाच्या अंतिम टप्प्यावर मुले स्वतःच्या दृष्टिकोनातून लेखन करावयास शिकतात. लेखन प्रक्रियेकडे मुले स्वतः एक लेखक आणि लेखनाबाबत अभिव्यक्त झालेली स्वतःची विचारप्रक्रिया यानुसार पाहू लागतात, तसेच लेखनाच्या औपचारिक नियमात देखील पारंगत होतात.

मुलांची लिखित भाषेची समज मुख्यतः त्यांच्या प्रभावी मौखिक भाषा विकासावर अवलंबून असते. लेखन कौशल्याचे शिक्षण सुरू होण्यापूर्वीच मुले त्यांच्या सभोवतालचे वातावरण आणि चिन्हांमधील सहसंबंध या माध्यमातून पायाभूत साक्षरतेशी जोडली गेलेली असतात. मुलांना शिकवीत असताना, सुरुवातीच्या टप्प्यावर मुलांना डावीकडून उजवीकडे लिहिणे, चिन्हांचा आकार, दोन शब्दांमधील अंतर व संकल्पनांचे आकलन अशा तांत्रिक बाबी शिक्षकांनी लक्षात आणून द्याव्यात. लिहिण्याकरिता सुरुवातीच्या टप्प्यावर मुलांची बोटाची पकड, बोटांच्या हालचालींवर नियंत्रण, हस्त–नेत्र समन्वय, आकारांतील फरक ओळखता येणे यांसारख्या बाबींची पूर्वतयारी करून घ्यावी. पुढे जाऊन मुलांना लेखनातही इतरांचे विचार समजून घेण्याची आणि इतरांसोबत सामायिक काम करण्याची प्रक्रिया आहे हेही लक्षात आणून द्यावे.


**लेखनाकरिता खालील अध्ययन अनुभव देता येणे शक्य आहे.**

- **कागद फाडणे :** (मनाप्रमाणे, दोन बोटांनी फाडणे, बोटांनी सरळ रेषेत फाडणे, घडी घालून घडीवर फाडणे). कागद चुरगळणे (दोन हातांनी चुरगळणे, एका हाताने चुरगळणे, चेंडू तयार करणे, एका हाताने फेकणे, दोन हातांनी झेलणे.)

  या कृतींमुळे बोटांनी पेन्सिल धरण्यासाठी आवश्यक अशा स्नायूंची ताकद/क्षमता वाढेल. लेखनासाठी आवश्यक हस्तनेत्र समन्वय व हाताचे/खांद्याचे स्नायू व त्यांचा समन्वय विकसित होण्यास मदत होईल. जोर लावताना, हालचाली करताना अंदाज घेण्याची सवय होईल.
- **चित्र काढणे, रंगविणे व इतर कृती :** ठसे काम, बाटलीचे टोपण लावणे, टोपण काढणे, चिखलाचे गोळे बनविणे, शेंगा फोडणे, डाळ–तांदूळ निवडणे, वायरमध्ये मणी ओवणे, बाटलीत पाणी/रांगोळी/रेती भरणे, वेणी घालणे, काज्यामध्ये बटण घालणे व काढणे या कृतींमुळे पेन/पेन्सिल बोटात धरून योग्य दिशेने वळविण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होईल. हस्तनेत्र समन्वय वाढीस लागेल. चित्राच्या कोणत्या भागासाठी कोणता रंग वापरावा याचा निर्णय घेण्यासाठी विचार होईल. हस्तनेत्र समन्वय,

छोट्या स्नायूंचा विकास यासाठी मदत होईल, बैठक, एकाग्रता तसेच अवधानकक्षा वाढण्यास मदत होईल. बोटांचा व्यायाम होईल, तसेच बोटांच्या स्नायूंचा विकास होईल. (बोटांची पकड साधण्यासाठी स्नायूंची क्षमता वाढेल) बोटांच्या क्रमबद्ध हालचाली होतील. बोटांच्या हालचालींवर नियंत्रण येईल. प्रत्येक कृती करीत असताना अंदाज घेणे, निरीक्षण करणे, निर्णय घेणे या विचारप्रक्रिया होतील. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आनंद मिळेल आणि लेखनासाठीची पक्की पूर्वतयारी होईल.

- **बोटाने गिरविणे/फिरविणे :** चित्राकृतीवर टोपणे, बिया, खडे इ. साहित्य ठेवणे. चित्राकृतींचा आतील भाग रंगविणे, अक्षरांचे अवयव (स्ट्रोक) रेखाटणे, रेषा ओढणे, विविध रेखाकृती गिरविणे, आकाराच्या आत आकार काढणे, यांमुळे अक्षर लेखनासाठी विशिष्ट दिशेने आकार काढण्याची तयारी होईल. बोटांच्या नियंत्रित हालचाली करण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होईल. वही, पाटी यांवर लेखन करण्यासाठीची पूर्वतयारी होईल. विविध प्रकारच्या आकारांची स्पष्टता येण्यास मदत होईल. आकारांचे निरीक्षण करणे, साम्यभेद शोधणे, वर्गीकरण करणे या क्षमतांच्या विकासास मदत होईल.
- **अक्षर व शब्दलेखन :** अक्षर दृढीकरण, स्वरचिन्हयुक्त अक्षरांचे लेखन, अक्षर गटातील अक्षरांचा उपयोग करून शब्द लेखन, अक्षरांची पुनरावृत्ती होणारे शब्द शोधणे व लिहिणे, स्वरचिन्हांचा वापर करून अर्थपूर्ण शब्द तयार करणे, मोठ्या शब्दांत लपलेले छोटे शब्द शोधून लिहिणे, अक्षरगटातील शब्दांपासून वाक्य लेखन करणे, त्याच वेळी पूर्णविरामांचा उपयोग समजून घेणे, चित्रशब्दयुक्त वाक्यांचे आणि चौदाखडीचे लेखन करणे या पुढच्या टप्प्यावरील सगळ्या कृती आपल्या परिचयाच्या आहेत. आपण हे वर्गात करीतच असतो. आता हे लक्षात ठेवू या, की पूर्वतयारी झाल्याची खात्री करून घेऊन या कृती करून घेतल्या, तर मुले सहजपणे या कृती करतील.



- **मुलांचे लेखन (मुलांची स्वलिपी) :** आपल्या मनातले लिहिता येते, लिहायचे असते याची जाणीव झाली, की अक्षर ओळख होण्यापूर्वी मुले आपल्या मनातील विचार आडव्या रेषा, तिरप्या रेषा, गोल अशा वाटेल त्या आकारात काढून अभिव्यक्त होण्याचा प्रयत्न करतात. आपण सहजपणे त्यांच्या लिहिण्याचा मान ठेवून विचारावे, 'काय लिहिलेस तू हे?' तर ते सहजपणे सांगतात. माझे लिहिलेले वाचले जाते हे कळले, की लेखनाची ऊर्मी येतेच; यामुळे मुले सहज लेखनातून अभिव्यक्त होऊ लागतात. स्वतःचे नाव लिहिणे, चित्रे काढणे, त्यांची नावे लिहिणे, सहभागी वाचनात घेतलेली गोष्ट चित्ररूपात कागदावर रेखाटणे,

त्यातील पात्रांची नावे लिहिणे, चित्रात काय दिसते त्याचे नाव लिहिणे, इत्यादी कृतींमधून सुरुवातीच्या टप्प्यांवरही स्वलिपीत लेखनाची संधी निर्माण करता येते. आपल्या दृष्टीने हे केवळ गिरगिटणे असते. त्याला अर्थ नसतो, पण मनातील लिहिता येते व ते वाचताही येते ही जाणीव रुजविण्यासाठी हा टप्पा महत्त्वाचा असतो. लिपी परिचयाला सुरुवात झाली, की हे गिरगिटणे थांबते. 'मला लिहायला येते' असे वाटते. मग हळूहळू अक्षरांचे आकार काढता यायला लागले, की रूढ अर्थाने लिहिणे सुरू होते. मात्र स्वलिपीतील लिहिणे हा लेखन शिकण्यातील एक महत्त्वाचा टप्पा असतो हे आपण लक्षात ठेवायला हवे.

- **मुलांचे स्वतंत्र लेखन :** लेखन समृद्धीसाठीचे अनेक वेगवेगळे भाषिक खेळ, जसे – शब्द साखळी, चौकटीतील अक्षरांपासून शब्द बनविणे, वाक्य बनविणे अशा कृती या मार्गदर्शिकेत दिल्या आहेत. त्या घेत असताना, मुलांनी स्वत: विचार करून काहीतरी लिहिणे हे घडते आहे ना, याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे; नाही तर लिहिण्याची क्रिया केवळ तांत्रिकतेत अडकून राहील.

  पहिलीच्या दुसऱ्या सत्रात मुले छोटी छोटी वाक्ये लिहू लागतात. मग मुलांना एखाद्या परिचित विषयावर लेखन देता येईल. या प्रकारच्या लेखनात यामधील चुकांना फारसे महत्त्व न देता, अभिव्यक्तीला महत्त्व द्यायला हवे. मार्गदर्शिकेत दिलेल्या नियोजनात आपण लेखन विकासासाठी दिलेल्या कृती या अगदी सुरुवातीपासूनच घ्यायच्या आहेत, हे नियोजनावरून आपल्या लक्षात येईलच.

- **कृतींचे विणकाम :** मुलांच्या भाषा विकासासाठी काम करता करता, आपल्याला आता हे समजले आहे. की, श्रवण, भाषण, संभाषण, वाचन व लेखन या भाषिक कौशल्यांचा विकास हातात हात घालून होत असतो; म्हणूनच आपणही वर्गात द्यावयाचे अनुभव असेच कौशल्यांच्या, मुलांच्या आणि पाठ्यपुस्तकासह उपलब्ध साधनांच्या हातात हात घालून दिले, तर आपली सगळी मुले नक्कीच लिहिती होतील.

## वाचनसंस्कृती/वाचनाकडे कल



या संकल्पनेत मुलांमध्ये वाचनाची आवड विकसित होणे अपेक्षित आहे. यामध्ये मुलांनी विविध प्रकारची पुस्तके, इतर वाचन सामग्री या बाबी स्वतःहून वाचणे अभिप्रेत आहे. मुलांनी त्यांना आवडणाऱ्या वाचनसाहित्याची निवड करावी, त्यातील पुस्तके हाताळण्यात स्वारस्य दाखवावे, चित्रे पाहून वाचन करण्याचा प्रयत्न करावा या बाबी समाविष्ट आहेत. मुले जेव्हा एखादे साहित्य वाचतात, त्यावेळी त्यांना या वाचनसाहित्यातील विविध रसांचे रसग्रहण करता आले पाहिजे. मुलांना वाचनसाहित्याबाबत अभिरुची निर्माण व्हावी, तसेच वाचन केलेल्या साहित्यावर अभ्यासपूर्ण प्रतिसाद देता यावा, यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

वाचनसंस्कृतीच्या विकासासाठी शाळा आणि शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. वाचनाच्या निकोप सवयी रुजविणे महत्त्वाचे आहे. त्या जोपासण्यासाठी मुले वाचनाच्या कोणत्या टप्प्यावर/स्तरावर

आहेत हे समजून घेणे, स्तरनिहाय वाचन साहित्य व सराव याची गरज ओळखणे, त्यांना वाचन कौशल्यात पुढे नेण्यासाठी योग्य वाचन साहित्य निवडणे या बाबींकडे शिक्षकांनी आवर्जून लक्ष द्यावे.

## वाचनसंस्कृती विकसनाकरिता योग्य साहित्याच्या निवडीची आवश्यकता :

वाचनाच्या सवयी रुजविण्याकरिता मुलांसाठीच्या वाचनसाहित्याविषयी शिक्षकांनी जागरूक असणे गरजेचे आहे. पुस्तकांची निवड करताना मुलांनी कोणती पुस्तके वाचावीत, पुस्तकांचे विषय कोणते असावेत, एका पृष्ठावर किती वाक्ये असावीत, पुस्तकातील वाक्ये किती शब्दांची असावीत या बाबींचा विचार करायला हवा. याशिवाय त्यात चित्रांचे स्वरूप व व्याप्ती किती व कशी असावी. चित्रांचा आकार, त्याचे मजकुराशी असेलेले नाते, पृष्ठ संख्या या सर्व गोष्टींचा विचार वाचनसाहित्य निवडताना करायला हवा. यासाठी काही निकष पुढील तक्त्यात नमुना दाखल दिले आहेत.

**वाचनाच्या प्रारंभिक प्रक्रियेत स्तरानुसार वाचनसाहित्य निवडण्याचे सर्वसाधारण निकष**

<table>
<tr><th rowspan="2">निकष</th><th colspan="4">स्तर</th></tr>
<tr><th>पहिला स्तर</th><th>दुसरा स्तर</th><th>तिसरा स्तर</th><th>चौथा स्तर</th></tr>
<tr><td>(१) प्रत्येक पृष्ठावरील वाक्य व शब्द संख्या</td><td>• पुस्तकाच्या प्रत्येक पृष्ठावर १-२ वाक्ये असावीत. प्रत्येक वाक्यात १ ते ३ पर्यंत शब्द असावेत.काही वेळा तर, पृष्ठावर शब्द न देता केवळ चित्र दिलेले असावे.</td><td>• पुस्तकाच्या प्रत्येक पृष्ठावर २ ते ३ वाक्ये असावीत.<br>• प्रत्येक वाक्यात १ ते ४ पर्यंत शब्द असावेत.</td><td>• पुस्तकाच्या प्रत्येक पृष्ठावर ३ ते ४ वाक्ये असावीत.<br>• प्रत्येक वाक्यात २ ते ५ पर्यंत शब्द असावेत.</td><td>• पुस्तकाच्या प्रत्येक पृष्ठावर ४ ते ५ वाक्ये असावीत.<br>• प्रत्येक वाक्यात ३ ते ६ पर्यंत शब्द असावेत.</td></tr>
<tr><td>(२) शब्द व वाक्याचे स्वरूप</td><td colspan="2">साधे, सोपे, परिचित शब्द असलेली वाक्ये असावीत. मजकुराची भाषा मुलांना आवडेल अशी सहज, सोपी आणि रंजक असावी. मजकुराचे लेखन मराठी भाषेच्या लेखन नियमांनुसार असावे.</td><td>साधे, सोपे, परिचित/अपरिचित शब्द असलेली वाक्ये असावीत. मजकुराची भाषा मुलांना आवडेल अशी सहज, सोपी आणि रंजक असावी. मजकुराचे लेखन मराठी भाषेच्या लेखन नियमांनुसार असावे.</td><td>साधी, मिश्र, संयुक्त वाक्ये असावीत. मजकुराची भाषा मुलांना आवडेल अशी सहज, सोपी आणि रंजक असावी. मजकुराचे लेखन मराठी भाषेच्या लेखन नियमांनुसार असावे.</td></tr>
</table>

| निकष | स्तर | | | |
|---|---|---|---|---|
| | पहिला स्तर | दुसरा स्तर | तिसरा स्तर | चौथा स्तर |
| (३) आशय | • परिचित संकल्पना दिलेली असावी. संविधानिक मूल्यांची जोपासना करणारा आशय असावा. | • साधी संकल्पना दिलेली असावी. मुलांना परिचित व त्यांच्या आवडीच्या घटनांची निवड केलेली असावी. संविधानिक मूल्यांची जोपासना करणारा आशय असावा. | • परिचित किंवा अपरिचित संकल्पनांचा समावेश असावा. साधा घटनाक्रम दिलेला असावा. मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देणारा आशय असावा. संविधानिक मूल्यांची जोपासना करणारा आशय असावा. | • मूर्त-अमूर्त संकल्पनांचा समावेश असावा. नवीन अनुभव देणाऱ्या घटना व प्रसंग यांचा समावेश असावा. उत्सुकता आणि कुतूहल वाढविणारा असावा. संविधानिक मूल्यांची जोपासना करणारा आशय असावा. |
| (४) चित्राचे स्वरूप व रचना | • पृष्ठाचा साधारणपणे ९०% भाग चित्राने व्यापलेला असावा. चित्र आणि मजकूर यांची सुसंगती असावी. चित्राचे आकलन सहजपणे व्हावे. | • पृष्ठाचा साधारणपणे ८०% भाग चित्राने व्यापलेला असावा. चित्र आणि मजकूर यांची सुसंगती असावी. चित्राचे आकलन सहजपणे व्हावे. | • पृष्ठाचा ८०% भाग चित्राने व्यापलेला असावा. • मजकुराच्या आशयानुरूप चित्रे असावीत; परंतु त्याची काठिण्यपातळी पहिल्या व दुसऱ्या स्तरापेक्षा अधिक असावी. | • पृष्ठाचा साधारणपणे ७०% भाग चित्राने व्यापलेला असावा. चित्र आणि मजकूर यांची सुसंगती असावी. चित्रांची काठिण्यपातळी पहिल्या व दुसऱ्या स्तरापेक्षा अधिक असावी. |
| (५) पृष्ठ संख्या | जास्तीत जास्त १२ पृष्ठांचे पुस्तक असावे. | जास्तीत जास्त १६ पृष्ठांचे पुस्तक असावे. | जास्तीत जास्त २० पृष्ठांचे पुस्तक असावे. | जास्तीत जास्त २४ पृष्ठांचे पुस्तक असावे. |

**टीप :** शिक्षक मार्गदर्शिकेचे वाचन करत असताना महत्त्वाच्या आशयाच्या मुद्द्यांची नोंद सारांशरूपात शिक्षकांनी या ठिकाणी करावी.

## शिक्षक नोंदी

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

# ३. वर्गातील बहुभाषिकता

पायाभूत भाषा साक्षरतेचा मुख्य उद्देश बालकाचा प्रभावी संवादक म्हणून विकास करणे हा आहे. या अनुषंगाने शिक्षकांच्या भूमिकेचा विचार करताना, आपण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारी विकासात्मक ध्येये, विविध संबोध स्पष्ट करत असताना शिक्षकाची तयारी, वर्गपूर्वतयारी, प्रत्यक्ष वर्गात असताना व वर्गाबाहेर असताना अध्यापनाची तयारी, अध्ययन–अध्यापनात शैक्षणिक साहित्याचे केलेले व्यवस्थापन, यासाठी आवश्यक असणाऱ्या व्यावसायिक क्षमतेची प्राप्ती; हे सर्व घटक आत्मसात केले, तरीही महाराष्ट्र राज्यासारख्या बहुभाषिक राज्यातील शाळेत अध्यापन करताना अनेक समस्या शिक्षकांच्या समोर उभ्या असतात आणि त्यांपैकी एक महत्त्वाची समस्या म्हणजे वर्गातील विद्यार्थ्यांच्या घरच्या भाषेचे वैविध्य अर्थात वर्गातील बहुभाषिकता होय.

भारतासारख्या खंडप्राय देशात, जिथे इतर घटकांची जशी विविधता आहे, तशीच विविधता भाषेच्या बाबतीतही पाहायला मिळते. कोसभर अंतरावर भाषा बदलते हा सामाजिक समज तंतोतंत खरा असल्याचे आपणास पाहावयास मिळते. १९५३ मध्ये राज्यांची रचना जरी भाषावार करण्यात आली, तरी महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात जी भाषा प्रमाण मानली, तिच्या साधारणतः एकूण ६० बोलीभाषा मानल्या जातात. अशा बहुभाषिक परिसरामुळे एकाच वेळी तीन किंवा तीनपेक्षा जास्त भाषा अवगत केलेल्या बालकांची देशातली संख्यादेखील लक्षणीय असल्याचे भाषाशास्त्राचे अभ्यासक मानतात.

शालेय शिक्षणाचे माध्यम बहुधा त्या प्रदेशाची प्रमाणभाषा असते. ती प्रमाणभाषा परिसर भाषेच्या रूपाने प्राथमिक शाळेत प्रवेश करण्यापूर्वीच मुलाला अवगत झालेली असेल तर, प्राथमिक शिक्षकांचे काम सोपे होते. मुलाला प्रमाणभाषेचे उच्चार येत असतातच, परंतु त्याला साक्षर करणे, त्याचा शब्दसंग्रह वाढविणे आणि त्याला त्याच्या बोलीत सलगपणे बोलण्याचा–लिहिण्याचा सराव कसा करता येईल हे पाहणे, एवढे काम भाषेचे व इतर विषयांचेही शिक्षक करतात; मात्र काही वेळेस मुलाची घरची बोली ही शालेय भाषेव्यतिरिक्त असते. (उदा. मराठी माध्यमाच्या शाळेत जाणारा कोलामी भाषक आदिवासी विद्यार्थी.) अशा परिस्थितीत मुलाला शालेय प्रमाणभाषा शिकविण्याची जबाबदारी प्राथमिक शिक्षकांवर पडते. हे कार्य जर नीटपणे पार पडले नाही, तर ती प्रमाणभाषा त्या मुलाची खऱ्या अर्थाने स्वभाषा होत नाही. संबंधित भाषेत आत्मविश्वासाने बोलणे लिहिणे तर दूरच, पण बोललेले ग्रहण करण्याची क्षमताही मुलामध्ये येत नाही. परिणामी मुलाचे इतर विषयदेखील कच्चे राहतील या सर्व बाबींमुळे शालेय शिक्षणाबद्दल त्याच्यात उदासीनता किंवा अढी निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते. प्रमाणभाषेच्या संपादनाचे कार्य यशस्वी झाले, तर ते मूल त्याची घरची बोली आणि तिच्याशी निगडित जीवनपद्धती यांना पारखे होणार नाही; म्हणूनच पायाभूत भाषा साक्षरतेचा विकास करताना भाषा शिक्षणाचा खालील तीन प्रकारांनी विचार करावा लागतो :

१) अध्यापन करावयाची भाषा (शिक्षणाचे माध्यम)

२) अध्यापन करावयाच्या भाषेचे व्याकरण, उच्चार व शब्दसंग्रह. (भाषाशास्त्र)

३) मुलाचे पहिले श्रवण किंवा भाषण ज्या भाषेत होते ती भाषा (परिसर भाषा)

भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी वरील तीन बाबींच्या विचारांबरोबरच, पायाभूत साक्षरता संदर्भाने भाषा परिणामकारक रीतीने ऐकून वा वाचून कशी ग्रहण करता येईल किंवा बोलून वा लिहून कशी व्यक्त करता येईल, हा हेतू डोळ्यांसमोर ठेवून अध्यापन-अध्ययनात पुढील टप्पे महत्त्वाचे असतात :

**१) मजकुराचे श्रवण :**

(अ) श्रवण व अक्षरओळख : बोललेले सहज ऐकणे किंवा लिहिलेले सहज वाचणे.

(ब) आकलन : ऐकलेले किंवा वाचलेले समजून घेणे.

**२) भाषण – संभाषण :**

(अ) ऐकलेले बोलणे बोलता येणे.

(ब) अभिव्यक्ती : आपल्या मनातले दुसऱ्याला समजेल अशा रीतीने मजकुराची जुळणी करून काय बोलायचे त्याची योजना करणे.

**३) श्रवण केलेल्या मजकुराचे प्रक्षेपण :**

(अ) ऐकलेला, वाचलेला किंवा आठवलेला मजकूर जसाच्या तसा बोलून किंवा लिहून दाखविणे. उदा. तोंडी निरोप सांगणे, पाठांतर केलेले म्हणून दाखविणे.

(ब) अनुवाद करणे : यामध्ये इतर भाषेतील मजकुराचे केवळ भाषांतर करणे असे अपेक्षित नसून, एखाद्या मजकुराचे आकलन करणे व स्वभाषेत इतरांपर्यंत तोंडी किंवा लेखी स्वरूपात पोहोचविणे हे अपेक्षित आहे.

## ३.१ बहुभाषिक परिस्थितीत अध्ययन-अध्यापनातील भूमिका

मनुष्याला भाषा अवगत करण्याची क्षमता नैसर्गिकरीत्या प्राप्त झालेली असते आणि ती लहानपणी विशेष जागृत असते. एखादे मूल कोणती भाषा प्रारंभिक बोली म्हणून शिकेल, हे त्याच्यावर संस्कारक्षम वयात कोणत्या बोलीचे संस्कार होतात, यावर अवलंबून असते. उदा. एखाद्याची मातृभाषा त्याच्या मातेची भाषा असेलच असे नाही. लहान मुले विनासायास नवीन बोली शिकतात आणि ती सहाव्या सातव्या वर्षांपर्यंत स्थिर झाली नाही, तर विसरूनही जातात. मात्र ती बोली वरचेवर त्यांच्या कानावर पडली पाहिजे. तसे होण्यासाठी ती भोवतालच्या समाजात कुठेतरी वापरली जात असली पाहिजे; म्हणजे मुलाच्या उपजत क्षमता, समाजाने उपलब्ध केलेली बोली आणि बोलीचा क्षमतेशी विशिष्ट वयात संयोग यांची लहान मुलांच्या भाषासंपादनाला आवश्यकता असते. विविध प्रकारच्या वाढीबरोबर लांब वाक्ये ऐकणे व उच्चारता येणे, वाक्यरचनेतील गुंतागुंत आणि विविधता वाढवता येणे, वाक्याला वाक्य जोडून गोष्ट सांगणे, शब्दाच्या अर्थाबद्दल चौकशी करणे, गमतीने बोललेले समजणे इ. क्रियांतून भाषेची वाढ होते. विचार, भावना, कृतिशीलता यांची वाढ, स्वत:च्या सामाजिक अस्तित्वाची जाण आणि सांस्कृतिक विधीनिषेधांची समज या सर्व बाबींशी भाषासंपादन निगडित असते. मुलांचे वैचारिक, भावनिक, सामाजिक, सांस्कृतिक विश्वच स्वभाषेच्या मुशीत तयार होते आणि भावी शिक्षणाची पूर्वतयारी ही स्वभाषेतच होते; परंतु बोलीभाषेबाबत भाषा अध्यापकांचे अपुरे ज्ञान, विद्यार्थ्यांची

भाषिक पार्श्वभूमी माहीत नसणे, अध्यापनशास्त्रानुसार अध्यापन करण्याबाबत असलेली उदासीनता, मुलांची बोली व अध्यापनाची भाषेमधील असणारी तफावत या बाबींना संसाधने न मानता त्यांना अडसर समजणे, प्रमाणभाषेच्या शुद्धतेचा धरला जाणारा आग्रह, बोलीभाषेतील सौंदर्याचा आनंददायी अध्ययन–अध्यापनासाठी पूरक म्हणून वापर न करणे, शालेय पुस्तकातील संदर्भ व परिसरातील संदर्भ जुळत नसल्याने संकल्पना समजण्यात येणाऱ्या अडचणी, अशा विविध बाबी औपचारिक शिक्षणात अडथळा ठरतात. या अडथळ्याचा परिणाम हा भाषा शिक्षणावर होतोच; परंतु इतर विषयांच्या संपादणुकीवरही होतो. राज्याचे भाषिक वैविध्य लक्षात घेता, वर्गातील प्रत्येक मुलाला तिच्या किंवा त्याच्या घराच्या परिसराच्या भाषेतून शिकण्याच्या संधी कशा प्राप्त करून देता येतील याचा विचार होणे अपेक्षित आहे.

## ३.२ शाळेतील सुरुवातीची दोन वर्षे आणि बहुभाषिकता

जन्मापासून नवव्या महिन्यापर्यंत भाषेची पूर्वतयारी होते. दहाव्या महिन्यापासून ३६ व्या महिन्यापर्यंत भाषेची प्राथमिक अवस्था दिसते. चौथ्या वर्षापासून सातव्या वर्षापर्यंत भाषा संपादन बरेचसे पूर्ण होते. नंतर भाषा संपादनात केवळ शब्दसंग्रह, वाक्प्रचार, भाषाशैली यांची भर पडते.

### पूर्वतयारी :

आवाजाचा वेध घेणे, रडणे, हसणे, विविध अक्षरे तोंडाने काढणे किंवा ऐकून अक्षरांची नक्कल करणे, डोळ्यांनी वस्तू ओळखणे, ती हाताने पकडून तोंडात घालणे, चेहरे ओळखणे, लपाछपीचा खेळ खेळणे (उदा., कुकू, बुवा करणे) हसणे आणि त्या हसण्याला प्रतिसाद देणे, ओरडल्यावर चेहरा पाडणे व लाडाने बोलल्यावर खूष होणे, एकटे सोडून गेल्यावर तक्रार करणे अशा क्रियांतून मुलाची पूर्वतयारी होते. या दोन वर्षांत भाषिक संबोध तयार होतात, वैचारिक, भावनिक कृतिशीलतेच्या वाढीबरोबरच, दुसऱ्याने दिलेली आज्ञा थोडी समजणे, अर्थ पूर्ण करणाऱ्या एका शब्दापासून ते २–३ शब्द असलेली वाक्ये बोलणे, ऐकलेल्या शब्दांतून न ऐकलेले वाक्य जुळवणे, उच्चारात सुधारणा होणे, प्रश्न विचारणे, कथन करणे, गोष्ट ऐकणे या क्रियांतून भाषिक वाढ दिसते. तिसऱ्या अवस्थेत तहान–भूक, उकाडा–गारठा इत्यादींची समज, सोबत्यांशी खेळणे–भांडणे–गोडी करणे इ., या सर्व बाबी आत्मसात करताना माध्यम भाषा मुलांच्या परिचयाच्या भाषेपेक्षा भिन्न असेल, तर सर्वाधिक अडचणी निर्माण होतात. शाळेची माध्यम भाषा मुलांच्या परिचयाच्या भाषेपेक्षा भिन्न असेल, तर सर्वाधिक अडचणी शिक्षणाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर विशेषतः पहिली–दुसरी या इयत्तांमध्येच येतात. शिक्षकांनी बोललेले न समजल्यामुळे मुलांची केवळ शैक्षणिक प्रगती मंदावते असे नाही, तर मुलांचा शाळेविषयी असणारा ओढा कमी होतो. त्यांना अध्ययन–अध्यापन प्रक्रिया कंटाळवाणी वाटू लागते. यासाठी शिक्षकांनी विद्यार्थी जेव्हा वरील गोष्टी आत्मसात करीत असतो, तेव्हा त्याच्याशी जास्तीत जास्त त्याच्या घरच्या भाषेचा माध्यम म्हणून वापर करावा.

## ३.३ सीमा भाग आणि मोठी शहरे यांमधील बहुभाषिकता

आदिवासी बहुल पट्ट्यामध्ये असणारे बहुभाषिक वर्ग आणि मोठ्या शहरांमध्ये असणारे बहुभाषिक वर्ग यांमधील मूलभूत फरक तेथील विद्यार्थ्यांच्या परिचयाच्या भाषांचा आहे. मोठ्या शहरात येणारे स्थलांतरित

मजूर, कामगार किंवा इतर वर्गातील लोकांची भाषा अनेकदा राज्यघटनेतल्या आठव्या अनुसूचीतील भाषांपैकी एक असते. उदा. कन्नड, तमिळ, गुजराती, हिंदी.

**बहुभाषिक वर्गात शिक्षकांनी काय करावे** :

- शिक्षकांनी मुलांच्या सभोवताली असणाऱ्या भाषांचा उपयोग करून घ्यावा.
- भाषा शिक्षणाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर मुलांना त्यांच्या परिचित भाषेपासून शिकवण्यास सुरुवात करावी. त्यासाठी शिक्षकांनी ती भाषा काही प्रमाणात स्वतः आत्मसात करावी. दैनंदिन वापरातील काही वाक्ये मुलांच्या भाषेत माहीत करून घेऊन, ती वापरावीत, त्यासाठी विविध बोली भाषांचे नमुने शिक्षकांनी स्वतःकडे तयार ठेवावे.
- अक्षर ओळख करून देताना थेट शाळेच्या माध्यम भाषेतील शब्द न वापरता, मुलांच्या परिचयाच्या भाषेतील, त्यांच्या परिचयाचे शब्द वापरले, तर ध्वनी अक्षर सहसंबंध समजण्यास सोपे जाईल. एखाद्या वस्तूसाठी विविध बोलीभाषेत असणारी नावे त्या वस्तूसोबत जोडावीत. मुलांना स्वतःच्या भाषेत व्यक्त होण्याची संधी अवश्य द्यावी. (यामुळे मुलाला प्रभावी संवादक बनण्यासाठी मदत होईल.)
- एका भाषेतील गाणी दुसऱ्या भाषेत भाषांतरित करून वर्गात वापरावीत. (यासाठी परिसरातील त्या भाषा जाणणाऱ्या प्रौढांची मदत घेता येईल.)
- मूल्यमापनासाठी तयार करण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिका किंवा कृतिपत्रिका यांमध्येही मुलांच्या भाषेचा उपयोग करावा.
- आनंददायी शिक्षणासाठी तसेच मुलांना शाळेबद्दल आणि शिकण्यात आवड निर्माण होण्यासाठी, त्यांना त्याच्याच भाषेत शिकविणे कसे आवश्यक आहे याची जाणीव पालकांना करून द्यावी.
- स्थानिक संस्कृतीची जोपासना शाळेकडून केली जाते, यास्तव अभ्यासक्रम आणि इतर उपक्रमांमध्ये आवश्यक व पूरक अशा स्थानिक गोष्टींचा समावेश, यांचे महत्त्व पालकांना समजून द्यावे.
- शाळेतील वातावरण, विविध उपक्रम, विद्यार्थ्यांच्या भाषेचा शाळेतील वापर या सर्वांचे उद्दिष्ट गुणवत्तापूर्ण शिक्षण हे आहे. हे चर्चेद्वारे पालकांना समजून द्यावे.
- उपलब्ध असल्यास स्थनिक भाषांमधील साहित्य, पुस्तके गाणी इत्यादींचा समावेश शाळेतल्या ग्रंथालयात करावा. केवळ पुस्तकेच नव्हे, तर दृक्श्राव्य साहित्याचा वापर करावा.
- घरच्या भाषेकडून मुलांना माध्यम भाषेकडे नेले जाणार आहे, याची खात्री पालकांना होईल अशी आपल्या अध्यापनाची दिशा असावी.
- मुलांना त्यांच्या घरची भाषा आणि माध्यम भाषा अशा मिश्र भाषेत व्यक्त होण्यास प्रोत्साहित करावे.
- विविध साधनांद्वारे/माध्यमांद्वारे समान परिस्थितीतील इतर शिक्षकांशी संपर्क ठेवून चर्चा करावी.

- शालेय माध्यम भाषेसाठी जसे खेळ तयार केले जातात, तसे स्थानिक भाषेसाठीचे खेळ विद्यार्थी व पालकांच्या मदतीने विकसित करावे. वर्गात प्रत्येकाला स्वतःचे विचार, भावना, अनुभव, गोष्टी, कल्पना आणि परिसराविषयीचे मत मांडण्याची समान संधी मिळणे गरजेचे आहे. हा विचार मनाशी ठेवून अध्ययन अनुभवांची आखणी आणि रचना करावी.
- शिक्षकांना विद्यार्थ्यांची भाषा अगदी अल्प प्रमाणात येत असली आणि त्यांनी ती वर्गात वापरली, तरी ती भाषा जाणणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये त्या शिक्षकांबद्दल आपुलकी निर्माण होते आणि ते पर्यायाने शिक्षणाशी जोडले जातात. अशा विविध पद्धतीने बहुभाषिक वर्गातील अध्ययन–अध्यापन होणे गरजेचे आहे.
- सीमावर्ती भाषांमधील बालसाहित्य काही प्रमाणात भाषांतरित स्वरूपात उपलब्ध आहे. असे बालसाहित्य गाणी, कथा इत्यादी प्रकार शाळांमध्ये वापरावे, त्याच कथा मुलांना त्यांच्या भाषेत सांगण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

### ३.४ अध्यापन साहित्य म्हणून विविध साधनांचा वापर




बहुभाषिक वर्गात शिक्षकांनी करावयाच्या विविध उपायांबरोबरच अशा बहुभाषिक वर्गात अध्यापन करीत असताना पाठ्यपुस्तकांखेरीज विविध साहित्यांचा कुशल वापर करावा लागेल. मराठी आणि इतर बोली भाषांमध्ये उपलब्ध असलेल्या शैक्षणिक साहित्याचा यासाठी वापर करावा लागेल. मराठी कोरकू, मराठी गोंडी, मराठी वारली, मराठी भिली अशा आदिवासी भाषा आणि मराठी अशासारखे विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध आहे. त्याचा वापर करून, बहुभाषिक वर्गात शिक्षणासाठी आनंददायी वातावरण निर्माण करता येईल.



लहान मुलांच्या शिक्षणात गोष्टींचे मोठे महत्त्व आहे. कथा हा प्रकार मुलांचे मनोरंजन करतोच; शिवाय त्यामुळे मुले स्वतःच्या भाषेत कल्पना करून मांडायला देखील शिकतात. त्यासाठी त्यांच्या घरच्या भाषेतील गोष्टींची पुस्तके त्यांना उपलब्ध करून द्यावीत. एका पुस्तकात एकाच पानावर, एकाच चित्राविषयी १–२ ओळी माध्यम भाषेतून आणि त्याच वेळी स्थानिक भाषेतून असतील; अशा द्विभाषिक पुस्तकांचा उपयोग मुलांच्या आकलनाकरिता व आकलनाला गती देणारा ठरतो. वर उल्लेख केल्यानुसार आदिवासी समुदायांमध्ये मोठ्या प्रमाणात पारंपरिक गीते, गाणी, म्हणी, कथा, कविता, नृत्य आणि चित्रकला असे विविधांगी साहित्य आणि कलाप्रकार उपलब्ध आहेत. त्यांपैकी बरचसे साहित्य

मौखिक परंपरांमधून चालत आलेले आहे. त्यांची पुस्तके किंवा छापील स्वरूपातील उपलब्धता कमी आहे, पण त्या त्या भागातील आदिवासी घराघरांमधून सापडणारे साहित्य आणि कलाप्रकार तेथील मुलांना शाळेशी जोडण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. यासाठी आजूबाजूच्या परिसरातील स्थानिक साहित्य आणि कलांचा वापर अध्यापनात केला, तर तो अधिक उपयुक्त ठरेल यासाठी शिक्षकांनी पुढील काही गोष्टींचा अध्ययन–अध्यापन करताना विचार करावा.

- प्रारंभिक टप्प्यावर मुलांसाठी द्विभाषिक पुस्तके जमवणे आणि त्यांचे वाचन घडवून आणणे.
- आपल्या भाषेत अशी पुस्तके नसतील, तर अशी पुस्तके परिसरातील प्रौढांच्या मदतीने हस्तलिखित स्वरूपात किंवा छपाई करून घेऊन तयार करणे.
- मुलांच्या दैनंदिन जीवनाची माहिती, त्यांच्या जीवनातले संदर्भ वापरून कथा आणि प्रसंगलेखन करणे. यासाठी दोन भाषा किंवा माध्यम भाषा वापरता येतील.
- मुलांना त्यांचे अनुभव, त्यांच्या घरातले, परिसरातले खेळतानाचे प्रसंग, गमती, गोष्टी, गाणी सांगण्यास प्रोत्साहन देणे. अशा वेळी कोणत्याही एकाच भाषेचा आग्रह धरू नये.
- विद्यार्थी जर त्यांच्या परिचयाच्या भाषेतून किंवा शिक्षण माध्यमाच्या भाषेतून किंवा दोन्हींचे मिश्रण करून बोलत असतील, तर त्याचा स्वीकार करावा.
- साहित्य मिळविण्यासाठी आंतरजालावरील ई–साहित्याचा वापर करण्याचा प्रयत्न करावा.

एकूणच बहुभाषिकता हा घटक अडचण न समजता, त्याचा संसाधन म्हणून कसा उपयोग करून घेता येईल याचा शिक्षकाने विचार करावा. बहुभाषिक वर्गाकडे सामाजिक व संवेदनशीलतेने पहावे. यासाठी शिक्षकांनी आपली भूमिका अधिकाराची न ठेवता, मुलांची प्रत्येक बाब अगदी मुलांच्या कुटुंबातील समस्या सुद्धा शांतपणे लक्ष देऊन ऐकाव्यात; जेणेकरून त्यांच्या मनातील संकोच दूर होईल, वर्गातील वातावरण साधे सरळ मोकळे असेल; ज्यामध्ये मूल सहजपणे स्वतःला व्यक्त करू शकेल अशी ठेवावी. मुलांना वर्गामध्ये जर केवळ त्यांच्या घरातील भाषा बोलण्याची सूट असेल, तर तो वर्ग सर्जनात्मक वर्ग असेल. अशा वर्गात शिक्षक स्वतःही अधिक सर्जनशील होतील.

❑❑❑

**टीप :** शिक्षक मार्गदर्शिकेचे वाचन करत असताना महत्त्वाच्या आशयाच्या मुद्द्यांची नोंद सारांशरूपात शिक्षकांनी या ठिकाणी करावी.

## शिक्षक नोंदी

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

# ४. पायाभूत भाषा साक्षरता : शिक्षक भूमिका


**प्रस्तावना :**

'निपुण भारत अभियान' या अंतर्गत ३ ते ९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता विकसित व्हावी म्हणून राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक पातळीवर नियोजनात्मक कार्यक्रम सुरू आहे. शिक्षकांसमोरील प्रत्येक मूल भिन्न आहे. त्याच्या ग्रहणशक्तीचा व आकलनशक्तीचा स्तर भिन्न आहे. प्रत्येक मुलाचे कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरण तसेच अनुभवविश्व भिन्न आहे. अशा सर्व बाबींचा त्याच्या मूलभूत शिक्षणक्रियेवर परिणाम होत असतो. त्यानुसार त्याच्या अध्ययनक्षमता विकसित होत असतात. या प्रक्रियेत कुटुंब, शाळा, समाज आदी घटकांचा कमी–अधिक सहभाग असला, तरी प्रत्यक्ष अध्यापन–अध्ययन प्रक्रियेत शिक्षकांचेच स्थान महत्त्वाचे असल्याने त्यांची भूमिका महत्त्वाची व निर्णायक ठरते.

शिक्षकांची ही महत्त्वपूर्ण भूमिका समजून घेत असताना, त्यांच्यासमोरील विकासात्मक ध्येये विचारात घेणे आवश्यक आहे.

## ४.१ विकासात्मक ध्येये

निपुण भारत अभियान हे मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देणारे आहे. शारीरिक, भावनिक, सामाजिक विकास, तसेच भाषिक व नैतिक विकास, कला व सौंदर्यात्मक विकास, बोधात्मक विकास यांचा मुलांच्या विकासाच्या विविध क्षेत्रांशी परस्परसंबंध आहे व ती परस्परावलंबीही आहेत. निपुण भारत अभियानांतर्गत विकासाच्या या सर्व क्षेत्रांची तीन प्रमुख ध्येये सांगितली आहेत :




या तीन विकासात्मक ध्येयांच्या अनुषंगाने, प्रमुख क्षमता व ध्येयनिहाय अध्ययन निष्पत्ती यांची मांडणी केली आहे. त्याचा ओघतक्ता पुढीलप्रमाणे :

## १) बालकांचे आरोग्य व स्वास्थ्य यांचा विकास करणे (HW)

हे ध्येय अत्यंत व्यापक व सूक्ष्म स्वरूपाचे असून ते क्षमता विकासाशी संबंधित आहे. यात मुलांचे शारीरिक, मानसिक, भावनिक व सामाजिक आरोग्य, त्यांचे पोषण, स्वच्छतेच्या सवयी इत्यादी बाबींचा समावेश होतो.

## २) बालकांचा प्रभावी संवादक म्हणून विकास करणे (EC)

संवाद ही एक कला असून, तिच्या प्रभावी विकसनाने व्यक्तिमत्त्व उत्तम बनते. देहबोली, हावभाव यातून जुजबी व मर्यादित संवाद साधता येतो; मात्र प्रभावी व परिपूर्ण संवादासाठी भाषाविकासच महत्वाचा ठरतो. पायाभूत शिक्षणाच्या कालावधीत मुलांना योग्य संवाद करण्यास सक्षम केल्यास, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केल्यास, त्यांच्या पुढील शिक्षणात ती योग्य पद्धतीने वाचन व लेखन करण्यासही सक्षम होतात. शाळापूर्व तयारी पातळीवर मुलांची मौखिक भाषा कौशल्ये आणि वाचन–लेखन कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे. पायाभूत शिक्षणात भाषा व साक्षरता विकास झाला, तर भविष्यात द्वितीय भाषा, तसेच अन्य कोणतीही भाषा शिकण्यास मुलांना मदत होऊ शकते. भाषेमध्ये उच्चारशास्त्र आणि ध्वनी यांचा सहसंबंध निकटचा आहे म्हणूनच पायाभूत शिक्षणात मुलांची भाषा विकसनाची उत्तम सुरुवात झाली तर ती 'प्रभावी संवादक' बनण्याच्या दिशेने पाऊल टाकतील.

## ३) बालकास एक सहभागी अध्ययनार्थी म्हणून स्थानिक परिस्थितीशी समन्वय साधता येणे (IL)

कुटुंब आणि आजूबाजूचा परिसर यांच्या सहवासातून मूल शिकण्यास प्रारंभ करते. शाळेत प्रवेश करण्यापूर्वीच, त्याच्या शिकण्याच्या क्रियेस सुरुवात झालेली असते. श्रवण, भाषण, संभाषण, निरीक्षण इत्यादी कृतींतून ते सभोवतालच्या वातावरणाशी जोडले जाते. दुसऱ्याशी जोडले जाण्याची क्षमता आणि इतरांजवळ आपल्या भावना व्यक्त करणे हा मुलाच्या अध्ययनाचाच एक भाग असून, ते मानवी अध्ययनाचे सांस्कृतिक व सामाजिक अंगही आहे. पायाभूत शिक्षणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे; तार्किक विचार करण्यास मुलांना मदत करणे, ज्याद्वारे मुलांचे संकल्पनाधारित अध्ययन घडून येईल. या पद्धतीने मूल वातावरणाशी जोडले जाऊन त्याच्या शिक्षणाचा पाया तयार होतो. पायाभूत शिक्षणातून मुलांच्या प्रारंभिक धारणेपासून त्यांना नवीन संकल्पनांच्या विकासाकडे नेणे हे एक ध्येय आहे. सभोवतालच्या वातावरणातून प्रत्यक्ष अनुभव घेतल्याने मुलांच्या संकल्पना विकसित होतात. यातून त्यांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक जाणिवाही विकसित होतात. परिसराबाबतची जाणीव विकसित होते. त्यानंतरच्या टप्प्यावर मुले विविध विषयांमध्ये प्रगती करतात.

ही विकासात्मक ध्येये साध्य झाल्यास, मूल जीवनातील गुंतागुंतीच्या परिस्थितीला सामोरे जाण्यास सक्षम बनेल.

(निपुण भारत अंतर्गत ध्येय–२ नुसार प्रथम भाषेच्या निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्तींसाठी **परिशिष्ट 'अ'** पहावे.)

## ४.२ अध्ययन निष्पत्ती आणि अध्ययन क्षमता

अध्ययन निष्पत्तीची विधाने ज्ञान, कौशल्ये आणि वृत्तीचे वर्णन करतात. विविध क्षमता तसेच संदर्भ, ज्ञान आणि कौशल्यांच्या संभाव्य प्रयोगांवर लक्ष केंद्रित करतात.

**अध्ययन निष्पत्ती :**

अध्ययन निष्पत्ती ही अशी औपचारिक विधाने आहेत; जी आपणास एखादा विषय, संकल्पना किंवा अभ्यासक्रमातील आशय शिकल्यानंतर विद्यार्थी काय करू शकतील हे सांगतात. अध्ययन निष्पत्ती या मूलतः क्षमता संपादन केल्याचा पुरावा आहे. अध्ययन निष्पत्ती ही अशी विशिष्ट विधाने आहेत; जी विद्यार्थी नेमके काय करू शकतात याचे मापन करता येण्यासाठी योग्य पद्धतीचे तंतोतंत वर्णन करतात. एखादी अध्ययन निष्पत्ती मुले एकापेक्षा अधिक क्षमता प्राप्त करू शकतात हे दर्शविते.

**अध्ययन क्षमता :**


अध्ययन क्षमता ही अशी विधाने आहेत; जी मुलांना काय कळेल, ती काय करू शकतील किंवा त्यांनी अभ्यासक्रम किंवा कार्यक्रम पूर्ण केल्यावर किंवा त्यात भाग घेतल्यावर, ती काय करून दाखवू शकतील हे निर्देषित करतात.

विकासात्मक ध्येये, अध्ययन निष्पत्ती आणि अध्ययन क्षमता या संकल्पना समजून घेतल्यानंतर अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील शिक्षकांची भूमिका जाणून घेणेही महत्त्वाचे आहे. त्याचा आपण पुढील घटकात तपशीलवार विचार करणार आहोत.

## ४.३ अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या, विज्ञानाच्या युगात, नवीन प्रवाहाबरोबर शिक्षकांनी स्वतःला बदलवणे, ज्ञानाची नवनवीन क्षेत्रे आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. या नवयुगात शिक्षकांनी अध्यापनाची नवनवीन तंत्रे, पद्धती आत्मसात करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, सामाजिक, भावनिक, बौद्धिक उन्नयन करणे गरजेचे आहे. मुलांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्यासाठी पुरेपूर योगदान देणे आवश्यक आहे. यासोबतच तंत्रज्ञानाची साथ घेऊन, स्वतः अद्ययावत राहणे ही काळाची गरज आहे.

पायाभूत अध्ययन प्रक्रियेत शिक्षकाची जबाबदारी मोठी आहे. प्रत्येक मुलाची समजशक्ती, त्याची अध्ययनाची पद्धती आणि त्याची ग्रहण क्षमता व अध्ययन पातळी शिक्षकांनी समजून घेतली पाहिजे. शाळेत मुलांचा सामाजिक, मानसिक, भावनिक विकास होतो. त्यांच्या विचारांना दिशा मिळते. समस्या निराकरणाचे कौशल्य विकसित होते. मूल एक सर्जनशील व सक्षम नागरिक घडण्याच्या दृष्टीने शाळा आणि शिक्षक यांची भूमिका महत्त्वाची ठरते. हीच भूमिका नवीन शैक्षणिक धोरण-२०२० ने देखील मांडली आहे. शिक्षकांनी आपली भूमिका समजून घेत असताना, पुढील मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे.




वस्तुतः शिक्षकांचे अध्यापनकार्य संपूर्ण समरसतेतून आणि समर्पण भावनेतून होणे अपेक्षित आहे. विकासात्मक ध्येये साध्य होण्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे. शिक्षकांची मनोभूमिका सकारात्मक आणि पोषक असेल, तर सतत कृतिशील राहून मुलांना उत्तम मार्गदर्शन करू शकतील.

आजच्या तंत्रयुगाची गतिमानता जाणून शिक्षकांनी तंत्रज्ञान आत्मसात करून, त्याबाबत अद्ययावत राहून, आपले अध्यापन प्रभावी केल्यास विद्यार्थ्यांच्या क्षमता विकासासाठी ते साहाय्यभूत ठरेल. दिलेल्या विविध अध्ययन अनुभवांद्वारे मुलांचा अध्ययन प्रक्रियेतील कृतियुक्त सहभाग वाढवता येईल. गाणी–गोष्टी, नावीन्यपूर्ण खेळ, गटकार्य यांचा वापर अध्ययनक्रियेत सहजरीत्या करता येईल.

संपन्न, समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा शिक्षक संपन्न विद्यार्थी घडवू शकतो; म्हणूनच सकस व आशयघन वाचनातून, चिंतनातून तसेच सतत गुणवत्तापूर्ण शैक्षणिक अर्हतेत वाढ करून शिक्षक आपले व्यक्तिमत्त्व व्यासंगी व समृद्ध बनवू शकतात. शिक्षक शालेय ग्रंथालयासोबतच स्वतःचे ग्रंथालय विकसित करणे, वर्गात वाचन कोपरा तयार करून विद्यार्थ्यांना वाचनास प्रेरित करणे, आदी बाबी शिक्षक जाणीवपूर्वक करू शकतात. त्याबरोबरच विद्यार्थ्यांचा अध्ययनातील सहभाग उत्साहवर्धक होण्याकरिता शिक्षकांनी पुढील बाबी कराव्यात.

- मुलांना त्यांच्या स्वत:च्या भाषेतून त्यांचे अनुभव सांगण्यासाठी प्रेरित करावे.
- त्यांचे प्रत्येक मत, विचार, भावना शांतपणे ऐकून ते विचारात घ्यावे.
- वर्गात आदेश देण्याऐवजी साधी, सरळ, स्पष्ट नैसर्गिक भाषा वापरावी.
- कृतियुक्त खेळ, गटकार्य घेऊन मुलांना वर्गात गुंतवावे.
- मुलांच्या भावविश्वातील, अनुभवविश्वातील व्यक्ती, घटना आदींचा उल्लेख करावा, मुलांचा अध्यापनादरम्यान सहभाग घ्यावा. त्यामुळे मुलांना शिकण्याच्या क्रियेत आनंद निर्माण होईल, आत्मीयता वाटेल.
- मुलांना आकलन होण्यात येणाऱ्या अडचणी समजून घेऊन, त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनातून मुलांना काय आणि कितपत समजले आहे हे जाणून घ्यावे.

- बोलका वर्ग यासारख्या विविध संकल्पना राबवाव्या. यात वर्गाच्या भिंतींवर कल्पक शैक्षणिक साहित्य तयार करून ते लावावे, तसेच अध्यापनात त्याचा वापर करावा.

अशा प्रकारे शिक्षकांच्या सर्वांगीण क्षमता या मुलांच्या पायाभूत कौशल्यांच्या विकसनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आहेत. मुलांच्या पायाभूत भाषा साक्षरता कौशल्याच्या विकसनाकरिता, त्यांच्या अध्यापन प्रक्रियेचे योग्य नियोजन व संचलन करणे गरजेचे आहे.

भाषा साक्षरता संदर्भात वर्गात आणि वर्गाबाहेर अध्यापन करताना शिक्षकांनी स्वतंत्रपणे तयारी करणे आवश्यक आहे. यासाठी आपण पुढील मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे.

| शिक्षक तयारी | वर्ग पूर्वतयारी | प्रत्यक्ष वर्गात असताना शिक्षकांची भूमिका | अध्यापनासंदर्भात वर्गाबाहेर शिक्षकांची भूमिका |
|---|---|---|---|
| • प्रारंभिक भाषाज्ञान व साक्षरता याविषयी जागरूक असणे. | • स्वतः अथवा उपलब्ध साहित्याच्या आधारे कृतिपत्रिका तयार करणे तसेच त्याचा अध्यापनात वापर करणे. | • वर्गातील प्रत्येक मुलाने शिकणे ही शिक्षकाची जबाबदारी आहे. त्यासाठी प्रत्येक मूल भिन्न आहे हे समजून घेत बहुभाषी अध्यापन पद्धतीचा अवलंब करणे. | • अभ्यासात मागे असलेल्या, अक्षर ओळख करण्यात अडचण येत असलेल्या विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसनासाठी चर्चेद्वारे छोटे-छोटे उपक्रम राबविणे. |
| • प्रारंभिक वर्गातील मुलांना योग्य मार्गदर्शन करणे. त्यांचे समुपदेशन करणे. | • मुलांमध्ये लेखीभाषेची जाण याविषयी जागरूकता निर्माण करणे. त्यासाठी वर्गभिंती भित्तिचित्रे व कल्पक, रंगीत अशा शैक्षणिक साहित्याचा वापर करून वर्गवातावरण तयार करणे. | • आनंददायी व प्रयोगशील अध्ययनासाठी विविध कला, गाणी, गोष्टी, शब्दखेळ यांसारख्या अध्ययन अनुभवांची रचना करणे. | • सातत्याने पालकसभांचे आयोजन करून, आवश्यकतेनुसार गृहभेटी देऊन विद्यार्थी विकसनात पालकांचा सहभाग वाढविणे. शिक्षक-पालक सहज संवाद वाढविणे. |
| • पायाभूत भाषा साक्षरतेविषयी पालक व समाज यांची भूमिका स्पष्ट करणे व प्रोत्साहन देणे. | • स्थानिक परिसरातील सहज उपलब्ध होणारे साहित्य, तसेच अल्प खर्चिक शैक्षणिक साहित्य तयार करणे, ते वापरणे. साहित्य वापराबाबत मुलांना सहजता येईल, याबाबत जागरूक असणे. | • मुलांच्या बोलीभाषेचा, त्यांच्या भावविश्वातील घटनांचा, योग्य चालीरीतींचा उपक्रमांत समावेश करणे. | • शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांशी समन्वय साधणे. त्यांचे सहकार्य मिळविणे. |

| शिक्षक तयारी | वर्ग पूर्वतयारी | प्रत्यक्ष वर्गात असताना शिक्षकांची भूमिका | अध्यापनासंदर्भात वर्गाबाहेर शिक्षकांची भूमिका |
|---|---|---|---|
| • विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून प्रारंभिक वर्षामध्ये मार्गदर्शन व प्रोत्साहन देणे. | • मुलांचा भावनिक, मानसिक आणि सामाजिक विकास करण्याच्या दृष्टीने कल्पक व सर्जक कृती राबविणे. | • मुलांची आंतरक्रिया स्वाभाविकपणे होईल, अनुभवलेल्या गोष्टींचा त्यात समावेश असेल यांकडे लक्ष देणे. | • प्रारंभिक स्तरावर मुलांची समाधानकारक प्रगती न दिसल्यास उपचारात्मक वर्गाचे आयोजन करणे. |
| • पायाभूत अध्ययनाचे महत्त्व समजून घेणे. | • मुले शैक्षणिक साहित्य, मुद्रित साहित्य वारंवार हाताळतील याकडे लक्ष देणे. | • अक्षर ओळख, अक्षर–ध्वनी सहसंबंध, बोधात्मक कौशल्ये यांकडे विशेष लक्ष पुरविणे. | • केंद्र अथवा तालुका स्तरावर मासिक सभांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनासंबंधी चर्चा करणे. पर्यवेक्षकीय यंत्रणा व पालक यांच्याशी नवीन धोरणांविषयी विचारविनिमय करणे. |
| | • मुलांचे भावविश्व, अनुभवविश्व जाणून घेऊन त्यानुसार त्यांचे पूर्वज्ञान तपासणे. त्यांची अक्षर ओळख तपासणे. | • दिव्यांग मुलांबाबत वातावरण संवेदनशील ठेवणे. | • केंद्र, राज्य स्तरावर शिक्षण तज्ज्ञांकडून माहिती घेण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करणे. |
| | | • विद्यार्थ्यांचे सर्वंकष व सातत्यपूर्ण निरीक्षण करून, त्यांची मूळ आवड, क्षमता, शिकण्याची पद्धत आदींची माहिती घेणे. | |
| | | • मुलांच्या शिकण्याच्या पद्धतीनुसार अध्ययन–अध्यापनाबाबत नियोजन करणे. | |
| | | • विद्यार्थी संचयिकेत त्यांनी केलेल्या कामासंबंधी, आवडी–निवडींसंबंधी, तसेच | |

| शिक्षक तयारी | वर्ग पूर्वतयारी | प्रत्यक्ष वर्गात असताना शिक्षकांची भूमिका | अध्यापनासंदर्भात वर्गाबाहेर शिक्षकांची भूमिका |
|---|---|---|---|
| | | विशेष उल्लेखनीय यश संपादन केले असल्यास त्यांविषयी नोंदी करणे. | |
| | | • अध्ययन निष्पत्तींच्या मूल्यमापनासाठी चाचणी घेणे इत्यादी. | |

## ४.४ पाठ नियोजन

मुलांचा योग्य पायाभूत भाषिक साक्षरता विकास होण्याच्या अनुषंगाने आणि वर्गात योग्य आंतरक्रिया घडण्याच्या अनुषंगाने पाठाचे प्रभावी नियोजन करणे गरजेचे आहे. योग्य पाठ नियोजनाने वर्गात करावयाच्या कामास दिशा मिळते.

महाराष्ट्र राज्यात ३ ते ९ वर्षे वयोगटामध्ये पायाभूत साक्षरता विकसित व्हावी या हेतूने निपुण भारत या उपक्रमाची आपण अंमलबजावणी करत आहोत. शिक्षण प्रक्रियेमधून विद्यार्थ्यांचा सर्वंकष विकास अपेक्षित असतो. मुलांचे योग्य सामाजिकीकरण, आरोग्यदायी सवयींचा विकास आणि कारक कौशल्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने उद्‌दिष्टपूर्तीसाठी नियोजनात्मक कार्यक्रम आराखडा आवश्यक आहे. पायाभूत साक्षरता मिळविण्याच्या दृष्टीने अध्ययन–अध्यापन प्रक्रिया सहज, सुलभ, आनंददायी, नियोजनबद्ध व वेळेत पूर्ण होणारी असणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्याला विद्यार्थ्यांचा वयोगट, पाठाचा आशय, भाषिक संबोध, मुलांचा मानसशास्त्रीय दृष्टिकोन या बाबींचा विचार करून उत्तम पाठ नियोजन करणे आवश्यक असते, कारण त्यामुळे अध्ययन प्रक्रिया गतिमान राहील.

**पाठ नियोजन करण्यापूर्वी शिक्षकांनी खालील प्रमुख प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत :**

- माझ्या विद्यार्थ्यांनी काय शिकावे अशी माझी अपेक्षा आहे?
- माझे विद्यार्थी कसे शिकतील?
- मी माझ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे कशा प्रकारे मूल्यांकन करू शकतो?

या प्रश्नांवर आधारित शिक्षकांना आशयाच्या अंमलबजावणीसाठी व आशय निर्धारित उद्‌दिष्टांची प्राप्ती करण्यासाठी, सर्वोत्तम मार्गाची निवड केली पाहिजे. हे पाठ नियोजनाच्या माध्यमातून साध्य होऊ शकते. पाठ नियोजनामुळे अध्ययन अनुभवाची रचना अधिक परिणामकारक करता येते. शिक्षकांनी प्रथमतः अध्ययन निष्पत्ती समजून घ्यावी व त्यानुसार विद्यार्थ्यांना द्यावयाच्या निर्देशासंबंधी कृतीयोजना बनवावी. त्यानंतर मूल्यांकनाचे नियोजन करावे.

निपुण भारत अभियानास अपेक्षित असलेल्या पायाभूत भाषा साक्षरतेअंतर्गत असलेल्या घटकांवर आधारित पाठनियोजनाचे काही नमुने या मार्गदर्शिकेत **परिशिष्ट 'क'** मध्ये दिलेले आहेत. त्या नियोजनाचा विचार करून, शिक्षकांनी आपले स्वत:चे पाठनियोजन करावे. परिशिष्टात दिलेले पाठ नियोजन हे नमुन्यादाखल आहे, तसेच नमुना पाठामध्ये जरी एक–दोन घटकांचा समावेश असला, तरी भाषा शिक्षणाचा संतुलित दृष्टिकोन ठेवूनच वर्गात अध्ययन–अध्यापन करावे.

## ४.५ शैक्षणिक साहित्याचा वापर व व्यवस्थापन

व्यक्तीच्या विकसनातील एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे 'औपचारिक शिक्षण' होय. शिकण्याच्या एकूण प्रक्रियेतील या प्रकारच्या शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. औपचारिक शिक्षणात साचेबद्धपणा येऊ न देता, स्वतःला समजून घेण्याचा शिक्षणाचा मूळ उद्देश बाजूला न सारता, विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया सुगम करणे आवश्यक आहे. यासाठीच हे शिक्षण हसतखेळत, आनंददायी होण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या अंगभूत क्षमता सहज क्रियेतून फुलण्यासाठी शैक्षणिक साहित्य आधारभूत ठरते. त्यासाठी शैक्षणिक साहित्याचे शाळा स्तरावर व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

शिक्षक हा स्वतः एक प्रभावी व मूलभूत शैक्षणिक घटक आहे. शिक्षक–स्वसमृद्धी व व्यासंग हा शैक्षणिक साहित्य वापरात पूरक ठरतो. असे असले, तरी प्रत्येक शिक्षकास अध्यापन करताना शैक्षणिक साहित्याचा वापर उपयुक्त ठरतो; कारण विद्यार्थी सुमारे ८३% ज्ञान हे केवळ डोळ्यांनी ग्रहण करत असतात. साहित्य प्रत्यक्ष पाहणे व हाताळणे या क्रियांमुळे शिकण्याची क्रिया सुलभ व गतिमान होते. त्यामुळे अमूर्त संकल्पना मूर्त रूपात विद्यार्थी पाहू शकतो. अध्ययन अनुभवातील संबोधापर्यंत पोहोचण्यासाठी शैक्षणिक साहित्य मदत करते. थोडक्यात काय तर शिकण्याची व शिकविण्याची क्रिया साहित्याच्या वापराने अधिक प्रभावी व फलदायी होते.

शैक्षणिक साहित्याची शिकण्याच्या क्रियेतील ही अनिवार्यता समजून घेतल्यानंतर, ते कोणकोणत्या प्रकारात आपण उपलब्ध करून घेऊ शकतो, हे पाहणेही आवश्यक आहे.


- **शैक्षणिक साहित्याची उपलब्धता :**

  वर्गात अथवा वर्गाबाहेर प्रत्यक्ष अध्यापन करताना, पुढे नमूद केलेल्या साहित्याच्या गरजेनुसार वापर केल्यास विद्यार्थ्यांची आकलनाची क्रिया पूर्ण होते. त्यांना शिकण्यात रस निर्माण होतो. ती कृतिशील होतात.

- **शैक्षणिक साहित्य :**

  प्रत्यक्ष अध्यापनाच्यावेळी घटकानुरूप साहित्याचा योग्य वापर केल्यास अध्ययन क्रिया सुलभ होते. हे साहित्य योग्य वेळेत उपलब्ध होण्यासाठी त्याचे वर्गीकरण व व्यवस्थापन योग्य रीतीने होणे आवश्यक आहे. भाषा प्रयोगशाळा त्यासाठी साहाय्यभूत ठरेल.

  'निपुण भारत' अंतर्गत पायाभूत साक्षरता प्रभावीपणे राबविण्यासाठी आपण शैक्षणिक साहित्याचा वापर पुढीलप्रमाणे करू शकतो –




या अभियानांतर्गत इ. तिसरीपर्यंत विद्यार्थ्याला मूलभूत अक्षर ओळख होणे ही बाब अपेक्षित आहे. त्यासाठी अधिकाधिक शैक्षणिक साहित्याचा वापर केल्यास मुलांना अक्षर ओळख करणे सोपे जाईल. मुले आनंददायी वातावरणात शब्द तयार करतील. चित्रवर्णनातून त्यांचे शब्दभांडार वाढण्यास मदत होईल. हा उपक्रम राबविण्यास सुरुवात करण्यापूर्वी आपण शिक्षकांनी शैक्षणिक साहित्य तयार केल्यास पायाभूत भाषा साक्षरता वेगाने होण्यास मदत होईल.

- **शैक्षणिक साहित्य वापराचे नमुना उदाहरण :**

समजा, आपणास 'कानायुक्त' शब्दांची ओळख विद्यार्थ्यांना करून द्यायची आहे. आपण लक्षात घ्यायला हवे, की मुलांना शब्द अमूर्त असतात. शब्दाचे उच्चारण माहीत असले, तरी काना हे चिन्ह लक्षात न आल्याने त्यांचे वाचन व लेखन चुकू शकते. अशावेळी जर आपण कानायुक्त शब्दांच्या पट्ट्या, कार्ड्स वापरली, तंत्रज्ञानाचा वापर करून ते शब्द ऐकवले तर मुलांचा संबोध पक्का होण्यास मदत होईल.

'बोलक्या भिंती' या शैक्षणिक साहित्याचा वापर करूनही भाषेच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होईल. मात्र या ठिकाणी हे लक्षात घ्यावे, की मुलांच्या दृष्टी पातळीस व योग्य अशा अंतरावर साहित्य प्रदर्शित केले जावे.

- **मराठी अध्ययन समृद्धी साहित्य संचाच्या प्रभावी वापराबाबत :**

पायाभूत भाषा शिक्षणाला उपयोगी पडेल असे साहित्य असणारा अध्ययन समृद्धी साहित्य संच (मराठी भाषा पेटी) शासनाने प्रत्येक शाळेला यापूर्वी उपलब्ध करून दिलेला आहे. शैक्षणिक साहित्य वापराचे एक नमुना उदाहरण म्हणून संचातील साहित्य कधी व कसे वापरायचे याबाबतची मार्गदर्शक पुस्तिका संचात आहे. मुलांना वाचते करून अभिव्यक्त करण्यापर्यंत लागणारे सर्व साहित्य आणि संचातील भाषिक खेळ शिक्षकांनी वापरल्यास मुलांचे पायाभूत भाषा शिक्षण आनंददायी होण्यास निश्चित मदत होईल.

शैक्षणिक साहित्य वापराने कमी वेळेत प्रभावीपणे संकल्पना स्पष्ट करणे व त्यांचे दृढीकरण करणे शक्य होते. मुलांसोबतच शिक्षकांचाही उत्साह वाढतो. **परिशिष्ट 'ब'** मध्ये अध्ययन नमुना

कृतींसाठी मराठी भाषेकरिता अध्ययन समृद्धी साहित्य संचातील (भाषा पेटीतील) कोणते साहित्य वापरता येईल याबाबत माहिती दिलेली आहे.

अध्ययन समृद्धी साहित्य संचाचा प्रभावी वापर होणे गरजेचे आहे. प्रशिक्षणानंतरही सद्य:स्थितीत सदर संचाच्या वापराबाबत खालील बाबी दिसून येतात :

पेटीतून साहित्य काढणे व पुन्हा पेटीत ठेवणे हे कठीण व वेळखाऊ काम वाटणे.

व्यवस्थापनाअभावी योग्य साहित्य योग्य वेळी उपलब्ध न होणे.

साहित्य एकमेकांत मिसळले गेल्याने ते उपलब्ध न होणे.

साहित्य हरवेल, खराब होईल या भीतीने त्याचा वापरच न करणे.

साहित्य केवळ प्रदर्शन स्वरूपात साठवून ठेवण्याकडेच कल असणे.

शिक्षकांचीच साहित्य वापराबाबतची अनास्था, तळमळीचा अभाव इ.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेऊन, त्यावर उपाय शोधून शिक्षकांनी पायाभूत भाषा साक्षरतेचे आणि एकूणच समग्र शिक्षण प्रक्रियेचे ध्येय साध्य करण्यासाठी या संचाचा प्रभावी वापर करणे क्रमप्राप्तच आहे. त्यासाठी शाळा स्तरावर वर्गखोलीतील एखादा कोपरा, कपाट अथवा शक्य झाल्यास स्वतंत्र भाषा प्रयोगशाळा खोली तयार करावी. साहित्याचे वर्गीकरण करावे. विविध प्रकारची खोकी, टाकाऊ खोकी आदींचा वापर करून संबंधित साहित्य साठवून ठेवणे शक्य आहे. साहित्य वर्गीकृत करून शिक्षकांनी त्या कृतीमागील अध्यापनशास्त्र नीट समजून घ्यावे व मुलांचा अध्ययनस्तर वाढविण्याकरिता त्यांचा वापर करावा.

पूरक आणि संदर्भ पुस्तकांचे संकलन करून, त्यांचेही व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. स्मार्ट फोन, स्मार्ट टी.व्ही. प्रोजेक्टर अशा डिजिटल साहित्याचा अध्यापन प्रक्रियेत तारतम्याने व मर्यादित वापर होईल याकडेही शिक्षकांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

अंतिमतः शैक्षणिक सहित्य ही आधारभूत बाब असली, तरी त्याचे योग्य व्यवस्थापन करून वापर केल्यास पायाभूत भाषा साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होईल.

## ४.६ पायाभूत भाषा साक्षरतेसंदर्भात दैनंदिन उपक्रमांच्या आयोजनात शिक्षकांची भूमिका

- पायाभूत साक्षरतेच्या संदर्भात विविध उपक्रम आपण शिक्षक म्हणून राबवत असतो; जसे की, **अध्ययन समृद्ध वातावरण** वर्गात निर्माण केले जाते. त्यात वर्गात विविध तक्ते, चार्ट, **मुलांचे लेखन, मुलांसाठीचे लेखन**, विविध प्रकारचे मजकूर, चित्रे, तक्ते, आपण तयार केलेले विविध मथळे हे सर्व साहित्य मुलांच्या नजरेच्या कक्षेत येईल, अशा पद्धतीने लावलेले असावे, तसेच

ते साहित्य मुलांच्या उत्साहानुसार नियमितपणे बदलतेसुद्धा असायला हवे. कारण कायमस्वरूपी साहित्य मुले काही काळानंतर बघत नाहीत. मुलांसोबत ज्या कृती शिक्षक करून घेतात; म्हणजे सहभागी वाचन, प्रकट वाचन यांसारख्या कृती करून घेताना त्या उद्दिष्टांसह पूर्ण करून घेता यायला हव्या. मुलांशी संवाद साधणे, चित्रे काढून घेणे, त्यांच्याकडून सादरीकरण करून घेणे, तसेच कथा, कविता, गाणी, अनुभव कथन, नाटक आणि भूमिका पालन, चित्र वाचन व त्यावर संवाद यांसारखे उपक्रम घ्यावेत.

**लक्षात ठेवावयाच्या बाबी**

- साहित्य प्रदर्शित केले जावे आणि नियमितपणे बदलावे.
- पुस्तकाविषयी जागरूकता आणि पुस्तक हाताळण्याच्या पद्धती बिंबवाव्या.
- एखादी कथा मनोरंजकपणे मोठ्याने वाचावी.
- वाचन मजकुरास अनुसरून आणि शब्दकेंद्रित असावे.

- **मध्यान्ह भोजन :** मध्यान्ह भोजन हा एक असा नित्यक्रम आहे, ज्यात मुलांचा जवळचा संबंध असतो आणि ते त्यात खूप रस घेतात. यावेळी विविध उपक्रमांचे नियोजन करता येईल. उदाहरणार्थ, शिक्षकांनी अन्नपदार्थ, भांडी इत्यादींची चित्रे रेखाटणे तसेच खाण्याच्या सवयी, आरोग्य आणि स्वच्छता, पोषण, पौष्टिक आहार, विविध संस्कृतींमधील खाद्यपदार्थ, वनस्पती आणि पर्यावरण इत्यादी विषयांवर संभाषणाला संधी दिली जाऊ शकते.
- **इतर संसाधन सामग्रीचा प्रभावी वापर :** लेखनाची संधी देण्यासाठी शिक्षक पाठ्यपुस्तक, कथा आणि कविता यांसह इतर संसाधन सामग्री वापरू शकतात. काळजीपूर्वक नियोजन केल्याने पाठ्यपुस्तकातील धडे आणि वर्गात उपलब्ध बालसाहित्य यांचा संबंध निर्माण होऊ शकतो आणि मुले एका विषयाशी संबंधित सामग्रीचा आनंद घेऊ शकतात. लेखन कृतींची सांगड पाठ्यपुस्तकासोबत घातल्यास पारंपरिक प्रश्नोत्तरे आणि रिक्त जागा भरण्याऐवजी लेखन अधिक मनोरंजक आणि अर्थपूर्ण होईल. पुढे, भित्तिपत्रके, गोष्टींची पुस्तके आणि कविता यांसारख्या विविध संसाधन सामग्रीचा वापर विद्यार्थ्यांना लिखित मजकुरात गुंतविण्यासाठी केला जाऊ शकतो.
- **ग्रंथालयाचा प्रभावी वापर :** मुलांना स्वतंत्र वाचन, सहभागी वाचन, प्रकट वाचन तसेच मार्गदर्शित वाचन यांद्वारे बालसाहित्याच्या संपर्कात आणण्याची गरज आहे. मुलांची शाश्वत साक्षरता कौशल्ये विकसित करणे, तसेच चिकित्सक विचार, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता विकसित करणे यासाठी ते महत्त्वाचे आहे. वेगवेगळ्या वयोगटातील मुलांसाठी त्यांचा वयोगट, वाचन क्षमता व भिन्न रुची यांना अनुरूप, योग्य अशी पुस्तके काळजीपूर्वक निवडणे आवश्यक आहे. एका कार्यात्मक

वाचनालयात मुलांशी संबंधित, वयानुरूप पुस्तके असावीत. अशा वाचनालयांची पायाभूत भाषा साक्षरता व संख्याज्ञानासाठी वर्गात व्यवस्था केली जाऊ शकते. जिथे शिक्षक आणि मुले पुस्तकांची देवाणघेवाण करू शकतात, तेथे ही वाचनालये कार्यशील व गतिशील राहतील. यामध्ये अध्ययनाच्या वैश्विक आराखड्यास अनुसरून पुस्तकांची निवड केली जाऊ शकते. मार्गदर्शिकेत दिलेल्या निकषाने बालसाहित्याची निवड निश्चित केली पाहिजे. साक्षरता उपक्रमांसाठी सुयोग्य जागा व पुस्तके मुलांना सहज घेता येतील अशी व्यवस्था करणेही गरजेचे आहे.

**लक्षात ठेवावयाच्या बाबी**

- प्रत्येक दिवशी शिक्षक मौखिक भाषा विकासाकरिता सुचविलेल्या उपक्रमांपैकी एक निवडू शकतात.
- उपक्रम केवळ इयत्ता पहिलीमध्येच नव्हे, तर सर्व प्राथमिक वर्गांमध्ये आयोजित केले जातील.

- **मुलाच्या घरातील भाषेवर भर देणे गरजेचे :** शाळेतील भाषेच्या संपर्कासोबतच मुलाची मातृभाषा किंवा घरची भाषा विकसित होण्यावर मौखिक भाषा विकासाचा भर असावा. मुलाच्या घरच्या भाषेचा वापर आणि त्याचा विकास सुरुवातीच्या प्राथमिक वर्गात सुरू ठेवला पाहिजे. सुरुवातीच्या टप्प्यावर मुलाच्या घरच्या भाषा विकासावर केलेले प्रयत्न हे मुलाला माध्यम भाषा आत्मसात करण्यात तसेच पायाभूत भाषासाक्षरते संदर्भात घटकांच्या विकासास मदत करतात. विविध अध्ययन अनुभवांमध्ये मुलाची घरची भाषा व शालेय माध्यम भाषा समाविष्ट कराव्यात.
- **शिक्षक मार्गदर्शिकेतील कृती आराखडा :** शिक्षकांच्या आठवडानिहाय सुलभ नियोजनासाठी, पायाभूत भाषा साक्षरतेमध्ये समाविष्ट घटकनिहाय अध्ययन-अध्यापन कृतींचा आराखडा या मार्गदर्शिकेच्या **परिशिष्ट 'ब'** मध्ये दिलेले आहे. त्याचा शिक्षकांनी गरजेनुसार उपयोग करावा.

  शाळेमध्ये शासनाकडून यापूर्वी दिल्या गेलेल्या (मराठी) अध्ययन समृद्धी साहित्य संचातील साहित्याची, सदर कृती आराखड्यामध्ये समाविष्ट केलेल्या कृतींच्या संदर्भाने सांगड घातलेली आहे. विद्यार्थ्यांच्या पायाभूत भाषा साक्षरतेच्या विकासासाठी या आराखड्याच्या आधारे शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या स्तरानुसार आठवडानिहाय अध्ययन-अध्यापनाचे नियोजन करावे. त्यासाठी साप्ताहिक नियोजनाचा एक नमुनाही सदर परिशिष्टात दिलेला आहे. या कृती केवळ नमुन्यादाखल आहेत. शिक्षक गरजेनुसार यामध्ये अधिकच्या कृतींचा समावेश करू शकतात.

## ४.७ समावेशित शिक्षण

शिक्षणप्रक्रियेत प्रत्येक मुलाला सामावून घेणे गरजेचे आहे. एकाच वर्गात सर्वसामान्य व विशेष गरजा असणारी अशी सर्व प्रकारची मुले असतात. ही सर्व मुले एकाच प्रकारच्या शिक्षण प्रक्रियेतून पुढे

जात असतात. प्रत्येक मुलाची शिकण्याची, विकसित होण्याची, वाढण्याची क्षमता वेगवेगळी असते, प्रत्येकाची गती वेगळी असते हे लक्षात घेऊन वातावरण निर्मिती केली जाते. ज्या शिक्षणप्रक्रियेत अशा सर्व प्रकारच्या मुलांना सामावून घेऊन त्यांच्या विकासात्मक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने वातावरण निर्मिती केली जाते, यालाच समावेशित शिक्षण म्हटले जाते.

**समावेशित शिक्षणातील महत्त्वाच्या बाबी :**

- प्रत्येक मुलाची व्यक्ती–व्यक्तींमध्ये असणारे साम्यभेद समजून घेऊन ते स्वीकारण्याची मानसिक तयारी होते.
- शालेय घटकात मैत्रीपूर्ण नाती तयार करण्याच्या संधी प्राप्त होतात.
- बोधात्मक, भाषिक, भावनिक, सामाजिक कौशल्ये प्राप्त होण्यास मदत होते.

**समावेशित शिक्षणासाठी मार्गदर्शक सूचना :**

- दिव्यांग मुलांच्या गरजांचा पूर्ण विचार करूनच वर्गातील अथवा वर्गाबाहेरील उपक्रमांचे नियोजन करावे.
- मूल जसे आहे तसे त्याला स्वीकारावे व समजून घ्यावे.
- मुलांमध्ये सामाजिक जाण व संवेदनशीलता निर्माण व्हावी या दृष्टीने, वर्गातील इतर मुलांनी दिव्यांग मुलांना मदत करावी, त्यांच्यासमवेत कृती करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.
- कृती करताना निष्पत्तीपेक्षा कृतीच्या प्रक्रियेला अधिक महत्त्व द्यावे.
- प्रत्येक मुलामध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी, प्रत्येक कृतीमध्ये त्याच्या गतीनुसार त्याला सहभागी होऊ द्यावे.
- परिपाठामध्ये 'वर्गातील समस्या निराकरण' या कृतीमध्येही सर्व मुलांना सहभागी करून घ्यावे.
- दिव्यांग मुलांनी वर्गातील इतर मुलांशी समायोजन साधावे यासाठी शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहित करावे.
- वर्गातील इतर मुलांमध्ये दिव्यांग मुलांप्रति संवेदनशीलता निर्माण करावी.
- दिव्यांग मुलांच्या पालकांशी चर्चा करून त्यांना योग्य पालकत्वाचे मार्गदर्शन करावे व दिव्यांग मुलांमधील गुणांना प्रोत्साहन द्यावे.
- अतिचंचल व स्वमग्न मुलांची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षित तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घ्यावे. या मुलांच्या गरजांबाबत जागरूक राहून तज्ज्ञ व्यक्तींनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

❑❑❑

**टीप :** शिक्षक मार्गदर्शिकेचे वाचन करत असताना महत्त्वाच्या आशयाच्या मुद्द्यांची नोंद सारांशरूपात शिक्षकांनी या ठिकाणी करावी.

## शिक्षक नोंदी

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

# ५. पायाभूत भाषा साक्षरता आणि मूल्यांकन

पायाभूत शिक्षणाचा कालावधी हा बुद्धी, क्षमता, शारीरिक वाढ, मानसिक परिपक्वता आणि मूल्यांच्या विकासासाठी महत्त्वाचा टप्पा असतो. या दृष्टीने प्रत्येक मुलाच्या उत्तम अध्ययनासाठी मदत आणि मार्गदर्शन करणे हा मूल्यांकनाचा प्राथमिक उद्देश असतो. शालेय शिक्षणाच्या पायाभूत वर्षांमध्ये अध्ययन वेगवेगळ्या टप्प्यांनी होते आणि मूलपरत्वे ते पूर्णपणे भिन्न असते. शैक्षणिक ध्येयप्राप्तीसाठी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा सतत आणि सर्वसमावेशकपणे पाठपुरावा करावा लागतो. यासाठी विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यांकन करणे अत्यंत गरजेचे असते. विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यांकन केल्याने, विद्यार्थ्यांच्या क्षमता, गरजा, आवडी आणि प्राधान्ये ओळखण्यास मदत होते. अध्ययन निष्पत्ती संदर्भात विद्यार्थ्यांची अपेक्षित संपादणूक झाली आहे किंवा कसे ? अध्ययन निष्पत्ती प्राप्ती करण्यात त्यांना काही अडथळे येतात का? असल्यास ते कोणते? याची माहिती मिळते. विद्यार्थ्यांच्या क्षमतांना प्रोत्साहन देण्यासाठी, तसेच त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मूल्यांकनाद्वारे प्राप्त माहितीचा शिक्षकांना उपयोग होत असतो. त्यामुळेच पायाभूत भाषा साक्षरता प्राप्तीच्या प्रक्रियेतही विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यांकन करणे महत्त्वाचे आहे.

## ५.१ मूल्यांकनाची दोन प्रमुख क्षेत्रे

पायाभूत अवस्थेतील मूल्यांकनाचे स्थूलमानाने दोन प्रमुख क्षेत्रांमध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते.

अ) शाळा आधारित मूल्यांकन

ब) विस्तृत स्तरावर केलेले विद्यार्थी संपादणूक सर्वेक्षण

**अ) शाळा आधारित मूल्यांकन :** शाळा आधारित मूल्यांकन प्रक्रियेत शिक्षक स्वतः विद्यार्थ्यांसमवेत मूल्यांकन कार्य करतात; ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड न पडता शिक्षण अखंडित चालू राहते. शाळा आधारित मूल्यांकन हे मुख्यतः वर्गातील शैक्षणिक आंतरक्रियांचे वैयक्तिक तसेच सामूहिक परिणाम पाहते. शाळा आधारित मूल्यांकनात शिक्षक स्वतःच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतः तयार केलेली मूल्यांकनाची साधने व पद्धती वापरतो आणि अध्ययनाचे सूक्ष्म मूल्यांकन करतो. या मूल्यांकनाच्या निष्कर्षांचा उपयोग करून शिक्षकांना विद्यार्थिनिहाय अध्ययन निष्पत्तीच्या संदर्भाने गरजेनुसार अध्ययन अनुभवांचे नव्याने नियोजन करणे सुलभ जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी शाळा आधारित मूल्यांकन करणे खूप महत्त्वाचे आहे.

**ब) विस्तृत स्तरावर केलेले विद्यार्थी संपादणूक सर्वेक्षण :** राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावरून मोठ्या प्रमाणात यादृच्छिक पद्धतीने नमुना निवडून विद्यार्थ्यांच्या संपादणुकीचे सर्वेक्षण केले जाते. याद्वारे संबंधित राज्यात, जिल्ह्यांमध्ये आणि तालुक्यांमध्ये शिक्षणाच्या गुणवत्तेचे परीक्षण केले जाते. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS), राज्यस्तरीय संपादणूक सर्वेक्षण (SLAS), पायाभूत

अध्ययन सर्वेक्षण (FLS) यांसारखी सर्वेक्षणे यामध्ये येतात. शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी धोरणांची निश्चिती करण्याकरिता या अभ्यासाचा उपयोग होतो, परंतु यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांची संपादणूक स्पष्ट केली जात नाही. त्यामुळे दैनंदिन अध्ययन प्रक्रियेसंदर्भात या सर्वेक्षणांचा शिक्षकांना फारसा उपयोग होत नाही.

## ५.२ पायाभूत भाषा साक्षरता आणि मूल्यांकन

निपुण भारत अभियानांतर्गत निश्चित करण्यात आलेल्या विकासात्मक ध्येय क्रमांक दोन नुसार मुले प्रभावी संवादक बनवणे हे पायाभूत भाषा साक्षरतेच्या दृष्टीने महत्त्वाचे ध्येय आहे. या ध्येयांतर्गत निश्चित केलेल्या क्षमता व स्तरनिहाय अध्ययन निष्पत्ती यांचा विचार करून, प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेचे मूल्यांकन करणे गरजेचे आहे. त्यासाठी शाळा आधारित मूल्यमापन प्रक्रियेचा अवलंब शिक्षकांनी प्रभावीपणे करावा.

पायाभूत भाषा साक्षरतेमध्ये समाविष्ट असणाऱ्या घटकांचा विचार करून, तसेच पायाभूत भाषा साक्षरतेतील समाविष्ट घटकांचा एकत्रित विचार करून, पायाभूत भाषा साक्षरतेसंदर्भात विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करावे लागेल. सदर मूल्यांकनांद्वारे प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्याला अध्ययन निष्पत्ती, क्षमता प्राप्ती यामध्ये असणारे अडथळे दूर करण्यासाठी शिक्षकांनी स्वत: मार्गदर्शक म्हणून भूमिका पार पाडावी. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार शालेय शिक्षणामध्ये **सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचे** धोरण आपण स्वीकारले आहे. त्या अंतर्गत असणाऱ्या आकारिक मूल्यमापनाचा, त्यात अंतर्भूत असणाऱ्या मूल्यमापन साधनतंत्रांचा प्रभावी वापर या संदर्भाने आपल्याला करावा लागणार आहे.

## ५.३ विद्यार्थी मूल्यांकनासंदर्भात काही महत्त्वाच्या बाबी

पायाभूत भाषा साक्षरतासंदर्भाने मुले प्रभावी संवादक बनणे हे महत्त्वाचे ध्येय आहे. त्या अनुषंगाने मूल्यांकन करताना शिक्षकांनी पुढील गोष्टी लक्षात घ्याव्या.

- विद्यार्थ्यांची मातृभाषा ही शाळेतील औपचारिक वर्षांमध्ये मुलांची संवादाची भाषा असणे आवश्यक आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्यवहार समजण्यात कोणताही गोंधळ होणार नाही आणि विद्यार्थी मुक्तपणे अभिव्यक्त होतील.
- संवाद साधण्याची क्षमता ही संप्रेषक आणि प्राप्तकर्ता म्हणून विकसित करणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा, की संवाद साधण्याची गरज ओळखणे, संवाद साधण्याकरिता विषय तयार करणे, उचित शब्दांचा संवादामध्ये वापर करणे, त्यांना समजेल अशा पद्धतीने शब्दबद्ध करणे, चेहऱ्यावरील योग्य हावभाव आणि देहबोलीसह संभाषण साकार करणे आणि शेवटी प्राप्तकर्त्याकडून शाब्दिक आणि अशाब्दिक अभिप्राय मिळवणे या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांचे मूल्यांकन होऊ शकते.
- वाचन आणि लेखन या क्षेत्रांबरोबर श्रवण आणि भाषण–संभाषण या क्षेत्रांचाही मूल्यांकनामध्ये समावेश जाणीवपूर्वक करावा.

- या स्तरावरील भाषा आणि पायाभूत साक्षरतेचा, विकासाचा भविष्यातील वाचन क्षमतेशीही थेट सहसंबंध असतो. त्यामुळे विद्यार्थी आकलनासह अस्खलितपणे वाचन करू शकतो की नाही, याचा मूल्यांकनामध्ये समावेश करावा. वाचनासाठीच्या मजकुरामध्ये पाठ्यपुस्तकाशिवाय रस्त्यावरील वाहतूक चिन्हे, सूचनाफलक, भित्तिपत्रके, किराणा मालावरील कागदी आवरण, बसस्थानक किंवा रेल्वे स्थानकात लिहिलेले गाड्यांचे वेळापत्रक यांसारख्या परिसरातील बाबींचा समावेश केला जाऊ शकतो, तसेच या बाबींच्या मूल्यांकनाकरिता वाचन व त्यावर आधारित आकलन स्तरावरील प्रश्न विद्यार्थ्यांना विचारता येतील.
- **रुब्रिक्सद्वारे मूल्यांकन :**
  रुब्रिक्स हे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यांकन आणि शाळाधारित मूल्यांकन यासाठी एक महत्त्वाचे साधन आहे. रुब्रिक्समध्ये निकषांनुसार व गरजेनुसार तीन ते चार स्तरांचा समावेश असेल.

**हे स्तर साधारणपणे असे करता येतील :**

१) **प्रारंभिक (Below Basic / Beginners)**
या स्तरामधील विद्यार्थ्यांचे ज्ञान व कौशल्ये पुरेशा प्रमाणात प्राप्त/संपादित झालेली/झालेल्या नसतात. या विद्यार्थ्यांना अध्ययनाच्या प्रत्येक टप्प्यावर खूप मार्गदर्शनाची, प्रोत्साहन देण्याची गरज असते.

२) **प्रगतशील (Basic / Progressive)**
या स्तरामधील विद्यार्थ्याने संबधित विषयाच्या/विषयाची अध्ययन निष्पत्तीमधील किमान ज्ञान व कौशल्ये प्राप्त/संपादित केलेली असतात. हे विद्यार्थी सामान्य सूचनांचे/नियमांचे पालन/अनुकरण करतात. त्यांच्याकडे काही चांगल्या कल्पना असतात, मात्र त्यामध्ये सुसंगतता नसते. अध्ययनाच्या अनेक टप्प्यावर यांना मार्गदर्शनाची आवश्यकता असते. सामान्य समस्या ते तर्काने सोडवू शकतात तसेच या पातळीवरील विद्यार्थी सोप्या भाषेत आपले म्हणणे 'अभिव्यक्त' करू शकतात.

३) **प्रवीण (Basic / Proficiant)**
या स्तरामधील विद्यार्थ्यांनी अध्ययन निष्पत्ती बऱ्याच प्रमाणात प्राप्त/संपादित केलेल्या असतात. या स्तरावरील विद्यार्थी कमीत कमी निरीक्षणाखाली आपले कार्य, स्वतंत्रपणे करतात. पद्धतशीरपणे ते आपल्या समस्येचे निराकरण करतात. स्वत:च्या कल्पना ते इतरांना स्पष्टपणे सांगतात. कमीत कमी मार्गदर्शनाखाली व पर्यवेक्षणाखाली ते नवीन कल्पना मांडतात किंवा स्वत: निर्माण करतात.

४) **प्रगत (Advanced)**
या स्तरामधील विद्यार्थ्यांनी अध्ययन निष्पत्ती पूर्ण संपादित/प्राप्त केलेल्या असतात. अशा विद्यार्थ्यांमध्ये उच्च विश्लेषण क्षमता, तार्किक क्षमता, चिकित्सक विचार, प्रभावी संप्रेषण कौशल्य, स्वतंत्र विचार क्षमता, सर्जनशीलता असते. असे विद्यार्थी काही संकल्पनेच्या एकत्रिकरणाद्वारे अथवा कल्पनेद्वारे नवीन ज्ञानाची निर्मिती करतात. या स्तरामधील विद्यार्थी कठीण समस्येचे निराकरण करतात. प्राप्त परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात असते.

वरील चार स्तरांचा विचार करून अध्ययन निष्पत्ती किंवा अध्ययन घटकाचा विचार करून आपणास मूल्यांकन रुब्रिक तयार करता येतील.

**उदाहरणार्थ :** चित्राच्या आधारे भाषण-संभाषणाच्या मूल्यांकनाचे पुढील नमुना रुब्रिक्स पहा :

**मूल्यांकन रुब्रिक :**

| निकष | स्तर |
|---|---|
| चित्रातील सर्व आशय लक्षात घेऊन चित्राविषयी ४ ते ५ वाक्ये सांगतो. | प्रगत |
| चित्रातील सर्व आशय लक्षात घेऊन २ ते ३ वाक्य सांगतो. | प्रवीण |
| चित्र कशाचे आहे हे सांगतो. | प्रगतशील |
| काहीही बोलत नाही. | प्रारंभिक |

- मूल्यांकनानंतर वरीलप्रमाणे चार स्तरांनुसार विद्यार्थ्यांच्या संपादणुकीचे वर्गीकरण केल्यास कोणत्या स्तरातील विद्यार्थ्यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे हे समजेल आणि त्या संदर्भात संभाषण/भाषण कौशल्य विकसनाचे अधिकचे व नेमके उपक्रम तयार करण्यास आपणास मदत होईल.
- हे मूल्यांकन तणावमुक्त आणि व्यापक स्वरूपाचे असायला हवे.
- शाळा आधारित मूल्यांकन हे शिक्षकांची स्वत:ची क्षमता आणि नावीन्यपूर्ण पद्धतीने विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्यासाठी शिक्षकास प्रदान केलेली स्वायत्तता यांच्या प्रमाणावर अवलंबून असते म्हणून शाळा आधारित मूल्यांकनात शिक्षकाने प्राथमिक सुलभक म्हणून भूमिका बजावावी व विद्यार्थ्यांच्या सर्वंकष मूल्यांकनाबाबत त्याला दिलेल्या स्वायत्ततेचा त्याने पूर्णपणे वापर करावा.
- शाळा आधारित मूल्यांकनामध्ये विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार वर्गशिक्षकांद्वारे तयार केलेल्या मूल्यांकन साधनांच्या माध्यमातून सूक्ष्म स्तरावरील गुणवत्तेचे मूल्यांकन केले जावे.
- अध्ययन निष्पत्ती पडताळण्याकरिता आवश्यक असणाऱ्या साधनांसह प्रासंगिक नोंदी, विद्यार्थी संचिका आणि विविध प्रकारच्या आंतरक्रिया यांचाही मूल्यांकनासाठी वापर केला जाऊ शकतो. विद्यार्थ्यांना स्वत:चे व इतर विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्याकरिता शिक्षकांनी 'स्वयं मूल्यांकन' आणि 'सहाध्यायी मूल्यांकन' या मूल्यांकन प्रकाराचाही वापर करावा.
- शाळा आधारित मूल्यांकनाद्वारे विद्यार्थ्यांच्या स्वत:च्या कल्पनेस चालना देणे, त्यांना एक सकारात्मक व्यक्ती म्हणून विकसित होण्यासाठी मदत करणे, त्यांचा स्वतःच्या क्षमतेबद्दल आत्मविश्वास वाढवणे आणि मुलांना त्यांच्या स्वतःच्या गतीने वैयक्तिक प्रगती करण्यास मदत करणे या गोष्टी होणे आवश्यक आहे.

❑❑❑

**टीप :** शिक्षक मार्गदर्शिकेचे वाचन करत असताना महत्त्वाच्या आशयाच्या मुद्द्यांची नोंद सारांशरूपात शिक्षकांनी या ठिकाणी करावी.

## शिक्षक नोंदी

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

## परिशिष्ट 'अ'

**विकासात्मक ध्येय-२ (Development Goal - 2)**

**मुले प्रभावी संवादक बनतात. (Children become Effective Communicators - EC)**

| प्रमुख क्षमता | | |
|---|---|---|
| **बोलणे आणि ऐकणे (श्रवण आणि भाषण)** | **समजपूर्वक वाचन** | **हेतूपूरक लेखन** |
| • समजपूर्वक श्रवण<br>• सर्जनशील अभिव्यक्ती आणि संभाषण<br>• भाषा आणि सर्जनशील विचार<br>• शब्दसंग्रह विकास<br>• संभाषण आणि भाषण कौशल्य<br>• भाषेचा अर्थपूर्ण वापर. | • पुस्तकाशी जवळीक साधतो.<br>• मुद्रित मजकुराविषयी जागरूकता आणि अर्थ लावतो.<br>• वाचन पूर्व तयारी<br>• ध्वन्यात्मक जागरूकता<br>• चिन्ह आणि उच्चार यांची सांगड घालतो.<br>• ज्ञानासहित पूर्वानुभवांचा वापर करतो आणि अंदाज बांधतो.<br>• आनंद आणि विविध हेतूंसाठी स्वतंत्र वाचन करतो. | • मूलभूत साक्षरता कौशल्ये<br>• स्वअभिव्यक्ती लेखन<br>• स्वत:चे अक्षरज्ञान व उच्चार ज्ञान यांचा उपयोग करून शब्द लिहितो.<br>• पारंपरिक पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतो.<br>• चित्रशब्द आणि अर्थपूर्ण वाक्यांना प्रतिसाद देतो.<br>• यमक जुळणाऱ्या शब्दांचे लेखन करतो.<br>• कृतियुक्त शब्द, संबोध शब्दांचा वापर करून अर्थपूर्ण वाक्य लिहितो. स्वत:ला व्यक्त करण्याकरिता संदेश लिहितो.<br>• मिश्रभाषिक संकेतांचा वापर करतो.<br>• वेगवेगळ्या उद्देशांसाठी वर्गातील आणि घरातील विविध कृतींचे लेखन करतो. जसे : बाजारातील साहित्याची यादी बनविणे. आजी-आजोबांना शुभेच्छापत्र, संदेश किंवा मित्रांना निमंत्रण इ. |

# निपुण भारत अभियान

## विकासात्मक ध्येय-२ (Development Goal - 2)

## मुले प्रभावी संवादक बनतात. (Children become Effective Communicators - EC)

| अध्ययन निष्पत्ती | |
|---|---|
| इयत्ता पहिली : प्रथम भाषा-मराठी | |
| EC L1 4.1 | स्वतःच्या गरजांविषयी बोलताना आणि माहिती मिळविण्यासाठी प्रश्न विचारताना स्वतःच्या भाषेचा किंवा शालेय भाषेचा वापर करतो. |
| EC L1 4.2 | वाचन कोपरा/वाचन साहित्यातून पुस्तक निवडतो आणि त्याविषयी चर्चा करतो/चित्रांच्या साहाय्याने गोष्ट तयार करून सांगतो. |
| EC L1 4.3a | स्वतःच्या अनुभवाची, वाचलेल्या किंवा परिचित गोष्टींशी स्वतःच्या भाषेत सांगड घालतो आणि त्याविषयी बोलतो. |
| EC L1 4.3b | आवडीच्या खेळाविषयी काही नियम तयार करतो. |
| EC L1 4.4 | परिचित कविता आणि गाण्यातील यमक जुळणारे शब्द ओळखतो आणि यमक जुळणारे नवीन शब्द तयार करतो. |
| EC L1 4.5 | पाठ्यपुस्तकातील घटकांचा आणि आपल्या आवडीच्या पाठ्यवस्तूंचा अर्थ लावण्यासाठी मागील आणि पुढील पृष्ठ उलटवून अंदाज लावतो, तसा प्रयत्न करतो. |
| EC L1 4.6 | दिलेल्या मजकुराशी चित्रांचा सहसंबंध जोडून मजकुराबाबत अंदाज बांधतो व समजून घेतो. |
| EC L1 4.7 | घरी शाळेत व आजूबाजूच्या परिसरात आढळणाऱ्या पक्षी व प्राण्यांविषयी बोलतो आणि स्व-भाषेत लिहितो. |
| EC L1 4.8 | कविता, गोष्टी वाचताना अक्षरांची चिन्हे आणि त्यांच्या ध्वनीबद्दल जागरूकता दाखवितो आणि त्याचा लिहिण्यात वापर करतो. |
| EC L1 4.9 | स्वतः काढलेल्या चित्रांना व दिलेल्या चित्रांना स्वभाषेत नावे देतो. |

# निपुण भारत अभियान

## विकासात्मक ध्येय-२ (Development Goal - 2)

## मुले प्रभावी संवादक बनतात. (Children become Effective Communicators - EC)

| इयत्ता दुसरी : प्रथम भाषा-मराठी | |
|---|---|
| EC L1 5.1 | विविध उद्देशांसाठी, मत व्यक्त करण्यासाठी, प्रश्न विचारण्यासाठी शालेय भाषेचा वापर करतो. |
| EC L1 5.2 | परिचित गोष्टींतील पात्रांविषयी बोलतो, त्यांची चित्रे काढतो आणि त्याच्या आवडीच्या पात्राविषयी लिहितो. |
| EC L1 5.3a | स्वतःची शैली वापरून कविता म्हणतो आणि स्वतःच्या भाषेमध्ये गोष्टीचे वर्णन करतो. |
| EC L1 5.3b | शाळेच्या किंवा वर्गाच्या कृतियुक्त कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतो. |
| EC L1 5.3c | स्वतःच्या आवडीने गोष्टीचे वर्णन करतो आणि कविता म्हणतो. |
| EC L1 5.4 | परिचित कविता आणि गाणे यांतील यमक जुळणारे शब्द आणि सारख्या उच्चाराचे शब्द तोंडी किंवालिखित स्वरूपात सांगतो/तयार करतो. |
| EC L1 5.5a | बाल साहित्यातील आणि पाठ्यपुस्तकातील मजकुराबाबत त्याला परिचित अशा संदर्भाने अंदाज लावतो आणि वाचतो. |
| EC L1 5.5b | प्रतिक्रिया, आवडी-निवडी व्यक्त करतो आणि प्रश्न विचारतो. |
| EC L1 5.5c | परिचित आणि अपरिचित मजकुराचे वाचन करण्याचा प्रयत्न करतो आणि त्याविषयी बोलतो, चर्चा करतो. उदा. चित्राविषयी अंदाज लावतो, ध्वनी चिन्हे, आवाज यांचा सहसंबंध जाणतो, पूर्वज्ञान व अनुभवांच्या आधारे शब्द ओळखतो. |
| EC L1 5.6 | चित्रकथा/गोष्टींची पुस्तके यांतील घटना आणि पात्रे समजून घेतो आणि त्यांच्या विषयी लिहितो. |
| EC L1 5.7 | कथा/कविता आणि इतर मजकुराच्या आधारावर व्यक्तिरेखा व प्रसंग यांवर बोलतो. |
| EC L1 5.8 | शब्द, वाक्य आणि विविध भाव योग्य रीतीने वापरून लिहितो. |
| EC L1 5.9 | कल्पना आणि सर्जनशीलतेचा वापर करून कथांचा विस्तार करतो. |

## निपुण भारत अभियान

### विकासात्मक ध्येय-२ (Development Goal - 2)

### मुले प्रभावी संवादक बनतात. (Children become Effective Communicators - EC)

| इयत्ता तिसरी : प्रथम भाषा-मराठी | |
|---|---|
| EC L1 6.1 | आवडीनिवडी, परिचित घटना/आकाशवाणी, दूरदर्शनवरील कार्यक्रम यांविषयी प्रतिसाद देण्यासाठी शालेय भाषा/स्वतःची भाषा वापरतो. |
| EC L1 6.2 | कविता आणि गोष्ट यांचे तोंडी वर्णन करताना त्यांचा विस्तार करतो. |
| EC L1 6.3a | संभाषण करताना परिचित साहित्य उदा. कविता, गोष्ट, भित्तिपत्रके, जाहिरात यांची स्वतःच्या अनुभवांशी सांगड घालतो. |
| EC L1 6.3b | कथा किंवा कविता यांसारख्या परिचित साहित्यातील पात्रे, चित्रे, मध्यवर्ती कल्पना यांच्याविषयी चर्चा करतो, प्रश्न विचारतो आणि आपले मत व्यक्त करतो. |
| EC L1 6.3c | सकाळच्या सदिच्छा, कुटुंबातील गप्पागोष्टी यांविषयी बोलतो आणि आवडलेल्या बाबींचे स्पष्टीकरणदेतो, तसेच त्याविषयी वहीत आणि फळ्यावर लिहितो. |
| EC L1 6.4a | विनोदी आणि मनोरंजक गोष्टी, कविता इत्यादींचे आवाजातील चढउतार, योग्य शैली, गती, अस्खलितपणा यांद्वारे वर्णन करतो. |
| EC L1 6.4b | कोडी सोडवितो, भाषिक खेळ खेळतो व ताल समजून गाण्यात रस घेतो. |
| EC L1 6.5a | वाचन करताना मजकुरातून अपरिचित शब्दांचा संबंध लावतो आणि समजून घेतो. |
| EC L1 6.5b | पुस्तकांतील पानावर लिहिलेले क्रमांक वाचतो आणि सांगतो. उदा. पृष्ठ क्र. ४५, ७६, २१ |
| EC L1-6.5c | विविध मजकुराचे समजपूर्वक वाचन करतो; जसे की, वर्तमानपत्रे, बाल मासिके आणि त्यांविषयी थोडक्यात लिहितो. |
| EC L1 6.6a | वेगवेगळ्या कथा, कविता, मजकूर यांतील भाषेची वैशिष्ट्ये ओळखतो. (नामदर्शक शब्द, कृतिदर्शकशब्द, विरामचिन्हे, इ.) |
| EC L1 6.6b | नामदर्शक शब्द, कृतिदर्शक शब्द आणि विरामचिन्हांचा लिहिताना वापर करतो. |
| EC L1 6.6c | परिचित मजकूर एका विशिष्ट लयीत, आवाजाचा चढ उतार करून वाचतो. |
| EC L1-6.7a | सकाळच्या सदिच्छा देणे यासारख्या कृती व संभाषणामध्ये सहभागी होतो. |
| EC L1 6.7b | स्वतःच्या आवडत्या कृती सांगतो, स्पष्ट करतो आणि वहीत आणि फलकावर लिहितो, |
| EC L1 6.8 | परिचित घटना किंवा मजकुराचे अभिव्यक्तीच्या विविध प्रकारांनुसार घटना, प्रसंग, पत्रे, मध्यवर्ती कल्पना, शीर्षक यांचेविषयी लेखन करतो. |
| EC L1 6.9 | छोटे संदेश लिहितो. उदा. माझी निळ्या रंगाची सायकल हरवली आहे, जर कुणाला ती सापडली किंवा दिसली असेल, तर मला कळवा. |

## परिशिष्ट 'ब' (१)

### पायाभूत भाषा साक्षरता : अध्ययन-अध्यापन कृती आराखडा

**मौखिक भाषा विकास :**

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| **कृतियुक्त गाणी म्हणणे.** | १) विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील विषयांवरील कृतियुक्त गाण्यांचा संग्रह<br>२) पारंपरिक- ओव्या, अभंग, भुलाबाई मंगळागौर, हादगा<br>३) परिसरातील स्थानिक बोलीतील कृतियुक्त गाणी | • कृतियुक्त गाणी तालासुरात व साभिनय म्हणू या, विद्यार्थ्यांकडून म्हणून घेऊ या.<br>• मुलांच्या घरच्या भाषेतील मूळ गाणी, त्याच गाण्यांचे मराठीत भाषांतर करून दोन्ही भाषांमधील गाणी कृतियुक्त पद्धतीने म्हणून घेऊ या.<br>• मुलांच्या व पालकांच्या मदतीने घरच्या भाषेतील गाण्यांचा संग्रह करू या. | • मुलांना भाषेच्या तालबद्धतेचा, गेयतेचा आनंददायी अनुभव मिळेल.<br>• भाषेतील ध्वनींची जाण विकसित होण्यास मदत होईल.<br>• मुलांची शब्दसंपत्ती वाढेल.<br>• मुले शाळेत रमतील. |
| **गोष्टी सांगणे/ ऐकविणे.** | गोष्टींची पुस्तके, ऑडिओ (व्हिडिओ अपेक्षित नाहीत.) | • मुलांना रोज गोष्ट सांगू या. (शक्यतो तोंडी)<br>• मुलांचा परिसर, भाषा, भावविश्व व पूर्वानुभव लक्षात घेऊन गोष्टींची निवड करू या.<br>• सुरुवातीला छोटी वाक्ये, सोपी भाषा, प्रसंग व पात्रे कमी असणाऱ्या गोष्टी निवडूया.<br>• गोष्ट सांगताना : शब्दांचे उच्चार, आवाजातील चढ-उतार, गती, लय यांकडे विशेष लक्ष देऊ या.<br>• मुलांच्या घरच्या भाषेत चित्रमय गोष्टी तयार करू या. या व इतर गोष्टी, भाषांतरित केलेल्या गोष्टी दोन्ही भाषांमध्ये ऐकवूया. | • मुलांना भाषेच्या तालबद्धतेचा आनंददायी अनुभव मिळेल.<br>• भाषेतील ध्वनींची जाण विकसित होण्यास मदत होईल.<br>• जिज्ञासा, कुतूहल निर्माण होईल.<br>• अंदाज करणे, घटनाक्रम समजून घेणे यांसाठी मदत होईल.<br>• शब्दसंपत्ती वाढेल.<br>• मुले शाळेत रमतील. |
| **उड्या मारणे, लोटांगण घालणे.**<br>१) बेडूक उडी, ससा उडी<br>२) कोलांटी उडी | | • या कृती विद्यार्थ्यांकडून गटात व स्वतंत्र करून घेऊ या. | • खेळण्यातील आनंद मिळेल.<br>• स्नायूंवर नियंत्रण व हालचालींमध्ये समन्वय साधण्यास मदत होईल.<br>• मेंदूला आव्हान मिळेल, एकाग्रता वाढेल.<br>• सूचना ऐकून, समजून कृती करणे, निरीक्षण करणे या क्षमतांच्या विकासास मदत होईल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| **गप्पा मारणे.**<br>१) अनौपचारिक गप्पा<br>२) औपचारिक गप्पा | परिचयाच्या वस्तू व चित्रे,<br>अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र.<br>म/०३/०१ ते म/०३/१५ | १) अनौपचारिक गप्पा – विषय ठरलेला नसतो, सहजपणे गप्पा होतात. जसे – आज शाळेत येताना काय काय पाहिले? अशा प्रकारचा प्रश्न विचारून गप्पांना सुरुवात करता येईल.<br>२) औपचारिक गप्पा – विषय ठरलेला असतो, त्यास अनुसरून गप्पा होतात. गप्पांचे विषय मुलांच्या अनुभव–विश्वातील असावेत. विद्यार्थ्यांना वस्तू अथवा चित्र दाखवून त्यावर गप्पा घडवून आणाव्यात.<br>**महत्त्वाचे –** ठरवून गप्पा मारताना प्रश्न विचारून, स्वतःचा अनुभव सांगून गप्पांना दिशा देऊ या. उदा. दगडाचा आकार, रंग, स्पर्श, दगडाचे उपयोग इ.<br>मुले गप्पा करताना घरच्या भाषेचा वापर करतात, ती भाषा सहजपणे स्वीकारून आवश्यक तेथे घरच्या भाषेचा वापर करू या. | • पाहिलेले, अनुभवलेले प्रसंग, घटना इत्यादींवर विचार करण्याची सवय विकसित होईल.<br>• आपले विचार/निरीक्षणे योग्य शब्दांत मांडण्याचा प्रयत्न होईल.<br>• इतरांचे ऐकून घ्यायचे असते हे समजेल.<br>• आत्मविश्वास वाढेल.<br>• गप्पा करताना घरची भाषा सहज वापरणे व स्वीकारणे झाल्यास मुले धाडसाने बोलू लागतात. |
| **चित्रवाचन, चित्रवर्णन, चित्रगप्पा,**<br>१) चित्राचे नाव सांगणे.<br>२) चित्रातील कृती सांगणे.<br>३) चित्रवर्णन.<br>४) चित्रगप्पा | अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र.<br>म/०२/०१ ते म/०२/२२,<br>म/०३/०१ ते म/०३/१५ | १) चित्रवाचन : एक वस्तू, पक्षी, प्राण्याचे चित्र दाखवून चित्र/चित्रातील कृती ओळखायला सांगू या.<br>२) चित्रवर्णन : चित्रातील कृतींकडे लक्ष वेधून प्रश्न विचारू या. चित्रातील तपशीलांकडे लक्ष वेधू या.<br>३) चित्रगप्पा : चित्राच्या मदतीने मुलांना स्वतःचे अनुभव, निरीक्षणे सांगण्यास प्रवृत्त करू या.<br>**वरील कृती सामूहिक, गटात व वैयक्तिक या क्रमाने घेऊ या.**<br>**मुलांची घरची भाषा स्वीकारावी व यालाच....... असेही म्हणतात असे सांगावे.**<br>**परिसरातील व परिचयातील चित्रांचा व छायाचित्रांचा संग्रह करून सुरुवातीला त्यांचा वापर करू या.** | • निरीक्षण करणे व ते पूर्वानुभवांशी जोडणे, कल्पना करणे यांची संधी मिळेल.<br>• वस्तू/प्राणी/पक्षी याचे चित्र व त्याचे नाव (उच्चार) यांची सांगड घालता येईल.<br>• आपले विचार/निरीक्षणे योग्य शब्दांत मांडण्याचा प्रयत्न होईल. आत्मविश्वास वाढेल.<br>• श्रवण – संभाषण शब्दसंपत्ती वाढेल.<br>• परिचित चित्रे पाहून मुले सहज बोलतात. नंतर अपरिचित चित्रांबाबत विचार करून बोलू शकतात. |
| **ज्ञानेंद्रिय अनुभव व चर्चा**<br>रंग, आकार, स्पर्श, चव, गंध | विविध रंगांच्या, चवींच्या, स्पर्शांच्या, गंधांच्या व आकारांच्या वस्तू | उपलब्ध वस्तूंच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रंग, चव, स्पर्श, आकाराचे विविध प्रकारचे अनुभव देऊ या. त्यावर गटनिहाय आणि नंतर स्वतंत्रपणे चर्चा घडवून आणू या. | • विविध प्रकारचे अनुभव घेऊन त्यावर विचार करण्याची व बोलण्याची संधी मिळेल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| | | उदा. कापूस, कापड, लाकूड, दगड या वस्तू डोळे झाकून स्पर्शाने ओळखण्याचा खेळ. कसे ओळखले/स्पर्श कसा होता? स्थूल फरकांकडून सूक्ष्म फरकांकडे जाणे तसेच विविध प्रकारच्या स्पर्शांसाठी (मऊ–टणक, खरबरीत–खडबडीत) असलेल्या शब्दांची ओळख करून देणे. | • रंग, आकार, चव, स्पर्श यांतील सूक्ष्म साम्य भेद करण्याची क्षमता विकसित होईल.<br>• वर्गीकरण, तुलना करण्याची सवय लागेल.<br>• आपले अनुभव योग्य शब्दांत मांडता येतात हे समजेल. |
| **स्वतःची मित्राची, कुटुंबाची ओळख** | | मुलांना स्वतःबद्दल, मित्रांबद्दल, कुटुंबीयांबद्दल क्रमाक्रमाने बोलण्यास सांगू या. सूचक प्रश्न विचारून हळूहळू व्यक्तीचे गुण, स्वभाव, काम यांबद्दल बोलते करू या. मुलाची घरची भाषा स्वीकारू या. | • मुले बोलती होतील.<br>• इतरांप्रमाणे मीही महत्त्वाचा आहे. माझेही ऐकले जाते. हे अनुभवल्यामुळे आत्मसन्मान वाढेल. |
| **घटनाक्रम** (उदा. सरबत, भाकरी करणे, चहा करणे, शाळेत येणे) | निश्चित केलेली कृती करण्यासाठी लागणारे साहित्य.<br>अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/०८/१०/०१ ते म/०८/१०/१० | • काही छोट्या छोट्या कृती क्रमाने कराव्या लागतात. अशा परिचित कृती घटनाक्रमासाठी निश्चित करू या. (एका वेळी एक)<br>• आवश्यक साहित्य तयार ठेवू या.<br>• वर्गातील प्रत्येक मुलाला दिसेल अशी कृती करू या. उदा. सरबत बनविणे.<br>• यातील प्रत्येक छोटी पायरी (उपकृती) करताना, 'मी काय करीत आहे' असे बोलू या.<br>• प्रत्येक पायरीची दखल घेतली जाते आहे, याची खात्री करू या. मुख्य कृतीत, अनेक लहान उपकृतींचा समावेश असतो हे लक्षात आणून देऊ या.<br>• दुसऱ्या दिवशी मुलांकडून, आधी काय केले, नंतर काय केले हे विचारून फळ्यावर लिहू या.<br>• त्या त्या परिसरातील व मुलांच्या अनुभवविश्वातील घटना प्रथम घेऊ या. | • हेतुतः निरीक्षणाची सवय लागेल.<br>• एका घटनेत अनेक छोट्या छोट्या कृती क्रमाने करायच्या असतात हे समजेल व त्या क्रमाने योग्य शब्दांत सांगण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होईल. |
| **गोष्ट सांगणे. (मुलांनी)** | चित्र मालिका<br>अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/०७/०१/०१ ते म/०७/०१/२६ | • चित्रावरून गोष्ट तयार करण्यास सांगू या.<br>• ऐकलेली गोष्ट सांगण्याची संधी देऊ या.<br>• आपण सांगितलेल्या/परिसरात ऐकलेल्या गोष्टींतील घटनाक्रम विचारू या. | • ऐकलेले प्रसंग, घटना यांची क्रमबद्ध मांडणी करण्याची व ते स्वतःच्या भाषेत सांगण्याची संधी मिळेल.<br>(ऐकलेली गोष्ट सांगायची आहे. त्यामुळे लक्षपूर्वक ऐकण्याची सवय लागेल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| | | • अपूर्ण गोष्ट/प्रसंग स्वतःच्या मनाने पूर्ण करण्याची संधी देऊ या. | • पूर्वानुभवाशी जोडणी करणे, अंदाज बांधणे, तर्क करणे यांसाठीच्या संधी मिळतील. |
| **खेळ**<br>१) वन मिनिट शो (परिचित विषयाच्या चित्रावर बोलणे)<br>२) शब्दभेंड्या, अक्षरभेद, ध्वनीभेद<br>३) हुमान (कोडी)<br>४) दिलेल्या शब्दावर वाक्य सांगणे.<br>५) थीमच्या संदर्भातील शब्द लिहिणे. | अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/२४/०१ ते म/२४/१० | १) चित्र दाखवू या व त्यावर विद्यार्थ्यांना एक मिनिट बोलण्यास सांगू या. उदा. आंब्याचे चित्र.<br>२) कोणताही एक शब्द सांगू या. त्यातील शेवटच्या आवाजाने सुरू होणारा शब्द मुलांनी सांगायचा. हा खेळ असाच पुढे चालू ठेवू या. (वर्गातील प्रत्येक मुलाला संधी मिळेपर्यंत)<br>३) प्रत्येक गटाला एक हुमान/ पारंपरिक कोडे सांगू या. उत्तरे शोधण्यासाठी मुलांना गटात क्लृप्ती (clue) सांगू या.<br>४) याचप्रमाणे दिलेल्या शब्दावर वाक्य तयार करणे, चित्राशी/थीमशी संबंधित शब्द सांगणे असे खेळ देऊ या. उदा. पाऊस, दिवाळी इत्यादी. विद्यार्थ्यांनी सांगितलेले शब्द फळ्यावर लिहू या.<br>५) घरच्या भाषेतील शब्द, कोडी यांचा स्वीकार व वापर करू या. | १) योग्य शब्दांची निवड करून पूर्वानुभवांच्या मदतीने दिलेल्या विषयावर बोलण्याची सवय लागेल.<br>२) दिलेल्या विषयावर दिलेल्या वेळेत बोलण्याची सवय विकसित होईल.<br>३) चित्राचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विचार करता येतो व तो सांगता येतो हे समजेल. (उदा. आंबा–रंग, वास, चव, झाड, पाने, मोहर)<br>४) न–ण, प–फ, त–थ, ट–ठ अशा अक्षरांच्या आवाजातील फरक लक्षात येईल.<br>५) शब्दसंपत्ती वाढेल.<br>६) **हुमान/कोडी यांसारख्या खेळांमुळे :** विचारांना चालना मिळेल, अंदाज बांधता येईल, वेगवेगळ्या शक्यतांचा विचार करणे शक्य होईल.<br>**थीमच्या संदर्भातील शब्द लिहिणे:** स्वत:चे विचार निर्भीडपणे मांडण्यास मदत होईल. दिलेल्या शब्दांचा अनेक दृष्टीने विचार करता येईल. |
| **जिभेची वळकटी** (Tongue Twisters) | गंमत वाक्ये<br>उदा. गंमत वाक्य संकलन<br>उदा.<br>कच्चा पापड – पक्का पापड | विद्यार्थ्यांना गंमत वाक्ये ऐकवू या. तीच वाक्ये पुन्हा पुन्हा गतीने म्हणण्यास सांगू या. त्यात कोणती गंमत जाणवली यावर बोलते करू या. | • भाषेतील विशिष्ट ध्वनींच्या उच्चारणाचा सराव होईल.<br>• अक्षराच्या उच्चारांबाबतची स्पष्टता वाढेल.<br>• उच्चारातील गमतीचा आनंद मिळेल.<br>• याचा उपयोग वाचताना अचूक उच्चार करण्यासाठी होईल. |

## ध्वनींची जाण

| | | | |
|---|---|---|---|
| १) विविध ध्वनी (आवाज) ऐकविणे – घुंगरू,ढोल, तबला, हार्मोनियम | घुंगरू, ढोल, तबला, हार्मोनियम, उपलब्ध स्थानिक वाद्ये. | विविध प्रकारचे आवाज ऐकवून ते ओळखण्याचा खेळ घेऊ या. (यासाठी भ्रमण ध्वनीचा/विविध ॲपचा उपयोग करता येईल.) | • लक्षपूर्वक ऐकण्याची सवय लागेल.<br>• स्थूल/ठळक आवाजातील फरक लक्षात येतील.<br>• पुढे मुळाक्षरांच्या आवाजातील साम्यभेद समजण्यास मदत होईल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| २) डब्यातील विविध वस्तूंचे आवाज ऐकणे व ओळखणे. | • डब्यातील (साखर, रवा, तांदूळ, शेंगदाणे, साबुदाणा,डाळी, मोहरी, जिरे, रांगोळी यांसारखे उपलब्ध साहित्य) | १) ध्वनीडबीतील वस्तू दाखवून डबी बंद करून आवाज ऐकवू या.<br>२) विद्यार्थ्यांना डोळे बंद करण्यास सांगून पुन्हा हेच आवाज ऐकवू या, ते ओळखण्यास सांगू या. | • लक्षपूर्वक ऐकण्याची सवय लागेल.<br>• आवाजातील सूक्ष्म फरक लक्षात येईल.<br>• अक्षरांच्या उच्चारांतील साम्यभेद समजण्यासाठीची तयारी होईल.<br>उदा. न-ण, प-फ,त-थ, ट-ठ<br>• पुढे वाचन, लेखन करताना अचूकता येण्यास मदत होईल. |
| ३) प्राणी,पक्षी, वाहने इ. चे आवाज ऐकविणे व ओळखणे. | • ध्वनिमुद्रित आवाज | ३) मोबाईल, संगणक इत्यादींच्या माध्यमातून प्राणी, पक्षी, वाहने यांचे आवाज ऐकवू या.<br>• सुरुवातीला परिसरातील प्राणी, पक्षी यांचे आवाज ऐकवू या. | |
| **४) बडबड गीते** | मराठीतील पारंपरिक/परिसरातील बडबड गीतांचा संग्रह | • बडबड गीते साभिनय म्हणू या किंवा इतर माध्यमांद्वारे ऐकवू या.<br>• बडबड गीतांमध्ये, उच्चारांची गंमत, शब्दांची पुनरावृत्ती असेल याची काळजी घेऊ या. जसे-लाल टांगा घेऊनी आला, लाला टांगेवाला. सुरुवातीला यासाठी द्विभाषिक बडबडगीते किंवा घरच्या भाषेतील गीते वापरू या. | • शब्दांची/उच्चारांची गंमत अनुभवायला मिळेल.<br>• भाषेतील आवाजांची जाण विकसित होण्यास मदत होईल. |
| १) वाक्यातील शब्दांची संख्या सांगणे, शब्द तोडणे, जोडणे.<br>२) शब्दाच्या सुरुवातीचा व शेवटचा आवाज ओळखणे.<br>३) शब्दभेंड्या | १) स्वतःचे नाव/ मित्राचे नाव<br>२) वर्गातील वस्तूंची नावे<br>३) अपरिचित शब्द | • एक वाक्य सांगू या. उदा. ''माझे नाव रमेश आहे.'' पुन्हा हे वाक्य तोडून प्रत्येक एक शब्दासाठी एक टाळी वाजवीत म्हणू या. हीच कृती मुलांकडून करून घेऊ या.<br>• याचप्रमाणे शब्दातील प्रत्येक ध्वनी-साठी एक टाळी असा खेळ घेऊ या.<br>• मुलांना त्यांचे स्वतःचे नाव असेच दोन्ही पद्धतीने म्हणायला सांगू या.<br>• शब्द सांगू या व मुलांना सुरुवातीचा/ शेवटचा आवाज ओळखायला सांगू या.<br>• एक शब्द सांगू या. त्या शब्दाच्या शेवटी जे अक्षर आले आहे, त्या अक्षरापासून नवीन शब्द तयार करण्यास सांगू या. हा खेळ असाच पुढे चालू ठेवू या.<br>जसे - बदक....करवत...तवा...<br>वात...तसबीर.. | • वाक्यात शब्द असतात. शब्दांत अक्षरे असतात हे स्पष्ट होईल.<br>• अक्षरांच्या ध्वनींची अचूक जाण होईल.<br>• अक्षरांच्या उच्चारातील सूक्ष्म भेद लक्षात येतील.<br>• पुढे वाचन लेखनासाठी आवश्यक असलेली अचूक उच्चारणाची क्षमता विकसित होईल.<br>• शब्दसंपत्ती वाढेल.<br>• नवे शोधण्याची सवय लागेल. |

## भाषेच्या लेखी रूपाची जाणीव

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
| --- | --- | --- | --- |
| वाचन कोपरा निर्मिती (पुस्तके हाताळणे) | बालवाङ्मय, बालकांसाठीची नियतकालिके, पुठ्ठा, तार, दोरी (विद्यार्थ्यांचा स्तर लक्षात घेऊन पुस्तके निवडू या.)<br>• सुरुवातीला मोठी चित्रे व कमी मजकूर.<br>• विषय मुलांच्या भावविश्वातील व अनुभवविश्वातील.<br>• स्तराधारित वाचन साहित्य | • विद्यार्थ्यांसाठी योग्य पुस्तके उपलब्ध करून घेऊ या.<br>• वर्गातील एका कोपऱ्यात भिंतीवर तार लावून तारेवर/दोरीवर/ पिशवीत पुस्तके मुलांना सहज दिसतील, हाताळता येतील अशी ठेवू या.<br>• काही पुस्तके/पुस्तकांतील काही भाग मुलांना वाचून दाखवू या.<br>• मुलांची पुस्तकाची आवड लक्षात घेऊन/ठरावीक कालावधीनंतर पुस्तके बदलू या.<br>• मुलांना वाचलेल्या पुस्तकांविषयी बोलण्याची संधी उपलब्ध करून देऊ या.<br>• आठ ते बारा पानांची छोटी व परिचित संदर्भातील गोष्टींची पुस्तके गावकरी व मुलांच्या मदतीने घरच्या भाषेत तयार करू या. | • वाचनासाठीचे विविध प्रकारचे साहित्य पाहण्याची, हाताळण्याची संधी मिळेल.<br>• पुस्तकांबद्दल उत्सुकता, कुतूहल निर्माण होईल.<br>• पुस्तकांशी जवळीक निर्माण होईल.<br>• पुस्तकात आपल्यासाठी कोणी तरी काही लिहून, चित्र काढून ठेवलेले असते हे समजेल.<br>• यातून वाचनाची पूर्वतयारी होईल. |
| पुस्तके हाताळणे | पुस्तके | • वाचन कोपऱ्यासाठी निश्चित केलेली पुस्तके विद्यार्थ्यांना सातत्याने हाताळण्यास उपलब्ध करून देऊ या. (पुस्तक फाटणे, हरवणे यांसारखे प्रकार होतात, म्हणून मुलांना पुस्तकांपासून दूर ठेवू नये.) | |
| अक्षरगटावरील चित्रवाक्य साचे/ वाचनपाठ | अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/१३/०१/०१ ते म/१३/०१/२० | • चित्रांऐवजी त्यांची नावे वापरून वाचनपाठ वाचून दाखवू या.<br>• या पद्धतीने मुलांकडून वाचन पाठांचे वाचन करून घेऊ या. | • मजकूर सलगपणे वाचण्याचा आनंद मिळेल. आणखी वाचावेसे वाटेल. |
| उपस्थिती पत्रक | वर्गाचे उपस्थिती पत्रक | • वर्गात लावलेल्या उपस्थिती पत्रकावर स्वतःचे नाव शोधून विद्यार्थी स्वतःची उपस्थिती नोंदवतील. (उपस्थिती पत्रकात विद्यार्थी सही, टिकमार्क किंवा गिरगिटणे यांसारख्या कृती करतील, तर ती त्यांना करू देऊ या.) | • स्वतःचे नाव ओळखता येईल. निरीक्षणशक्ती वाढेल. लिहिण्यासाठी काहीतरी हेतू असतो हे समजेल. लेखनाची पूर्वतयारी होईल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| लेखन नमुन्याचे कोलाज तयार करणे. | नियतकालिके, विविध वस्तूंची वेष्टणे (रॅपर) (उदा. चॉकलेट, बिस्किटचा पुडा इ. चे आवरण, बातमीचे शीर्षक इ.) | आपल्या परिसरात उपलब्ध असलेला विविध प्रकारचा मजकूर/नियतकालिकातील मजकूर (विशेषतः शीर्षके) संकलित करून त्याचे कोलाज तयार करू या.<br>• या कोलाजमध्ये अक्षर लेखनाचे विविध नमुने टाईप्स, (fonts) येतील असे पाहू या. | • अक्षरे लिहिण्याच्या पद्‌धती वेगवेगळ्या असतात हे समजेल.<br>• दृक्‌ शब्दसंपत्तीमध्ये वाढ होईल. |
| वर्गातील वस्तूंवर नावाच्या चिठ्ठ्या लावणे. | शब्दकार्ड | उदा - फळा हे शब्दकार्ड तयार करून फळ्यावर चिकटवू या. हे या वस्तूचे नाव लिहिले आहे. याकडे मुलांचे लक्ष वेधू या. याप्रमाणे वर्गातील इतर वस्तूंनाही नावे देऊ या. | • वस्तूंच्या लिहिलेल्या नावांची ओळख होईल.<br>• सुरुवातीच्या टप्प्यावर दृक्‌ शब्द संपत्तीमध्ये वाढ होईल.<br>• शब्द जोडणे-तोडणे, अक्षर ओळखणे, शब्द वाचणे या टप्प्यांवरही याचा उपयोग होईल. |
| विविध प्रसंगी, विविध उद्‌देशाने मुलांनी सांगितलेले शब्द (उदा. चित्रवर्णन, चित्रगप्पा, क्षेत्रभेट) भिंतीवर लावणे. | कार्डशीट, स्केचपेन, फेविकॉल. मुलांच्या भावविश्वा-तील शब्दकार्ड | विविध प्रसंगी, विविध उद्‌देशाने मुलांनी सांगितलेले शब्द मुलांसमोर कार्डशीटवर लिहू या. ते वर्गाच्या भिंतीवर लावून ठेवू या. ते काही दिवस मुलांसमोर राहतील असे पाहू या आणि तो मजकूर मुलांना वाचून दाखवू या.<br>• घरची भाषा वेगळी असणाऱ्या मुलांसाठी खालील क्रमाने चित्र-वाचन घेऊ या.<br>१) परिचित चित्र - परिचित भाषा<br>२) अपरिचित चित्र - परिचित भाषा<br>३) परिचित चित्र - अपरिचित भाषा<br>४) अपरिचित चित्र - अपरिचित भाषा | • दृक्‌ शब्दसंपत्तीमध्ये वाढ होईल.<br>• आपण जे बोलतो ते लिहिले जाते, ते वाचता येते, टिकते हे समजण्यास मदत होईल. |
| गोष्ट ऐकून मुलांनी काढलेले चित्र वर्गात चिकटविणे. | पहिलीच्या मुलांच्या वयोगटानुसार व त्यांच्या भावविश्वातील छोट्या गोष्टींचा संग्रह | मुलांच्या भावविश्वाशी निगडित गोष्ट ऐकवू या.<br>• ऐकलेल्या गोष्टीला अनुसरून चित्र काढण्याची सूचना/संधी देऊ या.<br>• मुलांनी काढलेली चित्रे वर्गात दर्शनी भागात लावू या. | • लक्षपूर्वक ऐकले आहे, की नाही ते समजेल.<br>• बोटांच्या स्नायूंवर नियंत्रण येण्यास मदत होईल.<br>• स्वतःचे विचार भावना चित्रांतून मांडण्याची संधी मिळेल.<br>• आनंद मिळेल. |

NIPUN BHARAT

## वाचन

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| **पूर्वतयारीच्या कृती**<br>**चालणे –**<br>१) सरळ रेषेवरून चालणे.<br>२) उलटे चालणे.<br>३) डोक्यावर वस्तू ठेवून चालणे.<br>४) प्राण्यांप्रमाणे चालणे.<br>५) अडथळे पार करत चालणे.<br>६) नागमोडी दोरीवरून गटाने चालणे.<br>७) विविध भौमितिक आकृत्यांवर चालणे इ. | जाड दोरी, पुस्तक, वही (अडथळे निर्मितीसाठी वर्गात साहित्याचा वापर करावा.) | • पूर्वतयारीच्या कृती क्रमाक्रमाने करून घेऊ या.<br>• पहिली कृती बहुतांश विद्यार्थ्यांना सहज करता आली, की पुढची कृती घेऊ या.<br>• प्रत्येक कृती सर्व विद्यार्थी करतील याची काळजी घेऊ या. | • स्नायूंवर नियंत्रण व हालचालींमध्ये समन्वय साधणे, तोल सांभाळणे या वाचन लेखन करता येण्यासाठी आवश्यक शारीरिक क्षमतांचा विकास होईल.<br>• आव्हानात्मक काम मिळेल.<br>• अंदाज बांधणे, निर्णय घेणे या क्षमतांच्या विकासास संधी मिळेल. |
| रंगोमेट्री आकृतिबंध | रंगोमेट्री | • अंदाज बांधणे, निर्णय घेणे या क्षमतांच्या विकासास संधी मिळेल. विविध रंग, आकार असे विविध निकष देऊन गट करून घेऊ या.<br>• अंदाज बांधणे, निर्णय घेणे या क्षमतांच्या विकासास संधी मिळेल. रंगोमेट्रीच्या साहाय्याने मुलांना स्वतःच्या कल्पनेने विविध आकार/आकृतिबंध बनविण्यास सांगू या. | • अंदाज बांधणे, निर्णय घेणे या क्षमतांच्या विकासास संधी मिळेल.<br>• निरीक्षणशक्तीचा विकास होईल.<br>• साम्यभेद ओळखून वर्गीकरण करण्याची क्षमता विकसित होईल.<br>• अंदाज बांधणे, निर्णय घेणे या क्षमतांच्या विकासास संधी मिळेल. कल्पनाशक्तीला चालना मिळेल.<br>• अंदाज बांधणे, निर्णय घेणे या क्षमतांच्या विकासास संधी मिळेल. आकारभेद समजल्यामुळे अक्षर ओळखीची पूर्वतयारी होईल. |
| सहभागी वाचन | गोष्टीचे पुस्तक | • अंदाज बांधणे, निर्णय घेणे या क्षमतांच्या विकासास संधी मिळेल. | • अंदाज बांधणे, निर्णय घेणे या क्षमतांच्या विकासास संधी मिळेल. लेखी मजकुराची जाणीव होईल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| | | मुलांच्या भावविश्वातील, आवडीच्या विषयांवरील मजकूर कमी व चित्रे जास्त असलेले गोष्टीचे पुस्तक निवडू या.<br>• मुलांचा सहभाग घेऊन मुखपृष्ठा–विषयी चर्चा करून त्यानंतर मजकूरावर बोट ठेवून वाचून दाखवू या.<br>(शिक्षक पुस्तक वाचून दाखविताना पुस्तकाचे नाव, लेखक, प्रकाशक, किंमत, कडा, मलपृष्ठ, मुखपृष्ठ, चित्रकार या बाबी दाखवतील.)<br>सहभागी वाचनाच्या अगदीच सुरुवातीला प्रथम घरच्या भाषेतील गोष्टी लिहिलेली पुस्तके, द्विभाषिक पुस्तके, पुढे विविध प्रकाराची पुस्तके वापरू या. | • अंदाज बांधणे, निर्णय घेणे या क्षमतांच्या विकासास संधी मिळेल. भाषेचे बारकावे समजतील.<br>• अंदाज बांधणे, निर्णय घेणे या क्षमतांच्या विकासास संधी मिळेल. डावीकडून वाचले जाते हे समजेल. |
| आकृतिबंध ओळखणे. (रंग, आकार, ताल, सूर, माप, अंक) | | विविध प्रकारच्या आकृतिबंधांची उदाहरणे देऊ या. उदा. टाळीच्या आवाजाचा, पानांच्या आकाराचा, रंगांच्या विशिष्ट क्रमांचा इ. | • निरीक्षणशक्तीचा विकास होईल.<br>• साम्यभेदाची जाणीव होईल.<br>• वर्गीकरण करण्याची क्षमता विकसित होईल. |
| चित्रातील साम्यभेद ओळखणे | अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/०५/०१ ते म/०५/१२ | • चित्राचे निरीक्षण करून चित्रातील साम्य व भेद ओळखायला लावून ते सांगण्याची संधी देऊ या. | • सूक्ष्म निरीक्षणाची सवय लागेल.<br>• साम्यभेद, वर्गीकरण क्षमता विकासास मदत होईल.<br>• वाचन लेखनासाठी अक्षरातील साम्य–भेद जाणणे सहज शक्य होईल. |
| दिशादर्शक पट्टी | अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/०६ /०१ ते म/० ६/१० | • मुलांना दिशादर्शक पट्टीवर डावीकडून उजवीकडे बोट फिरवायला सांगू या. | • वाचताना डावीकडून उजवीकडे जायचे असते. त्याची तयारी होईल. |
| मॅचिंग सेट | अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/०१/०१/०१ ते म/०१/०१/१० व म/०१/०२/०१ ते म/०१/०२/९० | • मुलांकडून मॅचिंग सेट्स लावून घेऊ या. | • साम्यभेद, वर्गीकरण, अंदाज करणे, सूक्ष्म निरीक्षण या क्षमतांच्या विकासास मदत होईल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| चित्रशब्द कार्ड वाचन | अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/११/०१ ते म/११/१०० | • चित्रशब्द कार्डे (एकावेळी ५ चा संच) मुलांसमोर ठेवू या.<br>• चित्रावर बोट ठेवून चित्रांचे वाचन करू या. शब्दावर बोट ठेवून शब्द वाचू या. चित्रावर त्यासारखे सुटे चित्र ठेवू या. शब्दावर तसाच दुसरा सुटा शब्द ठेवू या, सुटा शब्द वाचू या. हीच कृती मुलांकडून प्रथम गटात व नंतर व्यक्तिगत करून घेऊ या. **(प्रत्येक मुलाला स्वतंत्रपणे पाचही शब्द ओळखता आल्याशिवाय त्या मुलाला पुढची चित्रशब्द कार्डे देऊ नयेत.)** | • संपूर्ण शब्दाचे चित्र म्हणून वाचन करतील.<br>• दृक् शब्दसंपत्तीत भर पडेल. |
| वाक्य साचे | अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म /१३/१/१ ते म/१३/२/२० | • वाक्य साचे देऊन वाक्य तयार करून घेऊ या. आवश्यक तेथे मदत करू या. | • अनेक शब्दांचे मिळून वाक्य तयार होते हे समजेल.<br>• वाक्याचीही एक रचना असते हे समजेल.<br>• शब्दसंपत्ती वाढेल. |
| शब्दचक्र | | • प्रथम अक्षरगटातील एकेक अक्षर फळ्यावर लिहू या. त्या अक्षराभोवती गोल करू या. अक्षराच्या ध्वनीची ओळख करून देऊन मुलांना त्या अक्षराने सुरू होणारे शब्द विचारू या व ते शब्द त्या अक्षराभोवती लिहू या. जर अपेक्षित ध्वनीने सुरुवात होणारा शब्द नसल्यास, तो फळ्यावर बाजूला लिहू या व बाजूला का लिहिला याची चर्चा करू या.<br>• अक्षरगटाप्रमाणे शब्द चक्रातील अक्षरांचा सराव करून घेऊ या.<br>• मुलांकडून त्या शब्दांचे वाचन करून घेऊ या.<br>• त्या शब्दांतील संबंधित अक्षराला गोल करून घेऊ या.<br>**सर्व विद्यार्थ्यांना संधी द्यावी.**<br>• वरील कोणत्याही एका शब्दापासून वाक्य तयार करून घेऊ या. ते वाक्य मुलांकडून वाचून घेऊ या. आवश्यक तेथे मदत करू या. | • प्रत्येक ध्वनीच्या योग्य उच्चारांची माहिती होईल.<br>• विचार प्रक्रियेला चालना मिळेल.<br>• प्रत्येक अक्षराची ओळख होईल.<br>• शब्दसंपत्ती वाढेल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| वाचन पाठ | चित्रकार्ड<br>अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/१६/०१/ते म/१६/०६ | • दिलेल्या अक्षर गटापासून शब्द बनवून घेऊ या व शब्दापासून वाक्य तयार करण्यास सांगू या. त्यावर वाचन पाठ तयार करण्यास सांगू या. त्या वाचन पाठांचे वाचन करून घेऊ या.<br>**याप्रमाणे जसजशी अक्षरगटांची ओळख होईल, तसतसे वाचन पाठ तयार करून घेऊ या.** | • पूर्वानुभवाचा वापर करून शब्दांपासून वाक्य तयार करता येतील.<br>• वाक्य वाचण्याचा आनंद घेता येईल.<br>• वाक्यांपासून वाचनपाठ तयार करण्याचा व वाचण्याचा आनंद मिळेल. |
| मुळाक्षरे वाचन | मुळाक्षरे तक्ता<br>अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म /१७/०१ | • वर्गात मुलांना मुळाक्षर तक्ता उपलब्ध करून देऊ या.<br>• मुलांकडून मुळाक्षरांचे वाचन करून घेऊ या. | • सर्व मुळाक्षरांची ओळख होऊन ती वाचता येतील. |
| चौदाखडी | चौदाखडी वाचन कार्ड<br>अध्ययन समृद्धी साहित्य संचातील क्र. म /१९ /०१ ते म /१९ / ०२ | • चौदाखडीचा तक्ता गटात देऊन सामूहिक वाचन करून घेऊ या.<br>• चौदाखडी तक्त्यानुसार वैयक्तिक वाचन करून घेऊ या.<br>• अ‍ॅ आणि ऑ ची ओळख मुलांना करून देऊ या. अ‍ॅ आणि ऑ चे शब्द मुलांना सांगू या.<br>• सांगितलेले शब्द फळ्यावर लिहू या व त्याबद्दल चर्चा घडवून आणू या.<br>• फळ्यावरील शब्दांचे वाचन करून घेऊ या. | • अ‍ॅ आणि ऑ ची ओळख होईल व ते वाचता येतील.<br>• शब्दसंपत्ती वाढेल. |
| शब्द वर्णानुक्रमे लावणे. | सर्व वर्णाक्षरांची शब्द कार्डे, चित्रमय उतारे कार्ड उदा. सचिन खेळतो.<br>अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/२०/०१ ते म/२०/२५ | • सर्व वर्णाक्षरांची शब्दकार्डे मुलांना देऊ या.<br>• विद्यार्थ्यांना गटात एकमेकांसोबत बसायला सांगून वर्णानुक्रमे शब्दकार्डे लावून घेऊ या.<br>• शब्दांचे वाचन करून घेऊ या.<br>• आवश्यक तेथे मदत करू या. | • स्वर व व्यंजने वाचता येतील.<br>• विद्यार्थ्यांना नवनवीन शब्दांची ओळख होईल.<br>• प्रत्येक वर्णाक्षराने सुरू होणारा शब्द असतो हे समजण्यास मदत होईल.<br>• शब्दसंपत्ती वाढेल. |
| जोडाक्षर वाचन | जोडाक्षरयुक्त शब्द, अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/२७/०१ ते म/२७/१२ | • प्रथम मुलांना १० ते १५ कार्डे देऊन त्यांच्या कल्पनेनुसार कार्डांचे गट करायला सांगू या. तयार झालेल्या कार्डांच्या गटावर चर्चा करून घेऊ या. नंतर विशिष्ट प्रकारची जोडाक्षरे असणाऱ्या शब्द कार्डांचे गट करून घेऊ या. उदा. व्या, प्र इ. गटागटानुसार सर्व कार्डांचे वाचन करून घेऊ या. | • जोडाक्षरांची ओळख होऊन शब्दसंपत्तीत भर पडेल.<br>• जोडाक्षरे ही विविध प्रकारची असतात हे समजण्यास मदत होईल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| चित्रमय उतारे वाचन | चित्रमय उतारे<br>अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र.म/२३/०१ ते म/२३/०९ | • प्रथम मुलांना शब्द व चित्र यांचा संदर्भ जोडून वाक्य तयार करायचे आहे, हे समजून सांगू या.<br>• एक उदा स्वतः सांगू या.<br>याप्रमाणे मग चित्रमय उताऱ्यांचे वाचन करायचे आहे हे सांगू या.<br>• एका कार्डाचे वाचन समूहात करून घेऊन, नंतर गटात वाचन करायला सांगू या. नंतर प्रत्येक मुलाकडून असे वाचन करून घेऊ या. | • चित्राऐवजी स्वतः शब्द वापरायचा आहे याची समज येऊन विचार प्रक्रियेस चालना मिळेल.<br>• वाक्य आणि उतारा वाचल्याचा आनंद मिळेल. त्यामुळे आपसूकच वाचनाची आवड निर्माण होईल.<br>• एकाच दृष्टिक्षेपात वाक्य वाचता येण्याचा सराव होईल, आनंद मिळेल. |
| शब्दडोंगर | अध्ययन समृद्धी साहित्य संचातील शब्दकार्ड क्र. म/२८/०१ ते म/२८/०२ | • प्रथम वर्गात फळ्यावर एक शब्द देऊ या. उदा. आई. त्याच शब्दात आणखी एक एक शब्द वाढवत वाक्य तयार करण्यास सांगू या.<br>उदा. माझी आई/ही माझी आई<br>• मुलांना गटात चर्चा करायला सांगून त्यांना कोणता शब्द सांगावा, याबाबत विचार करायला लावू या.<br>याप्रमाणे शब्दडोंगर तयार करायला सांगू या.<br>• सर्व तयार झालेल्या उताऱ्यांचे वाचन करून घेऊ या. | • शब्दात भर घालून वाक्य तयार करायचे आहे, हा अनुभव मुलांना मिळेल.<br>• विचार प्रक्रियेस चालना मिळेल.<br>• शब्दसंपत्ती वाढण्यास मदत होईल.<br>• उतारा तयार करून वाचल्याचा आनंद मिळेल. |
| प्रकट वाचन | विरामचिन्हे विरहित व विराम चिन्हांसह उतारा कार्डे, गोष्टींची पुस्तके.<br>अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र.म/३१/०१ ते म/३१/०५ | • उताऱ्यांचे, पुस्तकांचे वाचन मुलांकडून करून घेऊ या.<br>(आरोह, अवरोह, स्वराघात यांकडे लक्ष देऊ या.)<br>• प्रकट वाचनाचा सराव रोज देऊ या. आवश्यक तेथे मदत करू या. | • एकाच दृष्टिक्षेपात वाक्य वाचण्याची सवय हळूहळू विकसित होईल.<br>• वाक्यात आलेल्या विरामचिन्हांचा अर्थ समजेल. विराम चिन्हांसह वाक्य वाचता येईल.<br>• स्वराघातासह योग्य गतीने वाचन करण्याची सवय होईल.<br>• उतारा, पुस्तक स्वतः वाचल्याचा आनंद मिळेल.<br>• वाचनाची गोडी वाढेल. |

## लेखन

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| **१. कागद फाडणे –**<br>१)विद्यार्थ्यांच्या मनाप्रमाणे<br>२) दोन बोटांनी फाडणे.<br>३) दोन बोटांनी सरळ रेषेत फाडणे.<br>४) घडी घालून घडीवर फाडणे. | वर्तमानपत्र, कागद | • वर्तमानपत्राच्या एका पानाचे चार भाग करून ठेवू या.<br>• एकेका भागाचा उपयोग करून क्रमांक १ ते ४ च्या एक-एक कृती क्रमाने करून घेऊ या.<br>• विद्यार्थी गटात या कृती करीत असताना निरीक्षण करू या. आवश्यक तेथे मदत करू या. | • बोटाने पेन्सिल धरण्यासाठी आवश्यक स्नायूंची ताकद/क्षमता वाढेल, त्यातून विद्यार्थ्यांची लेखनासाठीची पूर्वतयारी होईल.<br>• लेखनासाठी आवश्यक हस्त-नेत्र समन्वय व हाताचे/खांद्याचे स्नायू व त्यांचा समन्वय विकसित होण्यास मदत होईल.<br>• जोर लावताना, हालचाली करताना अंदाज घेण्याची सवय होईल. |
| **२. कागद चुरगळणे–**<br>१) दोन हातांनी चुरगळणे.<br>२) एका हाताने चुरगळणे.<br>३) चेंडू तयार करणे.<br>४) एका हाताने फेकणे.<br>५) दोन हातांनी झेलणे. | कागद | • अगोदर फाडलेल्या कागदांचा वापर करून या कृती करून घेऊ या.<br>• सूचना देताना त्या नेमक्या व सर्व मुलांना समजतील अशा देऊ या.<br>• क्रमांक १ ते ५ कृती क्रमाने करून घेऊ या. | • हाताच्या स्नायूंची ताकद व क्षमता वाढेल.<br>• लेखनासाठी आवश्यक हस्तनेत्र समन्वय विकसित होण्यास मदत होईल. |
| चित्र काढणे व रंगविणे | चित्र किंवा इतर उपलब्ध चित्र | • विद्यार्थ्यांना एखादे चित्र काढण्यास सांगू या.<br>• काढलेले चित्र रंगविण्यास सांगू या. (येथे विद्यार्थ्याला चित्र जसे काढायचे असेल, तसे काढण्यास प्रोत्साहन देऊ या. प्रत्येक विद्यार्थ्याचे चित्र पाहून त्याचे कौतुक करू या.)<br>• विद्यार्थ्यांना या कृती करण्याची संधी वर्गात वारंवार उपलब्ध करून देऊ या. | • पेन/पेन्सिल बोटात धरून योग्य दिशेने वळविण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होईल.<br>• हस्त-नेत्र समन्वय वाढीस लागेल.<br>• चित्राच्या कोणत्या भागासाठी कोणता रंग वापरावा याचा निर्णय घेण्यासाठी विचार होईल.<br>• आनंद मिळेल.<br>• लेखनासाठीची पूर्वतयारी होईल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| **३) इतर कृती**<br>१) ठसे काम<br>२) बाटलीचे टोपण लावणे टोपण काढणे.<br>३) चिखलाचे गोळे बनविणे.<br>४) शेंगा फोडणे.<br>५) डाळ तांदूळ निवडणे.<br>६) वायरमध्ये मणी ओवणे.<br>७) बाटलीत पाणी/रांगोळी/रेती भरणे.<br>८) वेणी घालणे.<br>९) बटण काज्यात घालणे, काढणे. | बाटल्या, टोपणे, रांगोळी, शेंगा, डाळ, तांदूळ, दोऱ्या इ. कृतीनुसार आवश्यक साहित्य. ठशांसाठी परिसरात उपलब्ध असलेले साहित्य<br>उदा. भेंडी, कांदा, बटाटे, हातापायाच्या पंज्यांचाही उपयोग करता येईल. | • विद्यार्थ्यांकडून या कृती रोज एक याक्रमाने (८ ते १५ दिवस) करून घेऊ या. | • हस्त–नेत्र समन्वय, छोट्या स्नायूंचा विकास यासाठी मदत होईल.<br>• बैठक, एकाग्रता वाढेल.<br>• अवधान कक्षा वाढण्यास मदत होईल.<br>• बोटांचा व्यायाम होईल.<br>• बोटांच्या स्नायूंचा विकास होईल. (बोटांची पकड साधण्यासाठी स्नायूंची क्षमता वाढेल)<br>• बोटांच्या क्रमबद्ध हालचाली होतील.<br>• बोटांच्या हालचालींवर नियंत्रण येईल.<br>• प्रत्येक कृती करीत असताना अंदाज घेणे, निरीक्षण करणे, निर्णय घेणे या विचार प्रक्रिया होतील. |
| बोटाने गिरविणे, फिरविणे. | दिशादर्शक पट्टी, रांगोळी, रेती, माती. | • रांगोळी, रेती, माती, यामध्ये बोटाने विविध आकार रेखाटून घेऊ या. उदा. त्रिकोण, गोल. चौकोन, आयत, इ.<br>• दिशादर्शक पट्टीवर डावीकडून उजवीकडे बोट फिरवून घेऊ या. | |
| चित्राकृतीवर टोपणे, बिया, खडे, डाळी इ. साहित्य ठेवणे. | टोपणे, बिया, मणी, चिंचोके, खडे, डाळी | • फरशी, पुठ्ठा, मैदान यांवर चित्राकृती काढून घेऊ या. प्रथम आपण स्वत: चित्राकृती घ्या. रेखाटनावर टोपणे, बिया, डाळ, मणी इ. ठेवू या. त्यानंतर त्यावर विद्यार्थ्यांकडून टोपणे, बिया, डाळ, मणी, चिंचोके, खडे इ. ठेवून घेऊ या. | |
| चित्राकृतींच्या आतील भाग रंगविणे. | तेलखडू, खडू, रांगोळी | • मुलांना पुठ्ठा, फरशी, मैदान यांवर आकार काढून देऊ या.<br>• काढलेल्या चित्राकृतीचा आतील भाग मुलांकडून रंगवून घेऊ या. | • अक्षरलेखनासाठी विशिष्ट दिशेने आकार काढण्याची तयारी होईल.<br>• बोटाच्या नियंत्रित हालचाली करण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होईल.<br>• वही, पाटी यांवर लेखनासाठीची पूर्वतयारी होईल.<br>• विविध प्रकारच्या आकारांची स्पष्टता येण्यास मदत होईल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| अक्षराचे अवयव स्ट्रोक रेखाटणे. | माती, रेती, रांगोळी, पाटी, पेन्सिल | • मुलांकडून अक्षरांचे अवयव माती, रेती, रांगोळी यांवर रेखाटून घेऊ या.<br>• अक्षरांचे पुढील प्रमाणे अवयव पाटीवर रेखाटून घेऊ या. ।। // = UCC | • आकारांचे निरीक्षण करणे, साम्यभेद शोधणे, वर्गीकरण करणे या क्षमतांच्या विकासास मदत होईल. |
| रेषा ओढणे. | पट्टी, शिसपेन्सिल, पेन | • पट्टीशिवाय व पट्टीच्या साहाय्याने रेषा काढून घेऊ या. | |
| विविध रेखाकृती गिरविणे. | पक्षी, प्राणी, फळे, यांच्या रेखाकृती. | • या रेखाकृती मुलांकडून गिरवून घेऊ या. | |
| आकाराचे आत आकार काढणे | पाटी, फळा, कागद | • मुलांना पाटीवर, फळ्यावर, कागदावर चौकोन, त्रिकोण, आयत, वर्तुळ असे विविध आकार काढून देऊ या. त्या आकाराच्या आत तसेच आकार काढण्यास सांगू या. | |
| मुलांसाठी लेखन | | • विद्यार्थ्यांना सोबत घेऊन शाळेच्या आणि नजीकच्या परिसरातील स्थळांना (उदा. दुकान, बाजार, विहीर, शेत, तळे) भेट देऊ या.<br>• भेट देऊन वर्गात परत आल्यावर आज आपण काय काय पाहिले? अशा प्रकारचा प्रश्न विचारून संभाषणाला सुरुवात करू या.<br>• मुलांनी सांगितलेल्या गोष्टी (वस्तूंची नावे, निरीक्षणे इ.) मुद्दे लिहू या.<br>• विद्यार्थी जो शब्द, वाक्य सांगेल ते लिहू या, वाक्यापुढे ते सांगणाऱ्या विद्यार्थ्याचे नाव लिहू या.<br>• लिहून झाल्यावर स्वतःचे वाक्य ओळखण्यास सांगू या.<br>• **तोंडीकामात घटनाक्रमावर काम करतानाही मुलांनी सांगितलेला क्रम अशाच प्रकारे फलकावर लिहू या.** | • आपण जे बोलतो, तेच लिहिले जाते, तेच पुन्हा पुन्हा वाचता येते, हे समजण्यास मदत होईल.<br>• अक्षरे, शब्द एका दृष्टिक्षेपात ओळखण्याची संधी मिळेल.<br>• अंदाज बांधण्याची संधी मिळेल.<br>• मी सांगितलेले फळ्यावर लिहिले जाते या जाणिवेतून मुलांचा आत्मसन्मान वाढेल. अधिक सांगण्याची, शिकण्याची इच्छा निर्माण होईल. |
| अक्षर दृढीकरण | फुले, रांगोळी, बिया, पुठ्ठा | वाचन टप्प्यातील शब्द चक्रावर कृती झाल्यानंतर....<br>• मोठ्या आकारात अक्षरांचे आकार जमिनीवर काढू या. | • अक्षर काढण्याची योग्य दिशा समजण्यास मदत होईल.<br>• अक्षरांच्या आकाराबाबत स्पष्टता येईल.<br>• अक्षर व ध्वनी संबंधाचे दृढीकरण होईल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
| --- | --- | --- | --- |
| | | • प्रथम आपण स्वतः अक्षर वळणानुसार त्या रेखाटनावर फुले, रांगोळी, खडे ठेवून दाखवू या. अक्षरे उच्चारणासह गिरवून दाखवू या.<br>• मुलांना आपल्या कृतीचे निरीक्षण करून हीच कृती करण्यास सांगू या.<br>• हवेत अक्षर काढून घेऊ या.<br>• मुलांच्या पाठीवर अक्षर काढून ते ओळखण्याचा खेळ घेऊ या.<br>• पाठ्यपुस्तकातील अक्षरांचे/स्वरांचे आकार गिरविण्यास व लिहिण्यास सांगू या. | |
| स्वर चिन्हयुक्त अक्षरांचे लेखन | | • व्यंजन व स्वर जोडून तयार होणारे स्वर चिन्हयुक्त अक्षरांचे लेखन करून घेऊ या.<br>उदा. म् + आ = मा,<br>क् + आ = का | • शब्दलेखनाची पूर्वतयारी होईल.<br>• शब्द, वाक्य लेखनाच्या दृष्टीने आवश्यक पूर्वतयारी होईल. |
| अक्षरगटातील अक्षरांचा उपयोग करून शब्द लेखन | शब्दपट्ट्या | • वाचन टप्प्यातील अक्षरगटापासून तयार होणाऱ्या अर्थपूर्ण शब्दांचे अनुलेखन व नंतर श्रुतलेखन करून घेऊ या. | • अक्षरांचे आकार व आवाज यांच्या संबंधाचे दृढीकरण होईल.<br>• बोलणे, वाचणे व लिहिणे यांतील संबंध स्पष्ट होत जाईल.<br>• शब्द लेखन करण्याचा आनंद मिळेल.<br>• शब्दसंपत्ती वाढेल. |
| अक्षरांची पुनरावृत्ती होणारे शब्द शोधणे व लिहिणे. | शब्दपट्ट्या | • ज्या शब्दात एक अक्षर दोन वेळा येते असे शब्द शोधायला व लिहायला सांगू या. उदा. काका, मामा, नाना, नानी, बाबा, कडक इ.<br>• अशाच प्रकारे एक उदा. सांगून नादानुसारी शब्द शोधून लिहायला सांगू या. उदा. भरभर, टपटप, धाडधाड. पटापटा, किरकिर | • वाचन/लेखन शब्दसंपत्तीत वाढ होईल.<br>• नादानुसारी शब्दांच्या उच्चारांचा आनंद घेता घेता भाषेतील आवाजांची जाण अधिक विकसित होईल.<br>• अचूक लेखनाचा प्रवास सुकर होईल. |
| स्वरचिन्हांचा वापर करून अर्थपूर्ण शब्द तयार करणे. | | • स्वरचिन्ह योग्य त्या ठिकाणी जोडून अर्थपूर्ण शब्द तयार करण्यास सांगू या. तयार झालेले शब्द लिहिण्यास सांगू या. | • स्वरचिन्हांचा उपयोग / काम समजेल.<br>• अक्षराला स्वरचिन्हाची जोडणी करता येईल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| मोठ्या शब्दात लपलेले छोटे शब्द शोधणे व लिहिणे. | शब्दपट्ट्या | • शब्दपट्टीवरील शब्दांमध्ये लपलेले (अर्थपूर्ण) शब्द शोधायला व लिहायला सांगू या.<br>उदा. दौलतनगर – दौलत, नगर, गर, नर, नग, दौत, तगर, तर, रतन, तन, रग, गरगर, इत्यादी.<br>• या शब्दातील अक्षरांपासून नवीन शब्द तयार करण्यास सांगू या. तार, नाग, तूर, तीन, नितीन इ. | • निरीक्षण करणे, अंदाज बांधणे, तर्क करणे यासाठीच्या संधी मिळतील.<br>• शोधण्याचा आनंद मिळेल.<br>• शब्द लेखनाचा सराव होईल. |
| अक्षरगटातील शब्दांपासून वाक्य लेखन आणि पूर्णविरामाचा उपयोग. | अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्डे क्र. म/१६/०१ ते म/१६/०६ | • किमान ३ अक्षरगट पूर्ण झाल्यावर त्यामधील अक्षरांपासून तयार होणारे मुलांनी सांगितलेले शब्द फळ्यावर लिहू या.<br>• या शब्दांपासून वाक्ये तयार करून घेऊ या व लिहायला सांगू या.<br>• वाक्य संपल्यावर पूर्णविराम दिला जात आहे का याकडे लक्ष देऊ या. | • वाक्यरचना करता येईल.<br>• पूर्णविरामाचा वापर समजेल. |
| चित्रशब्दयुक्त वाक्यांचे लेखन | चित्रशब्दयुक्त वाक्यपट्ट्या<br>अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्डे क्र. म/१३/०१ /०१ ते म/१३/०१/२० आणि म/१३/०२/०१ ते म/१३/०२/२०<br>२) चित्र शब्दयुक्त उतारे कार्डे क्र. म/२३/०१ ते म/२३/०९ | • चित्रशब्दयुक्त वाक्य साच्यांमध्ये चित्राऐवजी त्यासाठीचा शब्द वापरून वाक्य लिहिण्यास सांगू या.<br>• पूर्णविरामाच्या वापराकडे लक्ष देऊ या. | • वाक्यांची रचना करता येईल.<br>• पूर्णविरामाची समज वृद्धिंगत होईल. |
| चौदाखडी लेखन | चौदाखडी तक्ता<br>अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्डे क्र. म/१९/०१ ते म/१९/०२ | • चौदाखडी तक्त्याचे वाचन व लेखन करून घेऊ या. | सर्व मुळाक्षरे व स्वरचिन्हे क्रमाने वाचता व लिहिता येतील. याचा उपयोग पुढे शब्दकोश, शब्द वर्णानुक्रमे लावणे यासाठी होईल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
| --- | --- | --- | --- |
| जोडाक्षरयुक्त शब्द | अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/२६/०१/०१ ते म/२६/०१/२० आणि म/२६/०६/०१ ते म/२६/०६/५० | १) अंत्य दंड : उदा. म, य, प, न<br>२) मध्य दंड : उदा. क, फ<br>३) शीर्ष दंड : उदा. ट, ठ, ड, ढ<br>४) दंडविरहित : उदा. र<br>५) एकच व्यजंन जोडून येणारे–<br>१) प्प् – आप्पा<br>२) ठठ् – मठ्ठा<br>६) दोन व्यंजन जोडून येणारे उदा.<br>स् + व् = स्व जसे : स्वस्त<br>स् + त् = स्त. जसे : स्तर<br>७) र जोडण्याचे विविध प्रकार<br>१) पोटफोड्या र – प्र<br>२) रफार – र्व<br>३) रकार – ट्र<br>४) आडवा र – गोऱ्या, तोऱ्या | • अर्ध्या अक्षराला पूर्ण अक्षर जोडले की जोडाक्षर तयार होते हे समजेल.<br>• जोडाक्षरयुक्त शब्दांचे अचूक वाचन व लेखन करता येईल.<br>• र च्या जोडाक्षरांचे विविध प्रकारे लेखन केले जाते हे समजेल. |
| नामपट्ट्या लेखन | नावाच्या पट्ट्या | • वर्षाच्या सुरुवातीलाच उपस्थिती कार्डावरून विद्यार्थ्यांना वाचनाची सवय झाली आहे, तसेच त्यांना स्वतःच्या नावाची ओळख आहे, त्यामुळे त्यांच्या स्वत:च्या नावाचे लेखन करून घेऊ या. त्याचप्रमाणे मित्रांची नावे, वर्गातील वस्तू, दप्तरातील वस्तू, घरातील वस्तू, दुकानांतील वस्तू, प्राणी, पक्षी, फळे, वाहने, रंग, आकार, फुले यांची नावे लिहिण्यास सांगू या. | • वस्तू आणि तिचे नाव यांतील संबंध लक्षात येईल. दृक् शब्दसंपत्तीत वाढ होईल. लेखन सराव होईल. |
| चित्राच्या नावाचे लेखन | चित्रकार्ड | • मुलांना चित्र ओळखायला लावून त्यांनी सांगितलेले चित्राचे नाव फळ्यावर लिहू या. जसे : बदकाचे चित्र दाखवूया – विद्यार्थी बदक असे सांगतील. बदक या शब्दाचे लेखन करतील.<br>• चित्र दिले असता विद्यार्थी चित्राबाबत वाक्य लेखन करतील. (दोन ते तीन वाक्यांपर्यंत) | • विचारशक्तीला चालना मिळेल.<br>• वस्तूला नाव असते. ते जसे सांगता येते, तसे ते लिहिताही येते याची जाणीव होईल.<br>• चित्राच्या मदतीने स्वतःच्या मनातील लिहिण्याची संधी मिळेल.<br>• घरच्या भाषेचा स्वीकार झाल्यामुळे आत्मविश्वास वाढेल. |
| क्षेत्रभेटी | क्षेत्रभेटी वार्षिक नियोजन व मासिक नियोजन | • वर्षाच्या आरंभी विषयानुसार क्षेत्रभेटीचे नियोजन करू या.<br>• क्षेत्रभेटीपूर्वी व नंतर प्रश्नावली तयार करू या. | • हेतुपूर्वक निरीक्षणाची संधी मिळेल.<br>• स्वत:ला पडणारे प्रश्न विचारण्याची संधी मिळेल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| | | उदा. : क्षेत्रभेटीत त्यांना प्रश्न विचारूया. जसे : काय पाहाल? तिथे गेल्यावर कोणते नियम पाळाल? विद्यार्थी : काय पाहिले? कोण कोण भेटले? कोणी काय काय म्हटले? याची यादी करतील. भेटीनंतर मुलांनी सांगितलेल्या अनुभवांचे मुलांसमोर लेखन करूया.<br>**क्षेत्रभेटी :**<br>१) शाळेतील दुसऱ्या वर्गाला भेट, २) मुख्याध्यापक कार्यालयास भेट, ३) दुकान, ४) व्हरांडा, ५) पशुधन–गोठा | • माहिती मिळवण्यासाठी प्रश्न कसे विचारावेत हे समजेल.<br>• प्रश्न विचारून अधिक माहिती मिळवता येते हे समजेल. |
| क्रम बदलला असता सुसंगत वाक्य लेखन | शब्द पट्ट्या– (विराम चिन्हासह वाक्य पट्ट्या) अध्ययन समृद्धी संच (घनाकृती ठोकळे) | • वाक्य लेखनासाठी शब्द पट्ट्या तयार करू या. शब्द पट्ट्यांचा क्रम बदलून मुलांना वाक्य तयार करण्यास सांगू या.<br>• तेच वाक्य लिहिण्यास सांगू या.<br>उदा. – पेरू आवडतो आमच्या फार हिरवा पोपटाला<br>⇨ आमच्या पोपटाला हिरवा पेरू फार आवडतो.<br>• जोरात रात्री बंड्या भुंकतो कुत्रा<br>⇨ रात्री बंड्या कुत्रा जोरात भुंकतो.<br>• क्रियापद देऊन वाक्य तयार करण्यास लावू या. | • वाक्यरचना विचारपूर्वक करण्याचा अनुभव मिळेल.<br>• लेखन करता येईल.<br>• क्रियापदांचा योग्य ठिकाणी उपयोग करता येईल. |
| क्रियापदाचा योग्य उपयोग करता येणे. | क्रियापद पट्ट्या (घनाकृती ठोकळे) | • दिलेल्या क्रियापद संचातून विविध वाक्यामंध्ये योग्य क्रियापद वापरून वाक्य लेखन करून घेऊ या. | • वाक्यांचे अर्थ लक्षात घेऊन योग्य क्रियापद वापरता येईल. |
| प्रश्नचिन्हाचा उपयोग | पाठ्यपुस्तकातील चित्र | • फळ्यावर चित्राच्या आधारे प्रश्न लिहून दुसऱ्या ओळीवर त्याचे उत्तर लिहू या.<br>• दोन्ही वाक्यांत काय फरक आहे हे विद्यार्थ्यांना विचारू या.<br>• विद्यार्थी स्वत: एखाद्या प्रसंगावर प्रश्न विचारतील. ते प्रश्न फळ्यावर लिहू या.<br>• वाक्यात प्रश्नचिन्ह कोठे आले आहे. याचे निरीक्षण करण्यास सांगू या.<br>• विद्यार्थ्यांना प्रश्नचिन्हाला गोल करण्यास सांगू या. | • प्रश्न व उत्तर यांतील फरक समजेल.<br>• प्रश्नचिन्हाची ओळख होईल.<br>• प्रश्न रचना समजेल. |

| कृती | साहित्य | आपण हे करू या | यामुळे काय होईल? |
|---|---|---|---|
| प्रश्नचिन्हाचा उपयोग | पाठ्यपुस्तकातील चित्र | • चिन्हविरहित वाक्य देऊन योग्य चिन्हांचा उपयोग करण्यास सांगू या.<br>• शब्दांचा क्रम बदलून वाक्य देऊ या व ते पुन्हा अर्थपूर्ण रीतीने जोडण्यास सांगू या. (समूहात फळ्यावर)<br>• काय, केव्हा, कोठे यांवर आधारित वाक्ये फळ्यावर लिहू या.<br>• काय, कसे, केव्हा, कोठे यांसाठी रिकाम्या जागा सोडलेली वाक्ये देऊ या.<br>उदा– माझे गाव ·········· आहे.<br>• चित्राला अनुसरून प्रश्न विचारण्यास व लिहिण्यास सांगू या. | • प्रश्ननिर्मिती कौशल्य विकसनास मदत होईल.<br>• चित्राला प्रश्न विचारून लिहिण्याचे तंत्र समजेल.<br>• माहिती मिळविण्यासाठी प्रश्न उपयोगी पडतात हे लक्षात येईल. |
| शब्दसाखळी | शब्द पट्ट्या | • खालीलप्रमाणे कृती करून घेऊ या. (शिक्षक एक शब्द सांगतील. विद्यार्थी तो शब्द लिहितील. त्या शब्दाच्या शेवटी येणाऱ्या अक्षरापासून सुरू होणारा दुसरा शब्द लिहितील. याप्रमाणे शब्द साखळी वाढवत नेतील.)<br>उदा. : कासव–वजन–नख–खवस–ससा–सार......<br>• मुलांना एक शब्द पट्टी देऊन शब्द साखळीचे लेखन करून घेऊ या. | • विचारास चालना मिळेल.<br>• शब्दसंपत्तीत वाढ होईल.<br>• शब्द लेखनाचा सराव होईल. |
| शब्दडोंगर | शब्दडोंगर अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र.म/२८/०१ ते म/२८/०२ | • मूळ शब्दाशी निगडित एक एक शब्दाची भर घालत वाक्य तयार करून घेऊ या.<br>• जास्तीत जास्त सुसंगत शब्द घालून मोठ्यात मोठे वाक्य तयार करण्यास सांगू या.<br>• त्याचे लेखन डोंगराप्रमाणे करून घेऊ या.<br>जसे :<br>आंबा<br>हा आंबा<br>हा आंबा गोड आहे.<br>हा आंबा गोड, रसाळ आहे. | • आकार, चव, वास, स्पर्श इत्यादी सुसंगत शब्द शोधण्याचा अनुभव मिळेल.<br>• पूर्वानुभव आठवून त्या–आधारे तर्कसंगत विचार करण्याची व ते व्यक्त करण्याची/लिहिण्याची संधी मिळेल.<br>• सुसंगत वाक्य लेखन करण्याचा सराव होईल.<br>• शब्दसंपत्तीत वाढ होईल. |

<table>
<tr><th>कृती</th><th>साहित्य</th><th>आपण हे करू या</th><th>यामुळे काय होईल?</th></tr>
<tr><td>घटनाक्रम</td><td>अध्ययन समृद्धी साहित्य संचातील कार्ड क्र. म/२५/०१/०१ ते म/२५/०१ /०६</td><td>• मुलांना घटनेवर आधारित प्रश्न विचारू या.<br>• प्रसंग, अनुभव कथन करण्यास सांगू या.<br>(शिक्षक घटनाक्रम पट्ट्या विस्कळित स्वरूपात विद्यार्थ्यांच्या समोर ठेवतील.<br>• मुलांकडून घटना पट्ट्या क्रमाने लावून, ज्या क्रमाने मांडल्या आहेत त्या क्रमाने लिहून घेऊ या.)</td><td>• वाचन समजपूर्वक झाले आहे का ते समजेल.<br>• क्रम लावण्यासाठी तर्क करणे कार्यकारणभाव शोधणे या विचार प्रक्रिया होतील.</td></tr>
<tr><td>लिंग ओळख</td><td>विविध वस्तू, शब्दपट्ट्या</td><td>• वर्गातील विविध वस्तू तो, ती, ते या गटात मांडून त्यांच्या नावांचे लेखन करू या. उदा.<table><tr><td>तो</td><td>ती</td><td>ते</td></tr><tr><td></td><td></td><td></td></tr><tr><td>चेंडू</td><td>पट्टी</td><td>पुस्तक</td></tr></table></td><td>• शब्दांमधील लिंगनिहाय फरक शोधण्याचा व वर्गीकरण करण्याचा अनुभव मिळेल.</td></tr>
<tr><td>मुलांचे लेखन</td><td></td><td>• या ठिकाणी मुलांचे जे अनुभव आहेत, त्याचे लेखन करण्यास सांगू या. (आरंभी-स्वत:चे नाव, कुटुंबातील सदस्यांची नावे, मित्रांची नावे, तसेच त्यांच्या परिसरात काय दिसते, त्यानंतर घटना, प्रसंग तसेच त्याला मिळालेला अनुभव यांचे लेखन करण्यास सांगू या.) हे लेखन त्यांच्या स्वभाषेत होईल. ते लेखन आहे तसे स्वीकारून त्यांना लेखनास प्रोत्साहन देऊ या.</td><td>• आपली निरीक्षणे, अनुभव इ. लिहिण्याची संधी मिळेल.<br>• आपल्या मनातले लिहिण्याचा अनुभव मिळाल्याने लेखनातील रुची व आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल.<br>• आपल्या परिसरात घडणाऱ्या घटना, प्रसंग, तसेच आपले अनुभव यांवरही लिहिता येते हे कळेल.<br>• विचार करून लिहिण्याची सवय विकसित होण्यासाठी मदत होईल.</td></tr>
</table>

## परिशिष्ट 'ब' (२)

**पायाभूत भाषा साक्षरता**

**अध्ययन-अध्यापनाचे साप्ताहिक नियोजन (नमुना)**

| भाषिक विकासाचे क्षेत्र | वेळ मि. | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| मौखिक भाषा विकास | १५ ते २० | गोष्ट लक्षपूर्वक ऐकणे. | गोष्ट लक्षपूर्वक ऐकणे. | ऐकलेल्या गोष्टी सांगणे. (परिचित गोष्टी) | अक्षरगटावर आधारित वाक्य तयार करून, वाक्यांवर गप्पा मारणे (प्रश्न विचारून बोलते करावे. उदा. वाक्यातील मुलांची नावे काय आहेत. हे कोण असावेत?) | वाचन पाठावर गप्पा मारणे. (प्रश्न विचारून बोलते करावे. उदा. कोण कोण आले आहे? कोणता कार्यक्रम असावा?) |
| ध्वनींची जाण | १५ ते २० | **क,म,आ,ल,** ा ही अक्षरे घेऊन तयार होणाऱ्या शब्दांवर आधारित आवाजांचे खेळ खेळणे. | **क,म,आ,ल,** ा ही अक्षरे घेऊन तयार होणाऱ्या नादमय शब्दांवर आधारित आवाजांचे खेळ खेळणे. उदा. काका, मामा, लाला, | **क,म,आ,ल,** ा ही अक्षरे घेऊन तयार होणाऱ्या शब्दांवर आधारित आवाजांचे खेळ खेळणे. उदा. कमल, मलम, कमाल, कमला. | **क,म,आ,ल,** ा ही अक्षरे घेऊन तयार होणाऱ्या शब्दांवर आधारित वाक्यातील अक्षर, शब्द, स्वरचिन्ह ओळखणे. | **क,म,आ,ल, ा** ही अक्षरे घेऊन तयार होणाऱ्या शब्दांवर आधारित वाचनपाठातील वाक्य, अक्षर, शब्द, स्वरचिन्ह ओळखणे. |
| लिपीची जाण मजकूर समृद्ध वातावरण | १५ ते २० | सहभागी वाचन, ऐकलेल्या गोष्टीतील शब्द/वाक्य पाहणे. | सहभागी वाचन, सहभागी वाचन करताना ऐकलेल्या गोष्टीतील शब्द/ वाक्ये पाहणे. | अक्षरगटापासून तयार होणाऱ्या शब्दांचे लेखन पाहणे.(विद्यार्थ्यांनी सांगितलेल्या शब्दांचे/वाक्यांचे फळ्यावर लेखन करणे.) | अक्षरगटापासून तयार होणाऱ्या वाक्यांचे लेखन पाहणे. (फळ्यावर/ कार्डशीटवर लेखन करून वर्गात लावणे.) | अक्षरगटापासून तयार होणाऱ्या वाचनपाठाचे लेखन पाहणे. (फळ्यावर/ कार्ड शीटवर लेखन करून वर्गात लावणे.) |
| वाचन | १५ ते २० | **क, म, आ, ल, ा** यांपासून शब्द तयार करणे व वाचणे. | **क, म, आ, ल,** ा यांपासून यमक जुळणारे शब्द तयार करणे व वाचणे. उदा. काका-मका, मला-आला | **क,म,आ,ल,** ा यांपासून यमक जुळणारे शब्द तयार करणे व वाचणे. उदा. मलमल - कलकल | अक्षरगटापासून तयार झालेल्या शब्दांचे/ वाक्यांचे वाचन करणे. उदा. काका आला. कलाम आला. | अक्षरगटापासून तयार होणाऱ्या वाचनपाठाचे वाचन करणे. उदा. काका आला का? आला. मामा आला का? आला. कलाम? आला. आला. |

## परिशिष्ट 'क'

## नमुना पाठ नियोजन – १

### पायाभूत भाषा साक्षरता घटक : मौखिक भाषा विकास (पाठ्य घटक : कुटुंब)

**अध्ययन निष्पती :**

| | | |
|---|---|---|
| **EC L1 4.1** | : | स्वतःच्या गरजांविषयी बोलताना आणि माहिती मिळविण्यासाठी प्रश्न विचारताना स्वतःच्या भाषेचा किंवा शालेय भाषेचा वापर करतो. |
| **EC L1 4.3a** | : | स्वतःच्या अनुभवाची, वाचलेल्या किंवा परिचित गोष्टींशी स्वतःच्या भाषेत सांगड घालतो आणि त्याविषयी बोलतो. |
| **EC L1 6.1** | : | आवडीनिवडी, परिचित घटना/आकाशवाणी, दूरदर्शनवरील कार्यक्रम यांविषयी प्रतिसाद देण्यासाठी शालेय भाषा/स्वतःची भाषा वापरतो. |
| **EC L1 6.3a** | : | संभाषण करताना परिचित साहित्य उदा. कविता, गोष्ट, भित्तिपत्रके, जाहिरात यांची स्वतःच्या अनुभवांशी सांगड घालतो. |
| **EC L1 6.3b** | : | कथा किंवा कविता यांसारख्या परिचित साहित्यातील पात्रे, चित्रे, मध्यवर्ती कल्पना यांच्याविषयी चर्चा करतो, प्रश्न विचारतो आणि आपले मत व्यक्त करतो. |

**पाठाची पूर्वतयारी :**

प्राणी व त्याचे पिलू अशी विविध चित्रे शिक्षक सोबत ठेवतील. उदा. गाय व वासरू. कुटुंबाचा एखादा फोटो, ज्यामध्ये आई, वडील, आजी, आजोबा, ताई, दादा, काका, काकू असे सगळे असतील, असा फोटो ठेवतील.

**पूर्वज्ञान जागृती :**

शिक्षकांनी कुटुंबाशी निगडित एखादे गाणे विद्यार्थ्यांकडून कृतियुक्त म्हणून घ्यावे.

जसे : अ आ आई, म म मका, छोटेसे बहीण–भाऊ,

**अध्ययन अनुभव कृती :**

नात्यांबाबत माहिती जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधतील, जसे : आजी कोणाला म्हणतात? आजोबा म्हणजे कोण? आईच्या भावाला काय म्हणतात? आत्या कोणाला म्हणतात? या प्रकारच्या संवादातून विद्यार्थ्यांना कुटुंब ही संकल्पना समजावून सांगतील. तसेच आपण कुटुंबातील प्रत्येक सदस्याबरोबर कसे बोलावे, कसे वागावे ही माहिती चर्चेतून विद्यार्थ्यांकडून घेतील. (संवाद करताना विद्यार्थ्यांचे शब्द उच्चारण, शब्दसंपत्ती यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

**दृढीकरण :**



दिलेल्या चित्रांचे विद्यार्थ्यांना निरीक्षण करायला सांगून, गटामध्ये चित्रगप्पा करायला संधी देतील. आवश्यक तेथे शिक्षक मार्गदर्शन करतील. तसेच मुलांकडून छोटीशी नाटिका तयार करून त्याचे सादरीकरण करून घेतील.

**मूल्यांकन :**



दिलेल्या चित्रावरून विद्यार्थ्यांशी खालीलप्रकारे संवाद साधावा. दिलेल्या प्रश्नांव्यतिरिक्त चित्रावर अधिकचे प्रश्न विचारून संवाद साधावा.

१) बाबा काय करीत आहेत?

२) दादा काय करीत आहे?

३) आजी, आजोबा कोठे गेले आहेत?

४) आई काय करीत आहे?

५) ताई लॅपटॉपवर काय पाहत आहे?

**टीप**

वरील पाठ नियोजनासाठी घेतलेला घटक हा नमुना म्हणून घेतलेला आहे. भाषेचे घटक, अध्ययन निष्पत्ती व वर्तमान स्थितीतील संबंधित इयत्तेकरिता निर्धारित पाठ्यपुस्तकातील घटकांचा विचार करून पाठनियोजन करावे.

## नमुना पाठ नियोजन-२

### पायाभूत भाषा साक्षरता घटक : ध्वनीबाबत जाणीव

### पाठ्य घटक : चित्र बघ. नाव सांग, नाव दाखव.

**अध्ययन निष्पती :**

**EC L1 4.6 :** दिलेल्या मजकुराशी चित्रांचा सहसंबंध जोडून मजकुराबाबत अंदाज बांधतो व समजून घेतो.

**EC L1 4.9 :** स्वतः काढलेल्या चित्रांना व दिलेल्या चित्रांना स्वभाषेत नावे देतो.

**पाठाची पूर्वतयारी :**

- शिक्षकांनी पुढील शब्द कार्ड व चित्र कार्ड स्वतःजवळ ठेवावीत. उदा. घर, वाघ, झाड, कप, पंखा, आंबा, लसूण, कढई, लिंबू, मांजर, मोर, मासा, कमळ इ. (यासाठी मराठी भाषा पेटीतील साहित्याचा वापर करता येईल.)
- वर्गातील विद्यार्थिसंख्या लक्षात घेऊन गट रचनेचा विचार करावा.
- शिक्षकांनी पुढील आवाजाचे रेकॉर्डिंग सोबत ठेवावे. उदा. मांजर, घंटा, कुत्रा, मोटार.

**पूर्वज्ञान जागृती :** विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान जागृत करण्यासाठी पुढील कृती घ्याव्यात.

**कृती-१ :** शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे डोळे बंद करून, पुढील आवाज ऐकवावेत व ते आवाज कशाचे आहेत हे ओळखण्यास सांगावे. उदा. मांजर, घंटा, कुत्रा, मोटार.

**कृती-२ :** सांगितलेल्या शब्दातील पहिला ध्वनी ओळखण्यास सांगावे.

**अध्ययन अनुभव :**

**कृती-१ :** शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्रांची नावे ओळखण्यास सांगावीत.

**कृती-२ :** शिक्षकांनी वर दाखविलेली चित्रे व त्यांची नावे विद्यार्थ्यांच्या समोर ठेवावीत. चित्र व त्याखालील शब्दावर बोट ठेवून स्वत: शब्दाचा उच्चार मोठ्याने करावा. तो शब्द विद्यार्थ्यांकडून म्हणवून घ्यावा. (विद्यार्थ्यांनी शब्द वाचणे अपेक्षित नाही, तर तो शब्द चित्र म्हणून वाचणे अपेक्षित आहे.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| <br>मांजर | <br>लसूण | <br>आंबा | <br>कढई | <br>लिंबू |

**कृती-३ :** विद्यार्थी चित्राच्या नावाचा उच्चार करून, समोर असणाऱ्या चित्रासारखे दुसरे चित्र शोधतील व त्या चित्रावर ठेवतील. (शिक्षक प्रथम स्वत: ही कृती विद्यार्थ्यांना करून दाखवतील व आवश्यक तेथे मदत करतील.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
|  मांजर |  कढई |  आंबा |  लसूण |  लिंबू |

**कृती-४ :** विद्यार्थी चित्र व शब्द यांचा सहसंबंध लावून वाचन करतील व समोर ठेवलेल्या चित्रांखालील शब्दांचे वाचन करून, त्याच शब्दाचे कार्ड शोधून त्या शब्दावर ठेवतील. (शिक्षक प्रथम स्वत: ही कृती विद्यार्थ्यांना करून दाखवतील व आवश्यक तेथे मदत करतील.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
|  माजर |  कढई |  आंबा |  लसूण |  लिंबू |
| | | | | |
| मांजर | आंबा | लसूण | लिंबू | कढई |

**दृढीकरण/सराव :**

१) शिक्षक इतर चित्र व शब्द कार्ड वापरून, कृती क्रमांक १ ते ४ प्रमाणे सराव करून घेतील.

२) घरातील वस्तूंची नावे सांग.

**मूल्यांकन :** शिक्षकांनी वर्गातील विद्यार्थी संख्येचा विचार करून गटाची रचना करावी. गटात पुढील कृती पूर्ण करून घ्याव्यात. विद्यार्थ्यांचे निरीक्षण करून गरजेनुसार सुलभन करावे.

**कृती-१ :** पुढील चित्रातील वस्तूचे नाव सांग. (परिचित वस्तूंची चित्रे येथे देण्यात यावीत.)

**कृती-२ :** चित्रयुक्त गोष्टींच्या पुस्तकाचे निरीक्षण करून स्वत:च्या शब्दात गोष्ट सांगावी.
उदा. अट्टू-गट्टू

**टीप** वरील पाठ नियोजनासाठी घेतलेला घटक हा नमुना म्हणून घेतलेला आहे. भाषेचे घटक, अध्ययन निष्पत्ती व वर्तमान स्थितीतील संबंधित इयत्तेकरिता निर्धारित पाठ्यपुस्तकातील घटकाचा विचार करून पाठनियोजन करावे.

# नमुना पाठ नियोजन – ३

## पायाभूत भाषा साक्षरता घटक : विसांकेतीकरण

## पाठ्य घटक : पाऊस

**अध्ययन निष्पती :**

**EC L1 5.4 :** परिचित कविता आणि गाणे यांतील यमक जुळणारे शब्द आणि सारख्या उच्चाराचे शब्द तोंडी किंवालिखित स्वरूपात सांगतो/तयार करतो.

**पाठाची पूर्वतयारी :**



- शिक्षक बालगीते/बडबडगीते यांची संग्रह पुस्तिका स्वत:सोबत ठेवतील.
- शिक्षक विविध शब्दकार्डे तयार ठेवतील.
- पावसात नाचणाऱ्या मोराचे चित्र, ४ ध्वनिचित्रफीत इ. शोधून ठेवतील.

**पूर्वज्ञान जागृती :**

१) पाऊस पडण्यापूर्वी वातावरणात काय काय बदल होतात हे विचारणे.

२) विद्यार्थ्यांना नादमय शब्दांची ओळख करून देण्यासाठी शब्दभेंड्या घेणे.

**अध्ययन अनुभव :**

१) विद्यार्थ्यांना कवितेचे वाचन करून दाखविणे.

२) कवितेत नवीन आलेले शब्द शोधणे व वाचन करणे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कवितेचे वाचन करून दाखवावे. विद्यार्थ्यांना कवितेत नवीन आलेले शब्द शोधण्यास सांगावे. विद्यार्थ्यांकडून कवितेचे वाचन करून घ्यावे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या उच्चाराबाबत जागरुक रहावे. शेवटी पाऊस पडल्यानंतर वातावरणात काय बदल होतात, त्यावर विद्यार्थ्यांसोबत चर्चा करावी.

३) पाऊस पडल्यानंतर वातावरणात काय बदल होतात ते सांगणे.

**दृढीकरण :**

१) पाऊस/पावसाचे थेंब/मडके यांचे रेखाटन करा.

२) यमक जुळणाऱ्या शब्दांना गोल करा. उदा. जसे– धार–गार.

३) शिक्षकांनी एक शब्द सांगावा व त्या शब्दाला यमक साधणारे शब्द विद्यार्थ्यांद्वारे तयार करून घ्या.

**मूल्यांकन :**

- पुढील शब्दांवरून यमक जुळणारे शब्द लिही.
  वारा – गारा– ..................................................

## नमुना पाठ नियोजन – ४

### पायाभूत भाषा साक्षरता घटक : शब्दसंग्रह

### पाठ्य घटक : विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अनुभवाशी संबंधित शब्द

**अध्ययन निष्पत्ती :**

**EC L1 4.6 :** दिलेल्या मजकुराशी चित्रांचा सहसंबंध जोडून मजकुराबाबत अंदाज बांधतो व समजून घेतो.

**EC L1 4.4 :** परिचित कविता आणि गाण्यातील यमक जुळणारे शब्द ओळखतो आणि यमक जुळणारे नवीन शब्द तयार करतो.

**EC L1 4.9 :** स्वतः काढलेल्या चित्रांना व दिलेल्या चित्रांना स्वभाषेत नावे देतो.

**पूर्वतयारी :**

- शिक्षक विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित अनुभवांची विविध शब्दकार्डे तयार ठेवतील.
- आंतरजालाच्या मदतीने विविध प्रकारचे शब्द असणारे व्हिडिओ, ऑडिओ शोधून ठेवतील.
- संवादाचे व्हिडिओ, ऑडिओ शोधून ठेवतील.

  मराठी भाषा पेटी. (छोट्या – छोट्या चित्र उताऱ्यांचे कार्ड्स)

  वर्तमानपत्राची कात्रणे. (मुलांचा वयोगट, त्यांचे भावविश्व ध्यानात घेऊन मजकूर निवडावा.)

  बालगीतांची छोटी – छोटी पुस्तके सोबत ठेवतील. उदा. विंदांच्या बालकविता.

**पूर्वज्ञान जागृती :**

शिक्षकांनी मुलांना विविध बडबडगीते, बालगीते ऐकवावीत. (स्वतः म्हणून किंवा ध्वनीफितीच्या मदतीने) शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या संवादाचे सूक्ष्म निरीक्षण व अवलोकन करून, त्यांनी सांगितलेल्या विविध शब्दांचे स्वतंत्रपणे लेखन करावे.

**अध्ययन अनुभव :**

**कृती–१ :** शिक्षकांनी फलकावर लिहिलेल्या शब्दांचे वाचन करून घ्यावे. फलकावर लेखन केलेला शब्द कोणी सांगितला? असे विचारावे. (विद्यार्थिनिहाय अशाप्रकारे कृती घ्यावी.)

**कृती–२ :** अ) विद्यार्थ्यांना ऐकलेले शब्द वर्गासमोर किंवा गटामध्ये सांगण्याची संधी द्यावी. उदा. एखादी गोष्ट, कविता, घटना ऐकल्यानंतर त्यांतील शब्द सांगणे.

ब) शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत गोष्टीरूपात केलेला संवाद किंवा विद्यार्थ्यांनी आंतरजालाच्या मदतीने ऐकलेल्या गोष्टीचा समजलेला आशय स्वतःच्या शब्दात सांगण्याची संधी द्यावी.

**कृती–३ :** विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील चित्रांची निवड करून, त्या चित्रांचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची संधी विद्यार्थ्यांना द्यावी. चित्रातील समजलेला आशय सांगण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. चित्रातील आशयावर शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद करावा.

**दृढीकरण/सराव :**

**कृती–१ :** विद्यार्थ्यांना विविध चित्रे दाखवावीत. चित्राच्या शब्दाचे उच्चारण ऐकवावे. त्यानंतर शब्दकार्ड दाखवावे.

**उदा.**  → **उच्चारण ऐकवावे** → **घंटा**

या पद्धतीने शब्दांचा सराव घ्यावा. नंतर एकेका शब्दाचे कार्ड दाखवून, तो शब्द उच्चारून मुलांना त्या शब्दाशी संबंधित, माहीत असणारे इतर शब्द सांगण्यास प्रेरित करावे.

**उदा.** **घंटा** शब्दकार्ड दाखवावे. शब्द मोठ्याने उच्चारावा. मुलांनी घंटा शब्दाशी संबंधित सांगितलेल्या शब्दांचा स्वीकार करून ते शब्द फलकावर लिहावेत.

**जसे की –**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| घर | आवाज | शाळा | बसस्थानक | भ्रमणध्वनी |
| कचरागाडी | आईस्क्रीम गाडी | रस्ता | दरवाजा | फाटक |

विद्यार्थ्यांनी शब्द चित्राबाबत सांगितलेले कोणतेही शब्द स्वीकारावेत.

**मूल्यांकन :**

**कृती–१ :** विद्यार्थ्यांना ऐकलेल्या शब्दांची चित्रे काढण्यास सांगावे.

**कृती–२ :** 'घंटा' या शब्दावर आधारित शब्दचक्र तयार करणे. (शब्दसंपत्ती या घटकांतर्गत अनुभव दिलेल्या शब्दांची काठिण्यपातळी वाढवून अधिकचा सराव घ्यावा. उदा. अनुभव दिलेल्या शब्दांपासून उतारा/गोष्ट/तयार करून सांगणे.)

**टीप**

वरील पाठ नियोजनासाठी घेतलेला घटक हा नमुना म्हणून घेतलेला आहे. भाषेचे घटक, अध्ययन निष्पत्ती व वर्तमान स्थितीतील संबंधित इयत्तेकरिता निर्धारित पाठ्यपुस्तकातील घटकाचा विचार करून पाठनियोजन करावे.

## नमुना पाठ नियोजन – ५

### पायाभूत भाषा साक्षरता घटक : आकलनात्मक वाचन

### पाठ्य घटक : भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण

**अध्ययन निष्पत्ती :**



**EC L1 5.5c :** परिचित आणि अपरिचित मजकुराचे वाचन करण्याचा प्रयत्न करतो आणि त्याविषयी बोलतो, चर्चा करतो. उदा. चित्राविषयी अंदाज लावतो, ध्वनी चिन्हे, आवाज यांचा सहसंबंध जाणतो, पूर्वज्ञान व अनुभवांच्या आधारे शब्द ओळखतो.

**EC L1 5.7 :** कथा/कविता आणि इतर मजकुराच्या आधारावर व्यक्तिरेखा व प्रसंग यांवर बोलतो.

**पाठाची पूर्वतयारी :**

- शिक्षकांनी मराठी भाषा पेटीतील चित्रमय उतारे, चित्र कार्डे, शब्द कार्डे, परिचित चित्रमय उतारे, बालसाहित्यातील चित्रमय उतारे सोबत ठेवावे.
- वर्गातील विद्यार्थिसंख्या लक्षात घेऊन गट रचनेचा विचार करावा.

**पूर्वज्ञान जागृती :**

शिक्षकांनी एखादी गोष्ट सांगावी, त्यावर प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून चर्चा करावी. (मराठी भाषा पेटीतील चित्रमय उताऱ्याचे वाचन करायला सांगावे.)

**अध्ययन अनुभव :**

**कृती–१ :** भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण या उताऱ्याचे चित्रासह वाचन करून घ्यावे.

**भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण**

**चित्रांच्या जागी योग्य शब्द वापरून पाठ वाच.**

एक होती  . एके दिवशी  घेऊन ती गेली बाजारात. बाजारातून तिने  आणल्या आणि स्वयंपाकघरात एका  भरून ठेवल्या. आजी बाहेर जाताच टोपलीतून बाहेर पडले एक  . ते म्हणाले, ''मी आहे तुमचा राजा, तुम्ही माझे ऐकायचे.'' तोच  म्हणाला, ''मी मोठा आहे म्हणून मीच आहे राजा.''  चिडून म्हणाला, ''नाहीच मुळी. मी आहे लालेलाल, मीच आहे राजा!''  म्हणाले, ''माझे ऐका, सर्व भाज्या चवदार करणारा मीच आहे राजा.''  आणि  भांडण सोडविण्यासाठी धडपड करू लागली; पण कोणीच ऐकेना. तेवढ्यात  परत आली. तिच्या हातात  होती. तिने  कापला, टोमॅटो चिरले.  निवडली, धुतली.

 उकडले आणि बनवली झकास भाजी!  कापून भाजी केली.  भाजून भरीत केले.  चिरून कोशिंबीर केली. भाज्यांनाही गंमत वाटली. सगळ्यांची एकमेकांशी गट्टी झाली.  वाटून चटणी केली.  किसून हलवा केला. नातवासाठी  वाढले. जेवण मग थाटात झाले.

**सौजन्य : रेश्मा बर्वे**

**कृती–२ :** 'भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण' या उताऱ्यातील चित्रांऐवजी योग्य शब्दांचा वापर करून वाचन करून घ्यावे. शब्दकार्डांचा उपयोग करावा.

**कृती–३ :** विद्यार्थ्यांचे आकलन तपासण्यासाठी काही प्रश्न विचारावेत. **जसे :**

१) उताऱ्यात कोणत्या भाज्यांचा उल्लेख आलेला आहे?
२) यातील कोणकोणत्या भाज्या कच्च्या खातात?
३) कोशिंबीर कशी बनवतात?
४) जेवण थाटात का झाले असेल?
५) तुम्हांला कोणती भाजी आवडते?

## दृढीकरण/सराव :

**कृती–१ :** चित्रमय उताऱ्यांचे वाचन करून घ्यावे व त्यावर आधारित काही प्रश्न विचारावेत.

**कृती–२ :** गटागटात चित्रमय उतारे देऊन व सोबत शब्दकार्ड देऊन वाचन करून घेतात. त्यांच्यात चर्चा घडवून आणतात.

## मूल्यांकन :

१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परिचित/अपरिचित चित्रमय उतारे देऊन, विद्यार्थी समजपूर्वक वाचन करतात का हे पहावे.

२) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उताऱ्यांवर आधारित आकलनात्मक प्रश्न विचारावेत, विद्यार्थी समजपूर्वक वाचन करतात का याकडे लक्ष द्यावे.

**जसे :** उताऱ्यात आलेल्या भाज्यांची नावे सांगा. वर्गीकरण करा.

| कच्च्या खाल्ल्या जाणाऱ्या भाज्या | शिजवून खाल्ल्या जाणाऱ्या भाज्या | उकडून खाल्ल्या जाणाऱ्या भाज्या |
|---|---|---|
| | | |

विद्यार्थ्यांना परिचित चित्रकार्डे द्यावीत व त्यावर आधारित वाक्ये बनवून घ्यावीत.

**जसे :** मला  खूप आवडते.

**टीप**

वरील पाठ नियोजनासाठी घेतलेला घटक, हा नमुना म्हणून घेतलेला आहे. भाषेचे घटक, अध्ययन निष्पत्ती व वर्तमान स्थितीतील संबंधित इयत्तेकरिता निर्धारित पाठ्यपुस्तकातील घटकाचा विचार करून पाठनियोजन करावे.

## नमुना पाठ नियोजन – ६

### पायाभूत भाषा साक्षरता घटक : ओघवते वाचन

**अध्ययन निष्पत्ती :**

**EC L1 5.5a :** बाल साहित्यातील आणि पाठ्यपुस्तकातील मजकुराबाबत त्याला परिचित अशा संदर्भाने अंदाज लावतो आणि वाचतो.

**EC L1 5.5c :** परिचित आणि अपरिचित मजकुराचे वाचन करण्याचा प्रयत्न करतो आणि त्याविषयी बोलतो, चर्चा करतो. उदा. चित्राविषयी अंदाज लावतो, ध्वनी चिन्हे, आवाज यांचा सहसंबंध जाणतो, पूर्वज्ञान व अनुभवांच्या आधारे शब्द ओळखतो.

**पूर्वतयारी :**

- शिक्षकांनी मराठी भाषा पेटीतील चित्रमय उतारे, बाल वाचन साहित्य (वयोगटानुसार वाचन कोपऱ्यातील पुस्तके).
- वाचनपाठ (परिचित व अपरिचित) सोबत ठेवावे.
- शिक्षकांनी पाठाचे नमुना वाचन करण्याकरिता तंत्रज्ञानाचे साहित्य तयार ठेवावे.

**पूर्वज्ञान :**

१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील परिचित उताऱ्याचे वाचन करायला सांगावे.

२) गटागटात व वैयक्तिक अशाप्रकारे वाचन घ्यावे.

३) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एकमेकांचे वाचन ऐकण्याची संधी द्यावी.

**अध्ययन अनुभव :** पाठाचे नमुना वाचन ऐकवतात/नमुना पाठ वाचून दाखवावा. (शिक्षकांनी स्वतः केलेले वाचन/तंत्रज्ञानाचा उपयोग करून केलेले नमुना वाचन) पाठाचे वाचन करून घ्यावे. वाचताना स्वराघात, आरोह–अवरोह, विरामचिन्हांचा विचार करून विद्यार्थी वाचन करतात का याचे निरीक्षण करावे. मराठी भाषा पेटीतील वाचन पाठांचे वाचन करून घेणे. (वैयक्तिक व गटागटात) परिचित उताऱ्यांचे वाचन घेतात. विद्यार्थ्यांना एकमेकांचे वाचन ऐकण्याची संधी देतात.

**सराव/दृढीकरण :** मराठी भाषा पेटीतील वाचनपाठांचे वाचन करून घ्यावे. मराठी भाषा पाठ्यपुस्तकातील पाठांचे प्रकट वाचन घ्यावे. वाचन कोपऱ्यातील वयानुरूप पुस्तके गटागटात वाचण्यासाठी द्यावीत. विद्यार्थ्यांना एकमेकांचे वाचन ऐकण्याची संधी द्यावी.

**मूल्यांकन :** गटात वाचनाची संधी दिल्यावर, विद्यार्थी कसे वाचतात याचे निरीक्षण करावे. वैयक्तिक वाचन घेताना विद्यार्थी योग्य गतीने व अचूकतेने वाचन करतो का, यासाठी पडताळा सूचीचा उपयोग करावा. गटात उत्कृष्ट वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी इतर विद्यार्थ्यांना मदत करावी याकरिता प्रेरित करावे.

**टीप**

वरील पाठ नियोजनासाठी घेतलेला घटक, हा नमुना म्हणून घेतलेला आहे. भाषेचे घटक, अध्ययन निष्पत्ती व वर्तमान स्थितीतील संबंधित इयत्तेकरिता निर्धारित पाठ्यपुस्तकातील घटकाचा विचार करून पाठनियोजन करावे.

## नमुना पाठ नियोजन – ७

### पायाभूत भाषा साक्षरता घटक : भाषेच्या लेखी रूपाची जाणीव

### पाठ्य घटक - दिनदर्शिका

**अध्ययन निष्पत्ती :**

**EC L1 5.5a :** बाल साहित्यातील आणि पाठ्यपुस्तकातील मजकुराबाबत त्याला परिचित अशा संदर्भाने अंदाज लावतो आणि वाचतो.

**EC L1 5.6 :** चित्रकथा/गोष्टींची पुस्तके यांतील घटना आणि पात्रे समजून घेतो आणि त्यांच्या विषयी लिहितो.

**पाठाची पूर्वतयारी :**

- शिक्षक जुनी वर्तमानपत्रे (रद्दी), जाहिरातींचे कागद, दिनदर्शिका व रंगीत पेन, कागद सोबत ठेवतील.

**पूर्वज्ञान जागृती :** (शिक्षक मुलांच्या पूर्वज्ञान जागृतीसाठी अशा प्रकारचे प्रश्न विचारतील.)

- तुमच्या घरी कोणती दिनदर्शिका आहे?
- दिनदर्शिकेत काय काय नोंदविलेले असते?
- घरापासून शाळेत येताना कोणकोणत्या जाहिराती व दुकानाच्या पाट्या तुम्हांला दिसल्या?

**अध्ययन अनुभव :**

**कृती–१ :** जुन्या दिनदर्शिकेत स्वतःचा, मित्राचा वाढदिवस शोधायला सांगणे.

**कृती–२ :** दिनदर्शिकेत लाल अक्षरात लिहिलेल्या दिनांकांच्या दिनविशेषांची यादी तयार करायला सांगणे.

**कृती–३ :** विद्यार्थ्यांना स्वतःची दिनदर्शिका तयार करायला सांगणे.

**कृती–४ :** दिनदर्शिकेत कोणता वार किती वेळा आलेला आहे याच्या नोंदी घ्यायला सांगणे.

**कृती–५ :** दिनदर्शिकेत वारानुसार आलेल्या लगतच्या दोन तारखांमध्ये कितीचा टप्पा आलेला आहे, त्याचा शोध घ्यायला सांगणे.

**सराव/दृढीकरण :**

**कृती–१ :** वर्गमित्रांच्या वाढदिवसाची यादी तयार करून, वाढदिवसाचे दिनांक दिनदर्शिकेत शोधण्यास सांगणे.

**कृती–२ :** विविध प्रकारच्या दिनदर्शिकांचे नमुने गोळा करण्याचा प्रकल्प घ्यावा.

**कृती–३ :** दिनदर्शिकेवरील विविध जाहिरातींचा संग्रह करणे आणि त्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याची संधी देणे.

**मूल्यांकन :**

- रंगीत कागद व पेनाच्या साहाय्याने दिनदर्शिका तयार करण्यास सांगावे.
- आपल्या गावातील विशेष दिनविशेष, यात्रा दिनदर्शिकेत दाखवण्यास सांगावे.
- मुलांनी तयार केलेली उत्कृष्ट दिनदर्शिका वर्गात लावावी व इतरांना त्याची वैशिष्ट्ये सांगावयास प्रोत्साहन द्यावे.

**टीप**

वरील पाठ नियोजनासाठी घेतलेला घटक, हा नमुना म्हणून घेतलेला आहे. भाषेचे घटक, अध्ययन निष्पत्ती व वर्तमान स्थितीतील संबंधित इयत्तेकरिता निर्धारित पाठ्यपुस्तकातील घटकाचा विचार करून पाठनियोजन करावे.

## नमुना पाठ नियोजन – ८

### पायाभूत भाषा साक्षरता घटक : लेखन

### पाठ्य घटक - अक्षर ओळख (म)

**अध्ययन निष्पत्ती :**

**EC L1 4.7 :** घरी शाळेत व आजूबाजूच्या परिसरात आढळणाऱ्या पक्षी व प्राण्यांविषयी बोलतो आणि स्व–भाषेत लिहितो.

**EC L1 4.8 :** कविता, गोष्टी वाचताना अक्षरांची चिन्हे आणि त्यांच्या ध्वनीबद्दल जागरूकता दाखवितो आणि त्याचा लिहिण्यात वापर करतो.

**शिक्षक पूर्वतयारी :**

- अक्षरगटानुसार अक्षरांचे संच (किमान ५) सोबत ठेवावेत.
- मराठी भाषा पेटी
- शिक्षकांनी वर्तमानपत्र व मासिके यांचा संग्रह सोबत ठेवावे.
- शिक्षकांनी धूळपाटी, रांगोळी, माती असे साहित्य सोबत ठेवावे.
- वर्गातील विद्यार्थिसंख्या लक्षात घेऊन गटरचनेचा विचार करावा.



**पूर्वज्ञान जागृती :**

**कृती–१ :** चित्र – चित्र, चित्र – शब्द, शब्द–शब्द इत्यादी कार्डे दाखवून समान शब्दांच्या जोड्या लावण्याचा खेळ.


**कृती–२ :** विविध आकार, अक्षरे धूळपाटी, रांगोळी, मातीवर गिरवणे.

**अध्ययन अनुभव :**

**कृती–१ :** शिक्षकांनी मुलांकडून शब्दचक्र तयार करून घ्यावीत.

उदा. 'म' अक्षराचे शब्दचक्र तयार करून घेणे.

विविध शब्दांबद्दल विद्यार्थ्यांसोबत चर्चा करणे.



**कृती–२ :** शिक्षकांनी मुलांना ‘म’ अक्षराची चित्राकृती काढून द्यावी व त्या चित्राकृतीवर छोटे दगड, चिंचोके, मणी किंवा इतर उपलब्ध वस्तू ठेवण्यास सांगणे.

**कृती–३ :** मुलांना वृत्तपत्रात ‘म’ अक्षर शोधून गोल करण्यास सांगणे.

**कृती–४ :** मुलांकडून ‘म’ या अक्षराचे लेखन करून घेणे.

**कृती–५ :** अशाप्रकारे मुलांकडून विविध अक्षरांचा सराव करून घेणे.

**दृढीकरण :**


**कृती–१ :** परिसरातील दुकानांच्या पाट्या जाहिराती, फलक यात ‘म’ अक्षर असणारे शब्द शोधणे.

**कृती–२ :** मका – मामा – मासा – माणूस – मार – माती – माकड

**कृती–३ :** काम – दाम – घाम – राम – नाम – शाम

(‘म’ ने सुरू होणाऱ्या व शेवट होणाऱ्या शब्दांचा सराव करून घेणे.)

(वरीलप्रमाणे वेगवेगळी अक्षरे देऊन त्या अक्षरांपासून शब्दचक्र तयार करून, लेखन करून घेणे.)



**मूल्यांकन :**

१) वर्तमानपत्रातील ‘म’ अक्षर असलेल्या शब्दांचा संग्रह करून लेखन करणे.

२) विद्यार्थी अक्षर अवयवांच्या योग्य क्रमानुसार अक्षराचे लेखन करतो का, याचे निरीक्षण करावे.

**टीप**

वरील पाठ नियोजनासाठी घेतलेला घटक हा नमुना म्हणून घेतलेला आहे. भाषेचे घटक, अध्ययन निष्पत्ती व वर्तमान स्थितीतील संबंधित इयत्तेकरिता निर्धारित पाठ्यपुस्तकातील घटकाचा विचार करून पाठनियोजन करावे.

## नमुना पाठ नियोजन – ९

### पायाभूत भाषा साक्षरता घटक : वाचनसंस्कृती/वाचनाकडे कल निर्माण करणे.

### पाठ्य घटक : 'शेपटीवाल्या प्राण्यांची एकदा भरली सभा' हे बालगीत.

**अध्ययन निष्पत्ती :**

**EC L1 4.2** : वाचन कोपरा/वाचन साहित्यातून पुस्तक निवडतो आणि त्याविषयी चर्चा करतो/चित्रांच्या साहाय्याने गोष्ट तयार करून सांगतो.

**EC L1 4.4** : परिचित कविता आणि गाण्यातील यमक जुळणारे शब्द ओळखतो आणि यमक जुळणारे नवीन शब्द तयार करतो.

**EC L1 4.7** : घरी शाळेत व आजूबाजूच्या परिसरात आढळणाऱ्या पक्षी व प्राण्यांविषयी बोलतो आणि स्व–भाषेत लिहितो.

**पाठाची पूर्वतयारी :**

- शिक्षकांनी शब्दकार्ड व चित्रकार्ड, विविध प्राण्यांची चित्रे, विविध वाद्यांची चित्रे, विविध प्राण्यांचे मुखवटे, कृतियुक्त बालगीते यांच्या ऑडिओ व व्हिडिओ क्लिप, वाचनालयातील विविध चित्रमय पुस्तके सोबत ठेवावी. (यासाठी मराठी भाषा पेटीतील साहित्याचा वापर करता येईल.)
- वर्गातील विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन गटरचनेचा विचार करावा.

**पूर्वज्ञान जागृती :**

मुलांना काही प्राण्यांची ओळख आहे. सुलभकांनी काही प्राणी, त्यांचे आवाज, चालणे इ. चे नाट्यीकरण करून दाखवावे व ओळखण्यास सांगावे. प्राणी, पक्षी यांची चित्रे दाखवून ओळखण्यास सांगावे. परिसरात उपलब्ध असलेल्या प्राण्यांची चित्रफीत दाखवून ऑडिओ किंवा व्हिडिओद्वारे सहज संवाद साधावा. 'शेपटीवाल्या प्राण्यांची भरली होती सभा' या गीताचे सादरीकरण करावे किंवा व्हिडिओ दाखवावे.

**अध्ययन अनुभव :**

शिक्षक नाट्यीकरण व कृतियुक्त गीत म्हणून दाखवितात, मुले पुनरावृत्ती करतात. विविध प्राणी व त्यांचे आवाज ऐकवितात व मुलांना ओळखण्यास सांगतात. कवितेत आलेले अपरिचित शब्द, नादमय शब्द, गमतीदार शब्द त्यांचे वाचन घेतात, अपरिचित शब्द स्पष्ट करतात. काही इंग्रजी शब्द मुलांना माहीत आहेत का हे जाणून घेतात. उदा. माऊस, वन्स मोअर इ. अपरिचित प्राण्यांची ओळख करून देण्यासाठी विविध चित्रे दाखवतात. नादमय शब्दवाचन व लेखन उदा. जोडाक्षरे शोधण्यास सांगतात व शब्द फळ्यावर लिहून, वाचन करून घेतात.

**दृढीकरण/सराव :**

१) शिक्षकांनी पुन्हा एकदा मुलांना कविता ऐकवावी.

२) मुलांकडून कृतियुक्त पद्धतीने कविता म्हणून घ्यावी.

३) प्राणी व चित्रे यांच्या जोड्या लावण्यास सांगावे.

४) शब्दपट्ट्या वाचनाचा सराव घ्यावा.

५) चित्र वाचनाचा सराव घ्यावा.

६) चित्राबाबत एक दोन वाक्ये बोलण्यास सांगावे.

वाचन कोपऱ्यातून आवडणाऱ्या चित्रकथा व प्राणी, पक्षी यांची पुस्तके घेऊन वाचण्याचा सराव घेणे. कवितेवर आधारित सोपे प्रश्न विचारावेत. मोर कसा नाचतो? विविध प्राणी व त्यांचे आवाज यांची नक्कल करा.

**मूल्यांकन :**

तुम्हांला कोणता प्राणी आवडतो त्याबद्दल मुलांना सांगण्यास संधी द्यावी. पाच-पाच मुलांचे गट करून खेळ घ्यावा. ज्यांच्यावर राज्य येईल, त्या गटाने कोणताही प्राणी व त्याचा आवाज, चालणे याचे नाट्यीकरण करावे. यमक जुळणारे शब्द शोधून म्हणावेत व यमक जुळणाऱ्या (सारखा उच्चार असणाऱ्या शब्दांच्या जोड्या लावा.) शब्दांच्या जोड्या लावा. (शब्द पट्ट्या, चित्र शब्द पट्ट्या, वाक्य व चित्रे)

**वर्गकार्य :**

वाचन कोपऱ्यातून आवडणाऱ्या चित्रकथा व प्राणी, पक्षी यांची पुस्तके घेऊन वाचण्यास सांगावे. कृतियुक्त बालगीते वाचण्यास व वर्गात म्हणण्यास सांगावे.

**टीप**

वरील पाठ नियोजनासाठी घेतलेला घटक, हा नमुना म्हणून घेतलेला आहे. भाषेचे घटक, अध्ययन निष्पत्ती व वर्तमान स्थितीतील संबंधित इयत्तेकरिता निर्धारित पाठ्यपुस्तकातील घटकाचा विचार करून पाठनियोजन करावे.

वरीलप्रमाणे आपण काही पाठनियोजनाचे नमुने पाहिले. परिशिष्टामध्ये आपणांस मार्गदर्शक ठरतील, अशा कृतींचे दैनंदिन नियोजनही देण्यात आले आहे; जे आपल्याला मुलांच्या पायाभूत भाषा साक्षरता विकासात मार्गदर्शक ठरेल.

❑❑❑

NIPUN BHARAT

## परिशिष्ट 'ड'

**निपुण भारत अभियानांतर्गत इयत्ता पहिली ते तिसरी अखेर (वय वर्षे ६ ते ९) पायाभूत भाषा साक्षरतेमध्ये विद्यार्थ्यांसाठी सन २०२६-२७ पर्यंत खालील किमान लक्ष्य निर्धारित केलेले आहे.**

| | | |
|---|---|---|
| **इयत्ता पहिली (वयोगट ६-७ वर्षे)** | | |
| मौखिक भाषा | १) | तिच्या गरजा, भोवतालचा परिसर यांबद्दल मित्र व वर्गशिक्षकांशी संभाषण साधतो. |
| | २) | वर्गात उपलब्ध असलेल्या मुद्रित साहित्याबद्दल बोलतो. |
| | ३) | कृतीसह बडबडगीते/कविता/गाणी म्हणतो. |
| वाचन | १) | प्रकट वाचन/कथाकथन सत्रात सक्रिय सहभाग घेतो आणि कथासत्राच्या दरम्यान आणि नंतर उत्तरे देतो, ओळखीची कथा साहित्य आणि कठपुतळ्यांच्या सहाय्याने सादर करतो. |
| | २) | शब्दांच्या स्वत: तयार केलेल्या लिखित रूपासाठी ध्वनीच्या संकेत चिन्हांचा वापर करतो. |
| | ३) | वयानुरूप अपरिचित मजकुरातील ४-५ सोप्या शब्दांनी बनलेली लहान वाक्ये वाचतो. |
| लेखन | १) | परिचित संदर्भामध्ये येणाऱ्या शब्दांतील मात्रा ओळखतो. (कथा, कविता, परिसर मुद्रण, इत्यादी) |
| | २) | त्याच्या/तिच्या कार्यपुस्तिकेमध्ये, शुभेच्छापत्रांमध्ये अर्थ व्यक्त करण्यासाठी व शब्द दाखविण्यासाठी लिहितो/चित्र काढतो, वस्तूंची वा व्यक्तींची ओळखता येण्याजोगी चित्रे काढतो. |
| **इयत्ता दुसरी (वयोगट ७-८ वर्षे)** | | |
| मौखिक भाषा | १) | बालसाहित्य/पुस्तकातील कथांचे वाचन करतो/सांगतो. |
| | २) | दिलेल्या शब्दाच्या अक्षरांवरून नवीन शब्द बनवतो. |
| | ३) | गाणी/ कविता म्हणतो. |
| | ४) | कथा/कविता/मुद्रित साहित्यामध्ये येणाऱ्या परिचित शब्दांची पुनरावृत्ती करतो. |
| वाचन | १) | वर्गात उपलब्ध असलेल्या मुद्रित साहित्याबद्दल बोलतो आणि संभाषण साधतो. |
| | २) | प्रश्न विचारण्यासाठी संभाषणात गुंतून राहतो व इतरांचे ऐकतो. |
| | ३) | वयानुरूप सोप्या शब्दांनी बनलेला ८-१० वाक्यांचा अपरिचित मजकूर योग्य वेगाने (अंदाजे ४५-६ शब्द अचूकपणे), आकलन व स्पष्टतेसह वाचतो. |

| | | |
|---|---|---|
| **इयत्ता दुसरी (वयोगट ७-८ वर्षे)** | | |
| लेखन | १) | व्यक्त होण्यासाठी लहान/सोपी वाक्ये अचूकपणे लिहितो. |
| | २) | विशेष नामे, कृती नामे, विरामचिन्हे ओळखतो. |
| **इयत्ता तिसरी (वयोगट ८-९ वर्षे)** | | |
| मौखिक भाषा | १) | घरातील/शालेय भाषेत योग्य शब्दसंग्रह वापरून सुस्पष्ट संभाषण करतो. |
| | २) | वर्गातील मुद्रित साहित्याबद्दल बोलतो. |
| | ३) | प्रश्न विचारणे, स्वत:चे अनुभव सांगणे, इतरांचे ऐकून प्रतिसाद देणे याप्रकारे संभाषणामध्ये सहभागी होतो. |
| | ४) | आवाजातील योग्य चढउतार व उच्चारसह वैयक्तिक आणि गटात कविता म्हणतो. |
| वाचन | १) | परिचयाच्या पुस्तकांमधून/पाठ्यपुस्तकांमधून माहिती शोधून काढतो. |
| | २) | वयानुरूप अपरिचित मजकुरातील, दर मिनिटाला कमीत कमी ६० शब्द आकलनासह आणि अचूक उच्चारांसह वाचतो. |
| | ३) | मजकुरातील सूचना वाचतो आणि त्यांचे पालन करतो. |
| | ४) | वयानुरूप अपरिचित मजकुरातील वाचनावर/८-१० वाक्यांच्या उताऱ्यावरील ४ पैकी कमीत कमी ३ प्रश्नांची उत्तरे देऊ शकतो. |
| लेखन | १) | वेगवेगळ्या कारणांसाठी लहान संदेश लिहितो. |
| | २) | नामे, विशेष नामे, विरामचिन्हे यांचा वापर करतो. |
| | ३) | व्याकरणदृष्ट्या अचूक वाक्ये लिहितो. |
| | ४) | व्याकरणदृष्ट्या अचूक लहान उतारा आणि लहान गोष्ट स्वत:हून लिहितो. |

**वरीलप्रमाणे पालक, समाज, स्वयंसेवकांमध्ये निपुण भारत अभियान बाबत जाणीव जागृती करण्यासाठी लक्ष्ये निर्धारित केलेली आहेत. शिक्षकांचे लक्ष्य मात्र, इयत्ता तिसरी अखेर अपेक्षित अध्ययन निष्पत्ती परिशिष्ट 'अ' साध्य करणे हे आहे.**

❑❑❑

शिक्षकांनी पायाभूत भाषा साक्षरता संदर्भाने अधिक अभ्यासासाठी पुढील संदर्भ अभ्यासावेत.

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०
(https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/nep/2020/MARATHI.pdf)

२) **NIPUN BHARAT : National Initiative for Proficiency in Reading with Understanding and Numeracy-GUIDELINES FOR IMPLEMENTION**
(http://www.education.gov.in/sites/upload_files/nipun_bharat_eng1.pdf)

३) बहुभाषिक परिस्थितीतील अध्ययन-अध्यापन : शिक्षक मार्गदर्शिका
(http://maa.ac.in/documents/BahubhashikShikshakMargadarshika.pdf)

४) भारत सरकारच्या **National Initiative for Proficiency in Reading with Understanding and Numeracy (NIPUN BHARAT)** अंतर्गत 'मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान' ची अंमलबजावणी करणेबाबतचा शासन निर्णय-महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२१/ प्र.क्र.१७९/एस डी-मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि. : २७ ऑक्टोबर, २०२१.
(http://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%20 Resolutions/Marathi/20211027 456565021.pdf

## श्रेयनामावली

### पायाभूत भाषा साक्षरता : शिक्षक मार्गदर्शिका : विकसन, लेखन व समीक्षण सहभाग

| अ.क्र. | तज्ज्ञाचे नाव | कार्यरत पद | शाळा किंवा कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्री. रवींद्र खंदारे | उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) | जिल्हा परिषद, सातारा. |
| २. | डॉ. बाबासाहेब बडे | अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नाशिक. |
| ३. | डॉ. नंदा भोर | माध्यमिक शिक्षक | भैरवनाथ विद्यालय, दोंदे, ता. खेड, जि. पुणे. |
| ४. | श्रीम. गार्गी चतुर्वेदी | मुख्याध्यापक | मनपा शाळा, उल्हासनगर, जि. ठाणे. |
| ५. | श्री. सचिन ढोबळे | प्राथमिक शिक्षक | जिल्हा परिषद प्राथ. बच्चेवाडी, ता. खेड, जि. पुणे. |
| ६. | श्री. बाळासाहेब लिंबीकाई | मुख्याध्यापक | समर्थ प्राथ. आश्रमशाळा, बेडग, ता. मिरज, जि. सांगली. |
| ७. | डॉ. प्रिया निघोजकर | प्राथमिक शिक्षक | सु. रा. मुलींची प्रशाला, सेवासदन, जि. सोलापूर. |
| ८. | श्रीम. योगिता बलाक्षे | विषय साधन व्यक्ती | गटसाधन केंद्र, ता. मुळशी, जि. पुणे. |
| ९. | श्री. विकास गायकवाड | प्राथमिक शिक्षक | जिल्हा परिषद प्राथ. शाळा, वांगणीवाडी, ता. वेल्हे, जि. पुणे. |
| १०. | श्री. नारायण शिंदे | प्राथमिक शिक्षक | जिल्हा परिषद प्राथ. शाळा, वाडावेसराड, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. |
| ११. | डॉ. रोहिणी गव्हाणे | प्राथमिक शिक्षक | जिल्हा परिषद प्राथ. शाळा, निघोजे, ता. खेड, जि, पुणे. |
| १२. | श्रीम. विनिता धकीते | प्राथमिक शिक्षक | जिल्हा परिषद प्राथ. शाळा, घोगरकरवाडी, वांगणी, ता. रोह, जि. रायगड. |
| १३. | श्रीम. कविता लडकत | विषय साधन व्यक्ती | गटसाधन केंद्र, ता. मुळशी, जि. पुणे. |
| १४. | श्रीम. ज्ञानेश्वरी परदेशी | प्राथमिक शिक्षक | जिल्हा परिषद प्राथ. शाळा, पवार वस्ती, ता. हवेली, जि. पुणे. |
| १५. | श्री. देविदास गोसावी | प्राथमिक शिक्षक | जिल्हा परिषद उच्च प्राथ. शाळा, जामाठी, ता. बुलढाणा, जि. बुलढाणा. |
| १६. | श्रीम. गौरी गोसावी | प्राथमिक शिक्षक | जिल्हा परिषद प्राथ. शाळा, कुडाळ, कुंभारवाडा, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. |
| १७. | श्रीम. आशा सकट | प्राथमिक शिक्षक | जिल्हा परिषद प्राथ. शाळा, लोणीकंद, ता. हवेली, जि. पुणे. |
| १८. | श्रीम. सीमा महाडिक | प्राथमिक शिक्षक | जिल्हा परिषद प्राथ. शाळा, चिरमोडी, ता. वेल्हे, जि. पुणे. |
| १९. | श्रीम. वैशाली डेरे | प्राथमिक शिक्षक | कै. काकासाहेब मोहोळ विद्यालय, मनपा शाळा क्र. ९४ बी, केळेवाडी, पुणे ३८. |
| २०. | श्रीम. रती भोसेकर | प्राथमिक शिक्षक | सरस्वती मंदिर ट्रस्ट, ठाणे. |
| २१. | श्रीम. चित्रा पेंढारकर | प्राथमिक शिक्षक | पं. दीनदयाळ उपाध्यय वि. मंदिर, मनपा शाळा क्र. ७४ जी, पुणे. |
| २२. | डॉ. लता पाडेकर | प्राथमिक शिक्षक | लोकनेते यशवंतराव चव्हाण विद्यानिकेतन क्र. ६, येरवडा, पुणे. |
| २३. | डॉ. सविता अष्टेकर | प्राथमिक शिक्षक | रा. जि. प. कन्याशाळा, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड. |
| २४. | श्रीम. दीपाली बाभूळकर | प्राथमिक शिक्षक | जिल्हा परिषद प्राथ. शाळा, खारतळेगाव, ता. भातकुली, जि. अमरावती. |
| २५. | श्री. गोपाल अभ्यंकर | विषय सहायक | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती. |
| २६. | श्री. विजयकुमार सरगर | सहायक शिक्षक | श्री काडसिद्धेश्वर हायस्कूल व ज्युनि. कॉलेज, कणेरी, जि. कोल्हापूर. |
| २७. | श्री. प्रशांत मगदूम | सहायक शिक्षक | बागिलगे डुक्करवाडी विद्यालय व ज्युनि. कॉलेज, बागिलगे, जि. कोल्हापूर. |
| २८. | श्रीम. नंदा कुलकर्णी | मुद्रित शोधक | पुणे. |
| २९. | श्री. नीलेश निमकर | समीक्षण | भाषा तज्ज्ञ तथा संचालक, क्वेस्ट संस्था, पालघर. |


पायाभूत भाषा साक्षरता समाविष्ट घटक
मौखिक भाषा विकास
भाषेच्या लेखी रूपाची जाणीव
भाषेतील ध्वनींची जाण
विसांकेतीकरण (Decoding)
आकलनयुक्त वाचन
ओघवते वाचन (अस्खलितपणा)
शब्दसंग्रह
लेखन
वाचन संस्कृती / वाचनाकडे कल